वर्तमान हिंदी गजलकारों के रूप में दुष्यंतकुमार, चंद्रसेन विराट, कुँअर बेचैन , गोपालदास सक्सेना नीरज, हनुमंत नायडू शेरजंग गर्ग, ज्ञानप्रकाश विवेक, पुरूषोत्तम प्रतीक, रामदरश मिश्र, बेकल उत्साही, रामकुमार कृषक भवानी शंकर, अवध नारायण मुद्‌गल डॉ.उर्मिलेश, जहीर कुरैशी, राजेश रेड्डी, चॉद शेरी, अदम गोंडवी, विजय किशोर मानव, गिरिराज शरण अग्रवाल, हस्तिमल 'हस्ति', लक्ष्मण दुबे आदि कई है।

जिस तरह उपन्यासों में, कहानियों में, कविताओं में नारी विमर्श परिलक्षित होता है। नारी शोषण अत्याचार की बात नजर आती है। उसी प्रकार वर्तमान हिंदी गजलों में भी नारी विमर्श जैसे विषय को रेखांकित किया गया है। अतः निम्नलिखित रूप में वर्तमान हिंदी गजलों में नारी विमर्श द्रष्टव्य है।

वैदिक युग में नारी की स्थिति उतनी ही सहज थी जितनी कि पुरूष की। शिक्षा के द्वार उसके लिए खुले थे। जीवन साथी को चुनने का अधिकार उसे प्राप्त था। पुनर्विवाह, नारी–पुरूष दोनों के लिए मान्य था। नारी के विकास को अवरूध्द करनेवाली अमानवीय प्रथाओं का सूत्रपात नहीं हुआ था।

उत्तर वैदिककाल में स्त्रियां की स्थिति में गिरावट आने लगी। ये गिरावट इतनी बढ़ गयी कि, आधुनिक काल के पूर्व तक आते–आते नारी शोषित, पीड़ित वर्ग की श्रेणी में पहुॅच गई। शिक्षा, आर्थिक, स्वतंत्रता, सामाजिक प्रतिष्ठा सभी से वह वंचित हो गई। पूरी तरह पुरूष के अधीन नारी की अपनी स्वतंत्र सत्ता लुप्त हो गई।

समाज को प्रेरित, संचालित एवं नियंत्रित करने वाली शक्ति के रूप में नारी कहीं भी नजर नहीं आती। वस्तु–रूप में उसके संरक्षण की भावना ही सर्वत्र है। उसकी नैतिक पवित्रता के प्रति विशेष ध्यान दिया जाता है। पुरूष की प्रतिष्ठा का प्रतीक वह स्वयं जैसे कुछ है ही नहीं। फलतः बालविवाह,सती प्रथा,बहुविवाह, विधवा विवाह का न होना आदि अनेक कुप्रथाओं के कारण नारी का जीवन कॉटों भरा बन गया है।

आधुनिक युग के प्रारंभ में विश्वस्तर पर मानवतावाद की प्रतिष्ठा ने नारी के प्रति भी अपना ध्यान आकृष्ट किया। भारतीय भूमि में भी दलित–वंचित नारी की स्थिति में सुधार लाने के प्रयासों की शुरूवात हो गई। सती–प्रथा कानून, विधवा–पुनर्विवाह कानून के लागु होने के साथ ही वैधानिक सुधारों की श्रृंखला शुरू हो गई। विवाह, सम्पत्ति उत्तराधिकारी, सम्बन्ध विच्छेद, वेश्यावृत्ति निवारण संबंधी कानून बनाये गये जो सिर्फ नाममात्र के लिए। इतने वर्षो के बाद भी आज नारी सुरक्षित नहीं है। आज भी समाज ने उसको वह स्थान और सम्मान नहीं दिया है। उसके प्रति समाज का नजरियॉ आज भी बदला नहीं है।

3. **बराबरी का स्थान और सम्मान** :– समाज ने नारी को आज केवल उपयोग की वस्तु बनाकर रख दिया है। उसका सिर्फ पत्नी एकमात्र रूप नहीं है, तो माँ बहन और बेटी के रूप में भी वह हमारे सामने आती है। इसी बात को हिंदी के गजलकार कुँअर बेचैन लिखते हैं –

वो बीबी ही नहीं, माँ है, बहन है और बेटी भी,
ये किसने कह दिया औरत तो बिस्तर का खिलौना है।

आज तक स्त्रियों को समाज में बराबरी का दर्जा नहीं दिया गया । समाज की मानसिकता महिलाओं के प्रति आज भी बदली नहीं। समाज की इसी दुर्दशा का यथार्थ चित्रण जहीर कुरैशी ने किया है। वे कहते है –

आपने पत्नी को सारे सुख बराबर के दिये,
किंतु मिल सकती नहीं उसको बराबर की जगह ।

स्त्रियों को साथ विवाह के उपरांत गुलामी का जीवन जिने के लिए विवश होना पडता है। उसे क्रीत–दासी तक समझा जाता है। उसके साथ पशु जैसा बर्ताव किया जाता है। समाज की इसी सच्चाई का जहीर कुरैशी ने चित्रण किया है –

वह पति की प्राणप्यारी तो नहीं है,
वो उसकी क्रीत–दासी दिख रही है।

4. **दहेज–प्रथा** :– समाज में बढ़ती दहेज–प्रथा को खत्म करने के लिए कानून बनाये गये। जो केवल फाईलों में दबें पड़ें है। आज दिन दहाड़े दहेज का लेनदेन चल रहा है। दहेज के लोभीयोंको मन मुताबिक दहेज न मिलने के कारण शादियाँ भी टूट रही है। समाज की इसी सच्चाई को समस्या को मुकेश अनभिज्ञ ने रेखांकित किया है। वे लिखते है।

कैश पर बिगड़ी कि सारी बात तो फिर दोस्तों।
बेवजह बेटी में कोई नुक्स फिर ढूँढा गया।।

इसी दहेज प्रथा के कारण अपनी बेटियों की खुशियों के लिए माँ–बाप को अपनी जायजाद तक गिरवी रखनी या बेचनी पड़ती है। दर–बदर होना पड़ता है। इसी बात का यथार्थ वर्णन विनोद तिवारी ने किया है–

घास सी बढ रही है बेटियाँ
एक डर हो चला है पिता.
घर था जिसका किसी गांव में
छर–बदर हो चला है पिता।

5. **नारी** शोषण **एवं अत्याचार** :– दिन प्रतिदिन महिलाओं पर अत्याचार, उत्पीड़न एवं अपहरण के मामले बढ़ते ही जा रहे हैं । मानवता को शर्मसार करनेवाली घटनाएँ घटित हो रही है। लोगों के मन से कानून का डर खत्म हो गया है। आये दिन अखबार और दूरदर्शन के माध्यम से यह सारी खबरे बताई जा रही है। नारियों पर बढ़ते इसी अत्याचार का यथार्थ चित्रण जहीर कुरैशी ने किया है। वे कहते हैं –

क्या कहें अखबार वालों से व्यथा औरत
यौन शोषण की युगों लम्बी कथा औरत।
अपहरण कर ले गए 'रावण' कभी 'बिल्ला'
कल 'सिया' तो आज 'गीता चोपड़ा' औरत।
आज भी मामा या सौतेले पिता के हाथ
बेच दी जाती है 'बूढ़े' को 'युवा' औरत।

आये दिन नारियों पर यौन शोषण और उत्पीड़न के मामले बढ़ते ही जा रहे हैं। ग्राम से लेकर महानगर तक में भी महिलायें सुरक्षित नहीं है। ऐसा कोई दिन खाली नहीं जाता कि उस दिन कोई दुष्कर्म, अपहरण, छेडछाड की घटना घटित न हुई हो। इसी बात का यथार्थ चित्रण आचार्य भगवत दुबे ने किया है। वे कहते हैं –

जिस्म अपना वो लुटा कर भले घर की लड़की।
सरफिरे शहर में खामोश खड़ी है यारों।।

कभी–कभी तो स्थिति इतनी भयावह हो जाती है कि, सरेआम लोगों के सामने गुंडों द्वारा नारी की इज्जत को तार–तार कर दिया जाता है, मगर बीच–बचाव करने कोई भी हिम्मत नहीं दिखाता । लोगों की इसी संवेदनहिनता का यथार्थ चित्रण हिंदी के वरिष्ठ गजलकार रसूल अहमद सागर किया है। वे लिखते हैं –

सड़क पर अस्मतें लुटती रहीं आहिस्ता–आहिस्ता।
महल की खिड़कियां हँसती रहीं आहिस्ता–आहिस्ता।।

आज महिलाऐं सुरक्षित नही है उनका घर से अकेले निकलना मुश्किल हो गया है। अकेली लंबी यात्रा करना उनके, कही जाना खतरों से खाली नहीं है। जहीर कुरैशी कहते हैं –

एक औरत अकेली मिली जिस जगह,
मर्द होने लगे जंगली जानवर।

बात यहां तक ही नहीं रूकी। महिलाओं की सुरक्षा का जिम्मा जिन लोगों पर सरकार द्वारा सौंपा गया उन लोगों द्वारा ही महिलाओं पर दुष्कर्म जैसी घृणित घटनाएँ हो रही है। इसी बात का यथार्थ चित्रण प्रस्तुत पंक्तियों के माध्यम से जहीर कुरैशी ने किया है–

भला अब कौन अस्मत को बचाएगा।
दरोगा कर रहे हैं रेप थानों में।।

आज समाज में महिलाओं को हर वस्तु के लिए पुरूषों पर निर्भर रहना पड़ता है। ये हमारे देश की पुरूष प्रधान व्यवस्था है। वह चाहे कितनी भी कोशिश कर ले

लेकिन पुरूष कभी भी नारी को सबला बनाने का प्रयत्न नहीं कर सकता। नारी को हमेशा अबला ही समझने की पुरूष प्रधान समाज व्यवस्था की मानसिकता बन गई है। यह व्यवस्था सदैव स्त्रियों को दबावतंत्र का उपयोग कर बद से बदतर जीवन जीने के लिए मजबूर कर देती है। इस व्यवस्था की हीन–मानसिकता पर जहीर कुरैशी ने करारा व्यंग्य किया है। वे कहते हैं कि –

निर्बल कोई भी हो – औरत, हरिजन अथवा शीश महल,

निर्बल पर ताकतवर ने हर युग में अत्याचार किया।

भारतीय नारी को घर की लक्ष्मी कहा जाता है। वह अपने मायके की इज्जत बढ़ाने हेतु अपने आपको कुर्बान कर देती है। अपने ससुराल वालों को अपने जन्म देने वाले मॉं बाप से बढ़कर समझने लगती है। उसे कितनी दर्दनाक तकलीफों से गुजरना पडता है ये वही समझ सकती है। नारी के इसी दर्दभरी दास्तांन का मार्मिक चित्रण मुकेश अनभिज्ञ ने किया है। वे कहते हैं –

हिंदुस्तानी औरत यानी,
घर भर की खातिर कुर्बानी।
गृहलक्ष्मी पद की व्याख्या है,
चौका–चूल्हा रोटी पानी,
रूखसत करने में रजिया को,
टूट गये चाचा रमजानी।
ऑंचल में अंगारे बांधे,
पीहर लौटी गुड़िया रानी।।
कत्ल हुआ कन्या–भ्रूणों का,
तहजीब दिखी बेमानी।
निर्धन को बेटी मत देना
घट–घट वासी अवढरदानी।।

**निष्कर्ष** :– 1. वर्तमान हिंदी गजलों में नारीयोंपर बढ़ रहे अत्याचार को परिलक्षित किया गया है। 2. वर्तमान हिंदी गजलों में स्त्रियो पर हो रहे यौन शोषण एवं उत्पीड़न के मामलों पर भी मार्मिक अभिव्यक्ति की गई है। 3. वर्तमान हिंदी गजलों में दहेज जैसी कुप्रथा को भी उजागर किया गया है। 4. वर्तमान हिंदी गजलो में नारीयोंपर हो रहे दुष्कर्म की घटनाओं को परिलक्षित किया गया है। 5. वर्तमान हिंदी गजलों में कन्या–भ्रूण हत्या के घटनाओं को भी रेखांकित किया गया । 6. वर्तमान हिंदी गजलो में अनमेल विवाह को भी उजागर किया है। 7. वर्तमान हिंदी गजलों मे बाल–विवाह प्रथाओं को भी परिलक्षित किया गया है।

---

संदर्भ ग्रंथ सूची :


1. नई सदी के प्रतिनिधी गजलकार – संपा.अशोक अंजुम, संवेदना प्रकाशन, एफ 23, नई कॉलोनी कासिमपुर,अलीगढ, 2001, पृ.41
2. वही पृष्ठ 82
3. वही पृष्ठ 131
4. चॉंदनी का दुख – जहीर कुरैशी, पराग प्रकाशन, दिल्ली प्रथम संस्करण 1986
5. पृ.16
6. वही पृ. 18
7. वही पृ. 19
8. हिंदी गजल की नई दिशाएँ – संपा.डॉ.सरदार मुजावर, राधाकृष्ण प्रकाशन प्रा.लि., 2/38, अंसारी मार्ग, दरिया गंज, नई दिल्ली 110002, प्रथम संस्करण 2000, पृ.25
9. जहीर कुरैशी – महत्व मूल्यांकन : संपा.डॉ.विनय मिश्र, उर्वशीयम्, बी–12, सी–2 एंड सी–3, वर्धमान काम्पलेक्स, यमुना विहार, दिल्ली 110053 'उध्दृत'
10. चुभन : आचार्य भगवत दुबे, पृ. 37
11. संवेदनाओं के क्षितिज, रसूल अहमद सागर, अयन प्रकाशन, महरौली, नई दिल्ली, प्रथम संस्करण 1998, पृ.42

# हिन्दी और मराठी साहित्य : तुलना का नया परिप्रेक्ष्य

**प्रा. डॉ. राजेन्द्र गंगाधरराव मालोकर,** हिन्दी विभाग प्रमुख, श्री निकेतन कला–वाणिज्य महाविद्यालय नागपुर

तुलनात्मक साहित्य अर्थात् 'विभिन्न साहित्यों का तुलनात्मक अध्ययन' के महत्व, पद्धति, गंभीरता इत्यादि पर मत–भेद तो हो सकते हैं, परन्तु उसकी भूमिका तथा उपयोगिता पर नहीं। खासकर भारत जैसे बहुभाषी देष में भिन्न–भिन्न भाषाओं में लिखे गये साहित्य का तुलनात्मक अध्ययन अनिवार्य और उपयोगी सिद्ध होगा, इस पर मतैक्य पनप रहा है। तुलनात्मक साहित्य का अन्तर्राष्ट्रीय परिप्रेक्ष्य जहां अधिक विशाल और समीक्षात्मक क्षमता के लिए चुनौती हैं, वहां उसका भारतीय परिप्रेक्ष्य अपेक्षाकृत सीमित और इसी हेतु अध्ययन के लिए अधिक सुगम तथा उपयोगी है। वास्तव में, तुलना की प्रवृत्ति मानव–प्रतिभा की एक आवष्यक प्रक्रिया है। इसलिए संस्कृत भाष्य तथा टीकाओं में भी अन्य भाषा–साहित्यों के तुलनात्मक उद्धरण प्राप्त होते हैं। अंग्रेजी के प्रचलन से और यूरोपीयों के साथ संपर्क बढ़ने पर भारतीय और यूरोपीय (खासकर अंग्रेजी का) साहित्यों के तुलनात्मक दृष्टांत सुलभ हो चुके है। इसी से पहले 'भारतीय' और 'यूरोपीय', फिर अंग्रेजी, फ्रांसीसी, जर्मनी और तमिल, बंगला, मराठी, हिन्दी आदि साहित्य की पहचान बतायी गयी है। अतएव यह स्पष्ट है कि भारतीय साहित्य के परिप्रेक्ष्य में तुलनात्मक साहित्य का एकांगी वैशिष्ट्य है। इसके दो आयाम हैं – एक 'भारतीय साहित्य' और दूसरा 'प्रान्तीय साहित्य'।

आधुनिक काल में साहित्य को एक राष्ट्रीय आयाम प्राप्त हुआ। इसी से 'भारतीय साहित्य' की संकल्पना बनी और पुष्ट हुई। साहित्य–अकादमी जैसी संस्थाओं की स्थापना के बाद सभी प्रान्तीय साहित्यों को भारतीय साहित्य का अंगीभूत अस्तित्व प्राप्त हुआ । यह कहा गया ''भारतीय साहित्य एक है, यद्यपि वह अनेक भाषाओं में लिखा जाता है''। इस कथन में 'सर्व भारतीय दृष्टिकोण' पर बल दिया गया है। अर्थात् जो सामान्य तत्व विभिन्न भारतीय भाषाओं के साहित्यों में उपलब्ध होते हैं, वे इस 'सर्व भारतीयता' के निर्णायक हैं। दूसरा आयाम है 'प्रान्तीयता'। अर्थात् प्रत्येक प्रान्तीय भाषा में लिखे गये साहित्य की कुछ आंचलिक और क्षेत्रिय विषेषताएं हैं । इन्हें अब तक संकीर्णता का द्योतक समझकर छोड़ दिया जाता रहा है। परंतु भारतीय तुलनात्मक साहित्य के सन्दर्भ में इस आयाम की बड़ी महत्वपूर्ण भूमिका है। वस्तुतः इस आयाम की अवहेलना से 'भारतीय साहित्य' की संपूर्ण संरचना तथा संकल्पना स्पष्ट नहीं हो सकती। एक तथ्यात्मक उदाहरण द्वारा मैं अपनी बात को स्पष्ट करना चाहता हूँ।

उन्नीसवीं सदी में अंग्रेजी राज की विसंगतियों के कारण भारत में राष्ट्रीय चेतना का उदय हुआ तो उसका परिणाम था 1857 का प्रथम स्वतन्त्रता आन्दोलन, जिसमें समाज के सभी वर्गों के लोगों ने सक्रिय रूप से भाग लिया। अंग्रेजों ने उसे 'सिपाही विद्रोह' कह कर टाल दिया। कुछ इतिहासकारों ने उसे कुछ असंतुष्ट राजाओं, जमींदारों के असन्तोष की अभिव्यक्ति कहा। परन्तु सत्य दूसरा था। यह भारतीयों के स्वतन्त्र होने की इच्छा की अभिव्यक्ति थी; जो आगे के वर्षों में जोर पकड़ती गई। देश को विदेषी शासन से मुक्त करने के विविध प्रयास यहीं से शुरू हुए। स्वतन्त्रता–प्रेमी राजाओं तथा अन्य लोगों का लगातार विद्रोह, भारतीय राष्ट्रीय कांग्रेस जैसी संस्था का उद्भव, राजनायकों द्वारा वैधी और जनतांत्रिक उपायों से जनता की पैरवी, उग्रवादियों द्वारा जान की परवाह किये बिना सशस्त्र क्रान्ति इत्यादि ऐसे ही प्रयास थे। समग्र देश को एक मानकर राष्ट्रीयता का विकास इस समय हुआ। इसके साथ ही देशी भाषाओं के विकास का आन्दोलन भी इस दौरान गतिमान हुआ।

पराधीन भारत में राजभाषा के रूप में फारसी और फिर अंग्रेजी का बोलबाला रहा। हिन्दी और उर्दू भाषा का झगड़ा राजभाषा फारसी की विरासत है। बहुत–से विद्वान यह मानते हैं कि हिन्दी और उर्दू एक ही भाषा की दो शैलियाँ मात्र हैं, दो भाषाएँ नहीं हैं। हिन्दी में संस्कृत शब्दावली का आधिक्य है तो उर्दू में फारसी और अरबी शब्दों का। भाषा की संरचना एक है, क्रिया–रचना, शब्द–रूप, वाक्य–संघटना दोनों की एक ही है। दुर्भाग्य से यह मतभेद का एक मुद्दा बन गया है। इसी प्रकार अंग्रेजी के प्रचलन के लिए देश–प्रेमी नेता राजा राममोहन राय का दृष्टिकोण एक था तो मैकाले जैसे साम्राज्यवादी का दूसरा। आधुनिक ज्ञान–विज्ञान के प्रचार के लिए अंग्रेजी पढ़ाई करने में किसी को आपत्ति नहीं थी, पर उसे साम्राज्यवाद का आयुध बना दिया गया। फल–स्वरूप देशी भाषा और साहित्य की तथा भारतीय चिन्तन–परंपरा की अपार क्षति हुई, जो आज भी जारी है। इसीलिए भारतेन्दु हरिश्चंद्र ने अंग्रेजी शिक्षा को 'भीख मांगने की विद्या' कही थी, यद्यपि वे तकनीकी और

वैज्ञानिक षिक्षा के पक्षधर थे। निज भाषा की उन्नति को उन्होंने सब उन्नति का मूल माना। तब तक बंगाल में बंगला साहित्य का सर्जन होने लगा था और बंगाली जातीयता पनप चुकी थी। उसी के समकक्ष महाराष्ट्र में मराठी जातीयता का विकास शिवाजी और मराठों की सैन्य– शक्ति के बल पर विकसित हो रहा था। वैसे भी वह सीधे अंग्रेजों से टक्कर ले चुकी थी, भले पराजित हुई। कुछ बंगला भाषियों के अनुदार दृष्टिकोण के हेतु ओड़िषा और असम में भाषा आन्दोलन उठा जिसने साहित्यिक सर्जना के माध्यम से अपनी–अपनी अस्मिता जगायी। भाषा और साहित्य को जातीय तथा राष्ट्रीय जागरण के प्रमुख साधनों के रूप में उपयोग में लाया गया। इसलिए भारतीय स्वतन्त्रता आन्दोलन में हिन्दी भाषा तथा देषी भाषाओं और साहित्यों का अमूल्य योगदान रहा।

हिन्दी और मराठी दोनों आर्य परिवार की भाषायें हैं। भारत में इस परिवार की भाषा का प्रारंभ ईस्वी सन् 1600 पूर्व से माना गया है और इसे प्राचीन आर्य भाषाकाल कहा गया है। यह काल ईसा सन् से 500 वर्ष पूर्व तक चलता रहा, जहॉ से मध्यकालीन भारतीय आर्य भाषा काल का उदय होता है, जो लगभग 1000 ईस्वी तक जारी रहता है। इसके पश्चात से अर्थात लगभग 1000 ईस्वी से हिन्दी, मराठी, बंगला, गुजराती आदि के रूप में आधुनिक आर्य भाषा काल के दर्शन होते हैं। आर्यों ने उत्तर–पष्चिम से लेकर भारत के पष्चिम, पूर्व–दक्षिण भाग तक क्रमषः अपना विस्तार किया तथा अपने राज्य स्थापित किये। इनके साथ जानेवाली आर्यभाषा स्वभावतः स्थानिक भाषा और बोलियों से प्रभावित होती गईं। इस प्रकार 'मध्यकाल' में ही आर्यभाषा के कई प्रादेशिक भेद हो गये। शूरसेन में बोली जाने वाली प्राकृत शौरसेनी, शूरसेन व मगध देशों के बीच वाले क्षेत्र में बोली जाने वाली प्राकृत अर्धमागधी या कोसली, मगध में बोली जाने वाली प्राकृत मागधी तथा महाराष्ट्र में बोली जाने वाली प्राकृत महाराष्ट्री कहलाई। इनके अतिरिक्त पैशाची, आवन्त्य आदि प्राकृत भाषाएँ अपभ्रंश में रूपांतरित हो गईं। 'प्राकृत चन्द्रिका' में अपभ्रशों के 27 उपभेद दिये गये हैं। परन्तु उनमें शौरसेनी, अर्धमागधी, मागधी और महाराष्ट्री की ही प्रमुखता है।

मराठी का जन्म किस प्राचीन आर्यभाषा से हुआ है ? इस संबन्ध में इतिहासकार हरिनारायण आपटे का मत है कि ''वास्तव में यह विष्वास करने के कारण हैं कि महाराष्ट्र शौरसेनी, मागधी, अर्धमागधी और द्राविड़ बोलियों की सीमाओं से घिरा हुआ देश था। इन सभी भाषाओं का महाराष्ट्री के निर्माण में योगदान रहा है। महाराष्ट्री की भी अपनी विषेषताएँ रही है। महाराष्ट्री और शौरसेनी में बहुत महत्व के साम्य और वैषम्य हैं। इसी प्रकार महाराष्ट्री और मागधी तथा अर्धमागधी में भी साम्य व वैषम्य हैं। अतएव वह एक विशिष्ट स्वतंत्र भाषा है।'' ('हिन्दी को मराठी सन्तों की देन' ग्रंथ से) परन्तु डॉ. मनमोहन घोष का मत है कि महाराष्ट्री शौरसेनी का ही पश्च रूप है। डा. सुनीतिकुमार चाटुर्ज्या ने भी उनके इस निष्कर्ष का समर्थन किया है – ''डॉ. घोष के मतानुसार महाराष्ट्री अपनी आद्यावस्था में षौरसेनी का ही एक पष्च रूप थी, जो दक्षिण में ले जाई गई और वहां उसमें स्थानीय प्राकृत के षब्द तथा रूप आ जाने पर उसका वहॉ के साहित्य में उपयोग किया गया। महाराष्ट्र में इस भाषा को काव्य के एक श्रेष्ठ माध्यम के रूप में, उत्तरी भारत में पुनः लाया गया। उत्तरदेशीयों ने प्राचीन शौरसेनी का ही व्यवहार चालू रखा था, जबकि उसका नया रूप दक्षिण में प्राचीन साहित्य परम्परा के व्याघातों से बद्ध न रहने के कारण स्वभावतः विकसित होकर साहित्य के लिए उसका व्यवहार होने लगा। इस प्रकार इस प्रादेषिक बोली को अपने गुणों की अभिव्यक्ति का अवसर मिला जिसको सबने स्वीकार किया और कालान्तर में वह साहित्यिक प्राकृतों के समूह में गणमान्य स्थान पर प्रतिष्ठित हो गई। उपर्युक्त दृष्टि से महाराष्ट्री प्राकृत एक प्रकार से षौरसेनी प्राकृत तथा षौरसेनी अपभ्रंष के बीच की एक अवस्था का ही नाम है।'' डा. तुलपुले 'यादवकालीन मराठी' में लिखते हैं – ''उच्चारण प्रक्रिया, प्रत्यय प्रक्रिया और षब्दसिद्धि भाषा के इन तीन प्राणभूत अंगों का मराठी ने साक्षात् अपभ्रंष से ग्रहण किया और उनके साथ कुछ नवीन प्रकार रूढ़ करके भाषा की विकास क्रिया अग्रसर की।''

मराठी का आदिग्रंथ मुकुन्दराज का 'विवेक सिन्धु' माना जाता है जिसकी रचना शके 1110 में हुई है। देवगिरी के यादव राजाओं के काल में बारहवीं शताब्दी में मराठी में साहित्य स्त्रोतस्विनी प्रवाहित होने लगी थी। इस समय मराठी के संबंध में महानुभावी कवि संतोषमुनि कहते हैं –''तैषी छप्पन भाषाचिया मुकुटी, षोभे सहावी सुन्दर मराठी।'' महाराष्ट्र में आश्रित भाषा को प्राकृतों में श्रेष्ठ माना गया है। हिन्दी और मराठी दोनों में ही संस्कृत के तत्सम शब्द व्यवहार में आते हैं। बीम्स महोदय ने मराठी की शब्दनिधि को हिन्दी से अधिक संस्कृत तत्सम बहुल कहा ह। हिन्दी में संस्कृत तत्सम

शब्दों का प्रारंभ नौवी–दसवीं शताब्दी से प्रारंभ हो जाता है और चौदहवीं शताब्दी से जो निश्चित रूप से उनका अधिक मात्रा में व्यवहार होने लगा। वर्तमान हिन्दी (खड़ी बोली) की प्रवृत्ति तत्समता की ओर मराठी से अधिक लक्षित होती है। उसमें संस्कृत के अतिरिक्त अरबी–फारसी के विदेषी षब्दों को भी तत्सम रूप में लिखने का अधिक चलन है। मराठी की विशेषता है कि वह उधार लिये हुए शब्दों को तत्सम रूप में न रखकर अपने ही रंग में रंग लेती है। कुछ विदेशी शब्दों की मराठी भाषा में कपालक्रिया देखिए – मजमून (अरबी) – मजकूर (मराठी), मजहब (अरबी) – महजब (मराठी), मषहूर (अरबी) – महषूर (मराठी), तैयारी (अरबी) – तयारी (मराठी), बराबर (फारसी) – बरोबर (मराठी), फिक्र (अरबी) – फिकीर (मराठी), स्टेषन (अंग्रेजी) – ठेसन (मराठी) आदि।

नागपुरी हलवी बोली में हिन्दी और मराठीपन दोनों हैं, बल्कि मराठीपन कम ही है। चांदा (चंद्रपुर) जिले में हलवी बोलने वालों की संख्या एक रिपोर्ट के अनुसार अधिक है। नागपुर चांदा क्षेत्र में हिन्दी दूसरी भाषा के रूप में प्रचलित रही है। मराठी सन्तों की हिन्दी के प्रति सहज ममता रही है। मध्य युग से लेकर आज तक मराठी सन्त लगातार कीर्तन–भजन के अवसर पर मराठी अभंगों और पदों के साथ एक–दो हिन्दी पद गाते आ रहे हैं। जो मराठी सन्त कवित्व प्रतिभा से संपन्न रहे हैं, उन्होंने मराठी के साथ हिन्दी पदों की स्वयं रचना की है और जो केवल कीर्तनकार रहे हैं, उनकी मराठी अभंगों आदि के साथ किसी प्रसिद्ध हिन्दी सन्त के पद गाने की परिपाटी रही है। सन्तों ने प्रान्त या भाषा भेद को कभी स्वीकार नहीं किया। महाराष्ट्र के सन्त महीपति बोआ ने ईसा की 18 वीं षताब्दी में 'भक्त विजय' नामक सन्त चरित्र ग्रंथ लिखा है जिसमें मराठी के ही नहीं, हिन्दी के सन्तों का भी उल्लासपूर्ण गुणगान है।

हिन्दी और मराठी दोनों भाषाओं की लिपि देवनागरी है। वर्णमाला में समानता है। व्यंजनों में 'ल' के साथ 'ळ' व्यंजनध्वनि मराठी में अधिक प्रयुक्त होती है, परन्तु यह कथन पूर्वी हिन्दी में लागू होता है और पष्चिमी हिन्दी की राजस्थानी, मालवी और निमाड़ी में यह 'ळ' ध्वनि है। कर्ता, कारक, एकवचन, अकारान्त संज्ञा षब्द प्राचीन मराठी 'उ' और ओकारान्त होते हैं। जब 'उ' कारान्त होते हैं तब पूर्वी हिन्दी का अनुसरण करते हैं और जब 'ओ' कारान्त तब पष्चिमी हिन्दी का । मराठी और पश्चिमी भाषाओं (गुजराती, राजस्थानी) के वर्ण उच्चारणों में प्रायः समानता रहती है। 'अ' का उच्चारण ह्रस्व 'अ' ही होता है, बंगला के समान 'ओ' नहीं। 'व' और 'ब' का भेद मराठी में पष्चिमी हिन्दी, विषेष भी खड़ी बोली एवं राजस्थानी आदि के समान स्पष्ट दिखाई देता है। मराठी में कैसा, ऐसा, जैसा, तैसे पष्चिमी हिन्दी, खड़ी बोली के समान ही प्रयुक्त होते हैं। पूर्व में बोली जाने वाली आधुनिक खड़ी बोली की प्रवृत्ति के अनुसार मराठी में खावें, जावें का प्रयोग मिलता है । मराठी में प्रष्नवाचक सर्वनाम 'काय' (क्या, क्यों) पष्चिमी हिन्दी की बुन्देली बोली के समान 'काय' ही है। इसी प्रकार मराठी 'आपण' पष्चिमी हिन्दी बुन्देले के 'अपन' के समान है। पूर्वी हिन्दी में 'आपन' षब्द अपने के अर्थ में प्रयुक्त होता है। मराठी में राजस्थानी के 'न' के स्थान पर 'ण' की बहुलता है । खड़ी बोली की एकवचन भूतकालिक 'था' क्रिया मराठी में 'होता' और बुन्देली में 'हतो' हो जाती है। बहुवचन में क्रमशः थे, होते और हते रूप धारण कर लेती है।

भाषाविदों ने अनेक समानताओं के आधार पर स्पष्ट किया है कि मराठी भाषा की प्रकृति आर्य भाषोंन्मुख है और वह हिन्दी के समान ही उसी परिवार की है। एक ही परिवार की भाषा विस्तृत नदियों, उच्च पहाड़ों और दुर्गम वनों को लांघती हुई उत्तर, दक्षिण, पूर्व और पष्चिम की बहनों से निकटतर संबंध स्थापित करती रहती है। मराठी में संतकवियों के अनेक ऐसे पद हैं जिनसे पूर्वी हिन्दी एवं मराठी की साम्यता भाषित होती है। सन्त नामदेव की हिन्दी भाषा के मराठी रूप के जो उदाहरण मराठी के विद्वान श्री. म. गो. वारटक्के ने उपस्थित किये हैं, उन्हें देखकर हिन्दी साहित्य प्रेमियों का कुतूहल ही होगा क्योंकि उन्हें उनमें कहीं भी अहिन्दीपन नहीं जान पड़ेगा। अपनी पड़ोसी भाषाओं से मराठी भाषा ही प्रभावित नहीं है, बल्कि पड़ोसी भाषाओं पर मराठी भाषा का भी प्रभाव पड़ा है। मध्यप्रदेश और विदर्भ दो प्रधान भाषाओं का मिलन क्षेत्र हैं। मराठी ने इस क्षेत्र की हिन्दी पर निष्चय रूप से प्रभाव डाला है। यह प्रभाव नागपुर और विदर्भ में स्पष्ट परिलक्षित होता है। वैदर्भीय हिन्दी को 'नागपुरी हिन्दी' कहा जाता है। पाष्चात्य विद्वान डा. ग्रियर्सन ने 'नागपुरी हिन्दी' का क्षेत्र नागपुर जिला बतलाया है जबकि इसका विस्तार क्षेत्र नागपुर के निकटवर्ती जिलों में भी है। इसे बोलने वाले हिन्दी भाषाभाषी ही नहीं, मराठी भाषी और अन्य भाषाभाषी भी हैं। वास्तव में यह भिन्न भाषाभाषियों के बीच विचारों के आदान–प्रदान की बोली है। नागपुरी हिन्दी किसी की

मातृभाषा नहीं है। इसके क्षेत्र में बसा हुआ प्रत्येक भाषाभाषी अपनी मातृभाषा के साथ–साथ नागपुरी हिन्दी को 'सम्पर्क भाषा' के रूप में दूसरी भाषा के स्तर पर बोलता है।

नागपुरी हिन्दी 'सम्पर्क भाषा' के रूप में बोली जाती है, इस लिए इसमें खड़ी बोली के साथ–साथ वक्ता की मातृभाषा के व्यावहारिक षब्द भी सम्मिलित हो जाते हैं और मराठी के शब्द, तुक एवं लय का भी इसमें ग्रहण होता है। दक्खिनी हिन्दी, उर्दू या हिन्दवी का भी प्रभाव नागपुरी हिन्दी पर परिलक्षित होता है। नागपुरी हिन्दी में बुन्देली और मालवी का प्रामुख्य भी आया है। निष्कर्ष यह है कि हिन्दी और मराठी आर्य परिवार की भाषाएँ हैं। यद्यपि हिन्दी षौरसेनी प्राकृत और अपभ्रंष तथा मराठी महाराष्ट्री प्राकृत और अपभ्रंष की उत्तराधिकारिणी कही जाती है, तथापि हिन्दी और मराठी उच्चारण तथा प्रत्यय, प्रक्रिया और षब्दनिधि में इतना अधिक साम्य है कि ऐसा भासने लगता है कि दोनों का उद्गम निकटतम् स्त्रोत से है। मराठी में पूर्वी हिन्दी और पश्चिमी हिन्दी दोनों के लक्षण पाये जाते हैं, परन्तु उसका झुकाव पष्चिमी हिन्दी की ओर अधिक लक्षित होता है। नागपुरी हिन्दी और दक्खिनी हिन्दी तो मराठी के साथ घनिष्ठ संबन्ध बनाकर चली है। भौगोलिक सीमाओं के अनुसार मराठी और हिन्दी दोनों में और अधिक साम्य होने पर भी वे परस्पर समझी जाती हैं। यही कारण है कि महाराष्ट्र में सन्तों को हिन्दी अपनाने में सुविधा हुई और उन्होंने राष्ट्र की बहुसंख्यक जनता तक अपनी मंगल अनुभूति का रस उसमें प्रवाहित किया है तथा हिन्दी को राष्ट्रभाषा के रूप में गौरव प्रदान किया है।

**संदर्भ – संकेत :–**


1. 'हिन्दी को मराठी सन्तों की देन' ग्रंथ से।
2. हिन्दी और मराठी के बीच सम्बंध – डॉ. षिवपूजन सहाय पृष्ठ 70
3. पूर्णा वार्षिक अधिवेषनांक 1999 से।
4. भाषा विज्ञान – डॉ. सुनीतिकुमार चाटुर्ज्या से।

# 'महिला विकासात स्त्री चळवळीची भूमिका'

**प्रा. संतोष मेंढेकर,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर, satoshmnhekar@gmail.com

**प्रस्तावना** : भारतात 19 व्या शतकामध्ये समाज सुधारणेची चळवळ उभी राहीली. त्यात स्त्रियांशी संबंधीत प्रश्नांवर मुख्य भर होता. 1975 मध्ये 'युनो' (UNO) ने आंतराष्ट्रीय स्त्रीमुक्ती वर्ष साजरे केले. युनोला 1975 हे वर्ष आंतराष्ट्रीय मुक्तीवर्ष म्हणून साजरे करावे लागण्यास पूरक पार्श्वभूमी पाश्चिमात्य स्त्री चळवळीने निर्माण केली.

**पाश्चिमात्य स्त्री चळवळ** :– इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स या देशातील कष्टकरी, मध्यम वर्गीय स्त्रीयांनी मतदानाचा हक्क, शिक्षण, संपत्ती, समान कायदा या हक्कांसाठी संघर्ष करून स्त्रीमुक्ती चळवळीला प्रारंभ करून दिला. 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीमधून स्त्रीमुक्ती विचारांना निश्चित दिशा मिळाली. 1671 साली मागीरेट ब्रेंटन या स्त्रीने 'मेरिलॅड विधानसभेत' स्त्रियांना हक्क व मतदानाची मागणी केली होती. 1780 साली संपत्तीची मालकी असणा–या स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. 1893 साली 'मिसिसिपी' घटकराज्यात स्त्रीला मताधिकार दिला गेला. 1820 साली 'एम्माविलार्ड' या स्त्रीने मुलींची पहिली शाळा काढली. 1837 मध्ये 'माऊंट होलियाक' ही स्त्रीयांना उच्च शिक्षण देणारी संस्था स्थापन झाली. 1848 मध्ये न्यूयॉर्कमधील स्त्रियांनी 'सिनेको फॉल्स' येथे जगाच्या इतिहासातील पहिली परिषद भरवीली. तेथे स्त्रीस्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. 1970 साली 'कोपेनहेगेन' येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषद भरली आणि त्यामुळे 8 मार्च हा दिवस 'महिला दिन' म्हणून साजरा होवू लागला. जुन 1919 मध्ये 19 वी दुरूस्ती करण्यात आली आणि स्त्रियांना मताधिकार प्राप्त झाला. एप्रिल 1944 मध्ये फ्रान्समधील स्त्रियांना मताधिकार मिळाला.

20 व्या शतकात आणि पहिल्या महायुध्दानंतर स्त्री चळवळीला गती आली. पहिल्या महायुध्दानंतर रशियात साम्यवादी राजवट स्थापन झाली. आणि स्त्रियांना तेथे पूर्ण समानता देण्यात आली. 1957 मध्ये युनोने जाहिर केलेले 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' आणि स्त्री–पुरूष समानतेचे आंदोलन जगभर प्रवाहीत झाले आणि त्याचा प्रभाव भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीवरही पडला व येथील चळवळ सुध्दा गतिमान होत गेली.

**भारतातील स्त्री चळवळ** :– 19 व्या शतकातील स्त्री–सुधारणा चळवळीमुळे स्त्री चळवळीचा 1920 ते 1947 हा काळ निर्णायक होता. महात्मा गांधीच्या प्रभावामुळे या काळात सर्वच थरातील भारतीय स्त्री मोठया प्रमाणात स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय झाली होती. मा. गांधीची पहिली शिष्या अवंतिकाबाई गोखले या महाराष्ट्रीयन स्त्रीने मुंबई येथे 27 नोव्हेंबर 1918 मध्ये 'हिंद महिला सभा' स्थापन केली. 1930–32 च्या सविनय कायदेभंग चळवळीत हजारोंच्या संख्येने स्त्रीया सहभागी झाल्या होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये 'बंग महिला समाज', 'महिला थिऑसॉफिकल सोसायटी' या संघटना कार्यरत होत्या. राष्ट्रीय पातळीवर देखील काही संघटना कार्यरत होत्या. त्यात 'भारत महिला परिषद 1904', 'भारत स्त्री महामंडळ–1910', 'महिला भारतीय संघ–1917', 'भारतीय महिला राष्ट्रीय परिषद–1925, 'अखिल भारतीय राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट–1927'. या सर्व संघटना मध्ये ॲनी बेंझंट, लेडी एबरडन व लेडी टाटा, कमलादेवी चटोपाध्याय, सरोजीनी नायडू, मुथुलक्ष्मी रेड्डी, विजयालक्ष्मी पंडित, अमृता कौर, आदि सुशिक्षित स्त्रिया होत्या. या सर्व संघटनांनी स्त्री–पुरूष सहशिक्षणाची मागणी पडदा पध्दती व बालविवाह प्रथा, हिंदू कायदयातील सुधारणा, स्त्रियांना भौतीक प्रगतिचा अधिकार, संधीची समानता, घटस्पोट वारसा हक्क, पतीच्या उत्पन्नातील व निवृत्ती वेतनातील वाटा, गर्भपाताचा हक्क, स्त्रीयांचा मताधिकार इत्यादी अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता.

भारतीय स्त्री चळवळीने प्रामुख्याने दोन उदिद्ष्टांच्या प्राप्तीसाठी कार्य केले होते. 1) स्त्रियांच्या उत्थानासाठी सामाजिक प्रथांमध्ये सुधारणा करून स्त्रीला रचनात्मक भुमिकेसाठी सक्षम बनविणे. 2) महिलांना पुरूषांच्या बरोबरीचे अधिकार देणे

एकूणच भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीने स्त्री–पुरूष समानतेची मागणी केली. 1975 नंतर स्त्री संघटना गतीमान झाल्या या काळात 'राष्ट्रीय महिला समिती' स्थापन झाली. महिलाविषयक योजनांची अंमलबजावनी पाहणे हे त्या समितीचे कार्य होते. अशा चळवळीमुळे स्त्रीला स्वतःहाचे व स्वतःहाच्या प्रश्नांचे आत्मभान येत गेले. स्त्री–संघटनांची जाणीव झाली आणि त्यातून विसाव्या शतकात स्त्रीवादी विचारसरणी उदयास आली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांच्या असणा–या कनिष्ठ दर्जात परिवर्तनासाठी अनेक पातळयांवर प्रयत्न झाले. समाजसुधारकांनी प्राप्तीनंतर स्त्री–पुरूष विषमता नष्ट करून दोघांनाही समान हक्क व समान दर्जा मिळावा यासाठी घटनात्मक तरतुद करण्यात आली. भारतीय

राज्यघटना तयार करतानाच स्त्रियांच्या दर्जात सुधारणा करण्याची प्रतिज्ञा केली.[1] भारतीय स्त्रियांना समान हक्क मिळावेत, लिंगभेदाची भावना कमी व्हावी, पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, रोजगार इत्यादी क्षेत्रात समानता मिळावी यासाठी राज्यघटनेत तरतूद केली. त्यानंतर शासकीय पातळीवरून अनेक प्रयत्न हे स्त्रियांच्या दर्जात सुधारणेसाठी झालेले आहेत. स्त्री ही पुरूषांप्रमाणेच शिक्षण, धर्म, आर्थिक व राजकीय या सर्वच क्षेत्रात सक्षम व्हावी याकरीता पहिल्यांदा 1985 मध्ये नैशेबी येथे महिला आंतरराष्ट्रीय संमेलनात महिलांच्या स्वायत्तेबाबतचा विचार मांडण्यात आला. त्याचप्रमाणे 1995 आणि 1996 च्या यु. एन. डी. पी. च्या मानव विकास परिषदेमध्ये महिला आणि विकास यावर जोर देण्यात आला.

इ.स. 1972 साली अखिल भारतीय पातळीवर 'समानतेच्या दिशेने' हा अहवाल तयार करण्यात आला. या अहवालामधून असे लक्षात आले की, स्त्रीया ह्या जिवनाच्या सर्वच क्षेत्रात शिक्षण, रोजगार, आरोग्य या सारख्या अनेक क्षेत्रात स्त्रियांची पिछेहाट झालेली आहे. असाच निष्कर्ष या अहवालांनी मांडलेला आहे.[2] शासनाने या अहवालाची दखल घेतली आणि स्त्रियांच्या दर्जातील बदलासाठी शासकीय पातळीवरून वेगवेगळया विभागामार्फत विविध योजना राबविण्यात आलेल्या आहेत. त्यातूनच स्त्रियांना समान दर्जा देवून लिंगभेदाच्या आधारे असलेली विषमता कमी करण्याचा प्रयत्न झाला आहे.

भारतात स्वातंत्र्य पूर्व काळात समाज सुधारकांनी आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही स्त्रियांना समान दर्जा प्राप्त व्हावा यासाठी आणि महिला सक्षमिकरणासाठी शासकीय पातळीवरून काही प्रयत्न झालेले दिसून येतात. त्यामध्ये राज्यघटनेतून जी तरतूद केली ती अतिशय महत्वाची होती. डॉ. वंदना सोनाळकर या विषयी असे स्पष्ट करतात की, ''भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे समान हक्क दिले आहेत.''[3] तसेच स्त्रियांच्या सक्षमिकरणासाठी व त्यांच्या दर्जातील परिवर्तनासाठी राज्य घटनेचा आधार घेत शासकीय पातळीवरून काही योजना तयार करण्यात आल्या आहेत. त्याविषयी डॉ. शुभांगी गोटे असे म्हणतात, ''शासनाच्या स्त्रियांच्या विकासाच्या कल्याणकारी योजना, स्त्रियांविषयी संशोधन, हुंडा विरोधी सेल, महिला आरोग्य हे शासनाचे विकासात्मक कल्याणकारी प्रयत्न, स्त्री अत्याचार विरोधी कायदे यामुळे स्त्रीयांना काही प्रमाणात समान संधी मिळाली आहे. पण अजुनही स्त्री अपेक्षित, दुय्यम व वंचित आहे.

स्त्रियांना सामाजिक अधिकार मिळावे, स्त्रियांची शैक्षणिक प्रगती व्हावी, अर्थिक स्वातंत्र्य मिळावे, राजकीय क्षेत्रामध्ये तिचा सहभाग असावा याकरीता शासकीय आणि अशासकीय संघटनेव्दारे बरेच प्रयत्न करण्यात आले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानातील 14 व्या व 15 व्या कलमाव्दारे स्त्रीला समाजाच्या सर्व क्षेत्रात समान संधी मिळाली आहे. भारतातील स्त्रियांना अनेक चांगल्या कायदेशीर व्यवस्थेव्दारे त्यांच्या अधिकारांना सुरक्षा व संरक्षण देण्याबरोबर स्त्रियांकरीता सरकारव्दारा अनेक विकास कार्यक्रम व कल्याणकारी योजनांची अंमलबजावनी केली जात आहे. याचा उद्देश स्त्रीयांच्या जीवन स्तरात सुधारणा होऊन देशाच्या विकासात स्त्रीयांची भागीदारी निश्चित होऊ लागली आहे. त्यामुळेच भारत सरकार स्त्री सक्षमिकरणासाठी विविध योजना राबवित आहे. 2001 हे वर्ष 'स्त्री सक्षमिकरणाचे वर्ष' म्हणून पाळण्यात आले.

**महिलांच्या विकासासाठी काही प्रमुख सुधारकांनी चालविलेल्या सामाजिक चळवळी :–** 19 व्या शतकाच्या अखेरपर्यंत भारतीय स्त्रीयांना अनेक निरयोग्यता लादण्यात आल्या होत्या. जसे बालविवाह, बहुपत्नी विवाह, विहाकरीता मुलींची विक्री, विधवा स्त्रियांवर कठोर बंधने, शिक्षण घेण्यावर बंधने, आणि चुल आणि मूल पर्यंतच स्त्रियांना मर्यादीत ठेवण्यात आले. इत्यादी. न्यायमुर्ती रानडे व्दारे आयोजित भारतीय राष्ट्रीय सभा, 1885 मध्ये वरील निरयोग्यतेवर निरोध केला गेला. राजा राममोहन रॉय यांनी सतिप्रथा बंदी संबंधी महत्वपूर्ण कार्य केले. बालविवाह आणि पडदा प्रथेचा विरूध्द बंड पुकारला आणि स्त्रियांच्या उत्तराधिकारासाठी संघर्ष केला. इश्वरचंद्र विदयासागर यांनी विधवांच्या पुर्नरर्विवाहासाठी चळवळ सूरू केली. आणि स्त्रीयांचा शिक्षणाचा मूद्दा मांडला. महर्षी कर्वे यांनी विधवा विवाह आणि स्त्री शिक्षणाची समस्या यांना दुजोरा दिला यांनी 1916 मध्ये एस.एन.डी. टी. विद्यापीठ महाराष्ट्रात स्थापीत केले. बडोदा राज्याचे शासक महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बालविवाह, बहूपत्नी विवाह थांबविण्यासाठी, स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार मिळविण्यासाठी प्रयत्न केले. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद आणि महत्मा गांधी यांनी स्त्रियांचे राजकीय व सामाजिक अधिकारांच्या संदर्भात पुढाकार केला. गांधीजीचे असे मत होत की ''स्त्रयांना कार्य करण्यात तो त्रास व्हायला नको, जो त्रास पुरूष वर्ग सहन करू शकत नाही''. ते मुलगा आणि मुलगी समान आहेत या मताचे होते. वरील समाजसुधारकांच्या चालविलेल्या चळवळीने असा फायदा झाला की, स्त्रीयांना

समान अधिकार आणि निरयोग्यतेमधून मूक्तीसाठी सामाजिक चेतना जागरूत करण्यास यश मिळाले.

**महिला संघटनांचा उदयः—** महिलांचे संघटन जसे, बंग महिला समाज व महिला थियोसोफिकल सोसायटी, स्त्रियांसाठी आधूनिक आदर्शासाठी स्थानीक स्तरावर कार्य करत होते. परंतू पूढील कार्य त्या संघटनेव्दारा केल्या गेले. जे राष्ट्रीय स्तरावर कार्य करत होते त्यातील काही संघटना पुढील प्रमाणे आहेत.

भारत महिला परीषद (जी 1904 मध्ये स्त्रीयांच्या मुक्ती संघर्षाकरीता सुरू झाली), भारत स्त्री महामंडळ (1910 मध्ये स्थापीत झाली), महिला भारतीय संघ (1917 मध्ये ऐनी बेझंट व्दार संचालीत), भारतीय महिला राष्ट्रीय परीषद (1925 मध्ये लेडी एबरडन आणि लेडी टाटा यांनी सुरवात केली) आणि ऑल इंडिया वूमेन्स कॉन्फरेंस (मार्गरेट कसिन्स आणि अन्य व्दारा 1927 मध्ये स्थापीत)

भारतातील स्त्रीयांच्या चळवळीने दोन उद्‌देशांच्या प्राप्तकरीता कार्य केले. 1) स्त्रियांच्या उत्थानाकरीता अर्थात सामाजिक चालीरिती, रूढी, परंपरेत सुधार करून स्त्रियांना समाजाच्या संरचनात्मक भूमिकेकरीता योग्य बनविणे. 2) महिलांना पुरूषाच्या बरोबर आणि समान अधिकार मिळविणे अर्थात पुरूषांना मिळालेले राजकीय, आर्थिक व नागरीक अधिकार स्त्रीयांना सुध्दा मिळवून देणे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीया :—** भारतात 1940 पर्यंत स्त्रियांचा खालच्या दर्जाचे प्रमूख कारण अशिक्षितपणा, आर्थिक परावलंबन, धार्मिक निषेध, जाती बंधने, स्त्रियांच्या नेतृत्वाचा अभाव आणि पुरुषांचा त्यांच्याबद्दल असणारा अयोग्य दृष्टाकोन इत्यादी होते. मेटसन (म्अमतजज श्रंद डेंजेवद 1981) यांनी आम्हच्या संस्कृतीत स्त्रियांच्या एकटेपण आणि त्यांच्या खालच्या स्तरातील असण्याचे पाच कारणांना जवाबदार मानले आहे. ते कारणे— हिंदू धर्म, जातीव्यवस्था, संयुक्त कुटूंब, ख्रिश्चन शासक आणि ब्रिटिश उपनिशेदवाद हे आहे.

**संदर्भ सूचीः**

1.सोनाळकर वंदना, ''स्त्रिा आणि समाज परीवर्तन'' प्रकाशन— क्रांतीसिंह नाना पाटिल अकादमी, येवला जि. नाशिक, 1997

2.सबाने अरूणा, ''स्त्रिावादः एक दृष्टिक्षेप'' आकांक्षा प्र.नागपूर, 2009

3.श्रीवास्तव सुधाराणी, ''भारत में महिलाओंकी वैधानिक स्थिती'' कॉमनवेल्थ पब्लिकेशन, नई दिल्ली, 1997

4.भागवत विद्युत, 'भारतातील समकालीन कळीचे प्रश्न—स्त्रीवादी चर्चा विश्वाचा आढावा', परदेशी प्रतिमा 2000

5.देवगावकर एम.जी., डॉ. देवगावकर शैलजा, डॉ. डुमरे जयमाला 'सामाजिक चळवळी – परंपरागत आणि नवीन', साईनाथ प्रकाशन, नागपूर 2009

6.गायधनी र. ना. 'प्राचीन भारताचा सांस्कृतीक इतिहास' कॉन्टीनेटल प्रकाशन— 1955, पुणे.

7. गोहे शुभांगी, 'महिला सक्षमिकरण स्वरुप व समस्या ' वरद प्रकाशन—2004, पुणे

8. कुळकर्णी अंजली 'स्त्री स्वत्वाचा शोध' आकांक्षा प्रकाशन—2010, नागपूर.

# वैदर्भीय शेतकऱ्यांच्या आत्महत्याः एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. धनराज एस. चौखुंडे**, सहा. प्राध्यापक, आठवले समाजकार्य महाविद्यालय, भंडारा

**प्रस्तावनाः—** शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक चिंतनाचा विषय झालेला आहे. सद्यस्थितीत वर्तमानपत्र हाती घेतले की, प्रथम नजर जात असते ती शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या बातमीवर. कितीतरी वर्षापासून शेती करीत असलेला हा बळीराजा एकदम मोठ्या संख्येने आत्महत्येचा मार्ग का पत्करतो? प्रत्येक व्यक्तिला स्वतःचा जीव सर्वात जास्त प्रीय असतांना बळीराजाला स्वतःचे जीवन का नकोसे झाले आहे?

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे विधान अनेक भारतीयांना माहीत आहे. मात्र भारतातील कृषीक्षेत्रात घाम गाळणारा शेतकरी मात्र आज अनेक अडचणीत सापडला आहे. भारतात 1991 पासून अधिक सुधारणांचा कार्यक्रम राबविला जात आहे. उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकरण यातील धोरणांमुळे भारतीय कृषीक्षेत्रावर विपरीत परिणाम पडलेले आढळून येतात. विदर्भातील विशेषतः अकोला, वाशिम, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा व वर्धा या जिल्ह्यामध्ये शेतकरी आत्महत्या जास्त आढळून येतात. 'आत्महत्या ही आपल्या इच्छेनुसार मुद्दाम केले गेलेले आत्महनन होय'.

**अध्ययनाची पार्श्वभूमी :—** महाराष्ट्राचे क्षेत्रफळ 37713 चौ. कि. मी. आहे. विदर्भाचे भौगोलिक क्षेत्र 97,404 चौ. कि.मी. अर्थात विदर्भाचे 31 टक्के प्रतिशत एवढे आहे. विदर्भातील नागपूर व अमरावती असे दोन महसूल विभाग आहेत. विदर्भात सर्वात जास्त कापुस उत्पादन घेतल्या जाते. विदर्भातील यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा, वर्धा या जिल्ह्यात कापसाचे उत्पादन महाराष्ट्रातील एकुण उत्पादनाच्या 43 टक्के आहे. तरीही विदर्भात कापुस प्रक्रिया उद्योग कमी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळत नाही.

| विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी | |
|---|---|
| वर्ष | शेतकऱ्यांच्या आत्महत्या |
| 2001 | 52 |
| 2002 | 104 |
| 2003 | 148 |
| 2004 | 447 |
| 2005 | 445 |
| 2006 | 1448 |
| 2007 | 1246 |
| 2008 | 1268 |
| 2009 | 916 |
| 2010 | 748 |
| 2011 | 918 |
| 2012 | 926 |
| 2013 | 604 ऑगष्ट 30 पर्यंत |

**अध्ययनाचे उद्देश :—** 1)वैदर्भीय शेतकऱ्यांची कृषी उत्पादनाची सद्यस्थिती समजून घेणे. 2) शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विविध कारणांचा शोध घेणे. 3) शेती उत्पादनात घट हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक आहे काय हे तपासून पाहणे. 4) वैदर्भीय ोतकऱ्यांच्या आत्महत्येस शासकीय सोई सवलतींचा अभाव कारणीभूत आहेत काय हे तपासून पाहणे.

**गृहितकृत्ये :—** 1) वैदर्भीय शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती खालावलेली आहे. 2)शेतकरी शेती व्यवसायातील नापीकी व कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येस प्रवृत्त होतो. 3) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यास शासकीय योजना सक्षम नाहीत.

**अध्ययन पध्दती :—** प्रस्तुत लघुशोध निबंधात शेतीची ऐतिहासीक पार्श्वभूमी शेती उत्पादकांची घटती संख्या, आत्महत्येचे वाढते प्रमाण व त्यामागील कारणे इ. वर्णन करून निष्कर्ष काढावे लागतात व उपाययोजना सुचवाव्या लागतात. म्हणून अंषतः वर्णनात्मक व अंषतः निदानात्मक संशोधन आराखडयाचा अवलंब केलेला आहे.

**तथ्यसंकलनः—** प्रस्तुत लघुशोध अहवालात तथ्यसंकलन करण्याकरीता लिखीत अहवाल, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे व निरिक्षणाचा वापर करण्यात आलेला आहे.

**तथ्यांचे विश्लेषणः—**

**भारतीय शेतकऱ्यांची सद्यस्थिती :—** भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताचा आर्थिक विकासाचा कृषी हा कणा आहे असे म्हटले जाते. भारतात एकुण रोजगार शेतीतून मिळतो. भारतात अजूनही दारिद्रय रषेखालील 75 टक्के जनता आपला उदरर्निवाह फक्त शेतीतून करते. जगातील शेतकऱ्यांपैकी 24 टक्के शेतकरी भारतात आहेत.

| पिकाच्या भावात झालेली वाढ | | |
|---|---|---|
| पिकाचे नांव | दहा वर्षापूर्वीचे भाव | आताचे भाव |
| तुर | 2600 | 3300 |
| कपाशी | 2400 | 3500 |
| सोयाबीन | 1800 | 2500 |
| गहू | 600 | 1350 |

| खताच्या दरात झालेली वाढ | | |
|---|---|---|
| खताचे नांव | दहा वर्षापूर्वीचे भाव | आताचे भाव |
| डि ए पी | 300 | 1234 |
| 20 : 20 : 0 | 327 | 870 |
| 10 : 26 : 26 | 374 | 985 |
| 15 : 15 : 15 | 300 | 775 |
| पोटॅश एमपीओ | 275 | 750 |
| युरीया | 125 | 300 |

खताचे भाव 4 ते 5 पट वाढलेले दिसतात.

| मजुरीच्या दरात झालेली वाढ | | |
|---|---|---|
| मजुरी | दहा वर्षापूर्वीचे भाव | आताचे भाव |
| पेरणी (पुरूष) | 40 | 200 |
| महिला | 20 | 100 |
| बैलजोडी द्वारे पेरणी | 100 | 500 |
| जोडीसह माणूस | 200 | 1000 |

वरील तक्यावरून हे स्पष्ट होते की, कृषी उर्वरकांच्या किंमतीत झालेली वाढ व मजूरीतील वाढ याप्रमाणात शेती उत्पादनाच्या आधारभूत किंमतीत मात्र वाढ झालेली दिसून येत नाही.

**कर्जबाजारीपणा** :– विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपैकी 50 टक्के शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आपले जीवन संपविले आहे. शेतकरी जे उत्पादन घेतात तेवढया उत्पन्नात त्यांचा खर्च वसूल होत नाही. त्यामुळे लग्न, सण, उत्सव प्रसंगी शेतकरी कर्ज घेतो. तसेच कोरडवाहू शेतकरी तर नैसर्गिक अवकृपेमुळे अनेकवेळा पिक घेत नाही. परंतु पुढील वर्षी बि–बियाणे, खते इ. सावकार किंवा बँकेचे कर्ज घेतले जाते. दुष्काळ व अल्प पाऊस यामुळे योग्य उत्पादन न झाल्यास शेतकऱ्याचे कर्ज वाढत जाते. परिणामी त्याला आत्महत्या करावी लागते.

**पारंपारिक विचार प्रणाली** :– ज्यांच्या खांद्यावर संपूर्ण भारतीय समाजाचा उदरभरण चालत असते, असा भोळा शेतकरी बंधू अजूनही पारंपारीक विचार प्रणालीला चिटकून बसलेला आहे. फारशी आर्थिक परिस्थिती नसतांना अनेक अनुत्पादक पारंपारीक कर्मकांड व सण समारंभ केवळ पारंपारीक पद्धत असल्यामुळे साजरे करत बसतो. त्यातूनच कर्जाचा डोंगर उभा होत असतो. त्यामुळे ही विचार प्रणाली शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक आहे.

**उत्पादनात घट व उत्पादन खर्चात वाढ** :– रासायनिक खतांच्या व किटकनाशकांच्या किंमतीत वाढ व उत्पादनाच्या किंमतीत पाहीजे त्या प्रमाणात न होणारी वाढ या सगळयांचा ताण शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर पडून शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतात.

**नैसर्गिक प्रकोपः**– आधीच वेगवेगळे कारणांनी अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यात अकाली पडणारा पाऊस, वादळ, गारपीट इत्यादी घटकामुळे त्याचबरोबर पेरणीची वेळ येऊनही न पडणारा पाऊस यासारख्या प्रर्जण्यातील असमतोलामुळे शेतकऱ्यांच्या समस्येत भर पडत असते. त्यातून दुबार पेरणी, रोगराई, नासाडी यासारख्या समस्येला सामोरे जाताना आर्थिक ताण शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. हा ताण असह्य होवून शेतकरी आपली जीवनयात्रा संपवीत असतो.

**प्रचलित शिक्षण पद्धतीतील दोष** :– प्रचलीत शिक्षण पद्धती ही मुध्याधिष्ठीत आहे. त्यामुळे शिक्षणातून सुशिक्षीत तरूण निर्माण होतात, परंतु कार्यक्षम तरूण निर्माण होत नाही. त्याचबरोबर सुगीच्या हंगामात नेमके शैक्षणिक सत्र सुरू होत असते. त्यामुळे पारंपारीक, पिढयानपिढया ज्यांच्याकडे शेती हा व्यवसाय आहे. अशा कुटुंबातील मुलांना सुध्दा शेतीत चालणाऱ्या प्रक्रिया संबंधी फारशी कल्पना येत नाही. कारण याच हंगामात शैक्षणिक सत्र सुरू होत असते. आई–वडील शेतात काबाडकष्ट करतात. मुलगा एखाद्या रविवारी फार तर शेतात फिरायला जातो. त्यामुळे शेती व्यवसायापासून आधुनिकी पिढी दुर चालली आहे. त्याचबरोबर जे आई–वडील शेतात काम करतात त्यांना उत्पन्नात होणारी घट, किंमतीतील घसरण यासंबंधीत बाबींची झळ पोहचत असते. शिवाय या सगळया गोष्टीमुळे शेतीवर राबणाऱ्या कास्तकारांच्या मनात जी उदासिनता येते ते त्यांच्या सोबत हा तणाव दूर करणारा कुणीही जवळचा व्यक्ती त्यांच्याकडे नसते. मुले शिक्षणात असतात पत्नीला शेतीतील आर्थिक उलाढालीची फारशी कल्पना नसते. या परिस्थितीत शेतकरी खचून जाऊन शेवटी तो आत्महत्येस प्रवृत्त होतो.

**राहणीमानातील बदल** :– आधुनिकीकरण व पाश्चिमात्यकरणाचे वारे, प्रसार माध्यमाद्वारे ग्रामीण भागामध्ये देखील पोहोचले आहे. नवनविन फॅशन, ग्रामीण

भागामध्येही दिसून येतात. पुर्वी ग्रामीण लोकांची अतिशय साधी राहणी होती. कमीतकमी आवश्यक वस्तुंचा ते वापर करीत. परंतु आता लोकांची संचयीवृत्ती, अपेक्षा वाढल्या आहेत. राहणीमानाला जास्त महत्व दिले जात आहे. त्यावर प्रचंड पैसा खर्च केला जातो. त्यामुळे त्याचा आर्थिक बोझा वार्षीक खर्चावर पडत आहे. उत्पन्न कमी व खर्च मात्र जास्त अशी स्थिती ग्रामीण भागामध्ये निर्माण झाली आहे.

**शहरी आकर्षण** :– नविन पिढीला शहराचे जबरदस्त आकर्षण आहे. ग्रामीण भागातील बरीच कुटुंबे गावातील घर व शेती कुटुंबातील वृध्दांवर सोपवून स्वतः शहरात परिणामी कौटुंबिक खर्चात अतिशय वाढ झाली आहे.

**जागतिकीकरण** :– 1991 पासून भारतीय अर्थव्यवस्थेने आर्थिक उदारिकरणाचे धोरण स्विकारले असल्यामुळे संपूर्ण भारतात जागतिकीकरण, उदारीकरण, आधुनिकीकरण धोरण स्विकारल्यामुळे त्याचा प्रभाव भारतीय शेती उद्योगावर पडला. आज विदेशातील माल भारतात आयात होऊ लागला. भारतीय माल स्पर्धेत टिकला नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ न मिळाल्यामुळे अगदी कमी भावात माल विकावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्याला उत्पादन खर्चापेक्षा मालाची किंमत कमी येऊ लागली. यामुळे हताश होऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहे.

**व्यसनाधिनता** :– शेतकरी आत्महत्येमागे जे घटक जबाबदार आहेत त्यामध्ये व्यसनाधिनता हा घटक महत्वपूर्ण आहे. शेतकरी दारू, तंबाखू, गांजा इ. व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे उत्पन्नातील बराच पैसा खर्च होतो. तसेच दारू व्यसनामुळे प्रकृती खालावते, त्यामुळे आत्महत्या करतो.

**उपाय योजना**:– शेतकऱ्यांना बि–बियाणे घेण्यासाठी सरकारने भरीव सुट द्यावी, पिक विमा शेतकऱ्यांच्या फायदाभिमुख बनवावी, शेतकऱ्यांना 60 वर्षानंतर दरमहा पेंशन द्यावे, शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात कृषी हा विषय अनिवार्य करावा, शेतकऱ्यांना सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्या, कृषी उत्पन्न खरेदी विक्रीतील मध्यस्थी बंद करावी, कृषी सिंचनासाठी विज दरात सुट द्यावी, कृषीवर आधारीत लघु उद्योगांना चालना देण्यासाठी शेतकऱ्यांना भरीव अर्थ सहाय्य देण्यात यावे.

**निष्कर्ष** :– शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती खालावलेली आहे. उत्पादन खर्चात वाढ व उत्पन्नात घट होऊ लागल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या अज्ञानामुळे शासकिय योजनांचा त्यांना लाभ मिळत नाही. कृषी पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही. कृषी मुल्य आयोगाच्या मुल्यनिर्धारणाची अपयशस्वीता दिसून येते.

---

## संदर्भ ग्रंथसूची


1. देशमुख बी.टी.,महाराष्ट्र जलसिंचन अनुषेश
2. जहागीरदार दि.व्य.,शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भ
3. लांजेवार नरेंद्र,शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंतन आणि उपाय
4. पांगुळ बाराहाते डॉ. नंदा, आत्महत्या
5. दैनंदिन वर्तमानत्रे, लोकमत दैनिक 26 नोव्हेंबर 2005, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा रोखणार?
6. लोकसत्ता, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशामुळे झाल्या. 3 नोव्हेंबर 2005,
7. देशोन्नती, शुक्रवार दि. 6 सप्टेंबर 2013,
8. देशोन्नती, मंगळवार दि. 10 डिसेंबर 2013
9. मनोहर दिनानाथ, नवे शेती तंत्र आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, श्रवण प्रकाशन बारामती
10. मेश्राम प्रा. सुरेश, प्रात्यक्षिक सामाजिक संशोधन, यश प्रकाशन, 92 वनराई नगर, मानेवाडा पूर्व, नागपूर 34, प्रथम आवृत्ती सप्टेंबर 2000
11. www.kishortiwari.coin/vidarbhafarmersuicidedata

# विस्थापनाचा मानवी समाजावरील परिणाम

**डॉ. प्रदिप गजभिये,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड जि. नागपूर

नैसर्गिक कारणांमुळे किंवा प्रकल्पाअंतर्गत झालेल्या विस्थापनामुळे सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, कौटुंबिक, आरोग्याची, राहणीमानाची, अन्नधान्याची इत्यादी प्रकारच्या समस्या निर्माण होतात. एखादा प्रकल्प निर्माण करताना प्रकल्पाबद्दल खूप चर्चा केली जाते. परंतु प्रकल्पाचा लोकांवर कोणत्या प्रकारचा परिणाम होईल याबद्दलचा विचार केला जात नाही. प्रकल्पात गेलेल्या लोकांच्या संपत्तीचा योग्य मोबदला सहजपणे मिळत नाही किंवा अतिशय सहजपणे संपत्तीचा मोबदला द्यायला पाहिजे. आजही अनेक प्रकल्पग्रस्त लोकांच्या शेतजमिनीचा मोबदला शासनाद्वारे दिल्या गेला नाही. मोबदल्यापासून हजारो लोक आजही वंचित आहेत.

राजकीय व सामाजिक संघर्ष आणि सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली सामाजिक संरचनेचा उलगडा करण्याची ही प्रक्रिया आहे. एकदा या प्रकल्पाची घोषणा झाली की मग अनेक घटनाप्रमाणे अनुसारणी करावी लागते. विस्थापनाची सुरूवात साधारणतः जमिनीच्या सर्वेक्षणापासून होते. त्यांनतर वास्तविक जमिनीचा ताबा घेणे, नुकसानभरपाईची निश्चिती करणे. लोकांचे स्थलांतरण आणि शेवटी शेवटी जागेवर लोकांचे पुनर्वसन केले जाते. (It is a process of unravelling of the existing patterns of social organization a social crisis and sometimes a political one as well a series of events follow once the declaration of the project is made. The process of displacement generally beings with the survey of land, physical possession, determination and payment of compensation the actual movement of people and finally the resettlement of persons in a new location.)

विस्थापनाचा प्रभाव हा विशिष्ट समुदायावरच पडत नाही त्याचा महिलांवर जास्त परिणाम पडतो. भरपाईच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना विस्थापित मानल्या जात नाही. फक्त पुरूषांनाच भरपाई दिल्या जाते. कारण स्त्रियांच्या नावावर कुठलाही भाग नसतो. त्यामुळे तिला भरपाई मिळत नाही. स्त्रियांच्या सर्वच बाबतीत पक्षपातीपणा केला जातो. विस्थापनाचा परिणाम बालकांवर होतो. लहान वय असल्यामुळे आपल्या हक्कासाठी आवाज उठवू शकत नाही. अशाप्रकारे बालपणात उद्‌भवणाऱ्या संकटांना आपल्या जीवनातील महत्वपूर्ण अंग मानून जीवन जगणे शिकतात. बालकांवर विस्थापनाने, अनेक दुष्परिणाम पडतात त्यात घरांची कमतरता, अन्नाची कमतरता, वाढती बिमारी आणि मृत्यूदर, अपुरे शिक्षण आणि मनोरंजनाची कमतरता यासारखा वाईट प्रभाव पडतो.

जमिनीमुळे आदिवासी तसेच तेथील मूळ रहिवाशांवर सर्वात जास्त परिणाम पडतो. विस्थापनामुळे आदिवासी यांचे जंगल, बगीचा, तलाव, विहीर, जमीन इ. वरून त्यांचे सामूहिक स्वामित्व म्हणजे मालकी हक्क नाहिसे होते. तसेच इतर दुर्बल घटकांवर सुध्दा जास्त प्रमाणात प्रभाव पडतो. परिणाम मायकेल सेरनियाच्या मते, ''लोकांना फक्त सामाजिक आर्थिक ताणच होत नाही तर इतर प्रमुख आठ समस्येला सामोरे जावे लागते.'' त्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत. (Michael Cernea, maintains that DPS not only face the socio-economic stress but also the risk of impoverishment. He has identified eight such risks DPS face due to displacement)

1) भूमिहिनता (Landlessness) – विस्थापनामध्ये कायदेशीर अधिकाराची अंमलबजावणी करून भूमीचे अधिग्रहण केले जाते. त्यामुळे भूमीहिनता महत्वाचा मुद्दा आहे. कारण शासन भूमीच्या मोबदल्यात रक्कम देत असते. भूमीच्या मोबदल्यात भूमी देत नाही. परिणामतः प्रकल्पग्रस्त लोकांना स्वतःकरिता दुसरी जागा शोधावी लागते. अशा परिस्थितीत प्रभावित लोक निश्चितपणे मिळविलेल्या रकमेत दुसरी तेवढीच जागा शोधतील परंतु वास्तविक भूमीचे अधिग्रहण व मिळणारी नुकसानभरपाई यामध्ये बराच वेळ निघून जातो. त्यामुळे सदर कालावधीत जमिनीच्या किंमती वाढलेल्या असतात. मूल्यवृध्दी झालेली असते. परिणामतः प्रकल्पग्रस्तांना गरजेपेक्षा कमी जमीन खरेदी करावी लागते. कधी कधी ते अजिबात जमिनी खरेदी करू शकत नाही. तसेच पुनर्वसन कार्यक्रम सुध्दा शासन राबवित असल्यामुळे इच्छित प्रमाणात व सोयीनुसार जमीन उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे मनुष्य दोन्ही नैसर्गिक व मानवी संपत्तीपासून वंचित होतो.

विस्थापनामुळे लोकांच्या समोर भूमीहिनतेसारखी अत्यंत तीव्र स्वरूपाची समस्या उभी राहून लोक आपल्या पूर्वीच्या भूमीपासून दुरावले जातात.

2) बेकारी / रोजगारविहीनता (Joblessness) – भारतात आजही जवळपास 70 टक्के लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. दक्षिण आशियातील देशांमध्ये आजही कृषीक्षेत्र सर्वात जास्त रोजगाराच्या संधी पुरविणारे क्षेत्र

आहे. म्हणून भूमीहिनता याचा अर्थ बेकारी होय. भूमीहिनतेमुळे फक्त शेतकरीच प्रभावित होत नाहीत तर त्यावर अवलंबून असणारे सर्व व्यापारी, शेतमजूर, कामगार व इतर उपजीविका चालविणारे लोक प्रभावित होतात.

लोकांचे विस्थापन झाल्यामुळे लोकांना बेरोजगारीला तोंड द्यावे लागते. कामाकरिता इतरत्र भटकावे लागते. त्यामुळे आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण कार्य होऊन जाते याला विस्थापन हे एक महत्वाचे कारण ठरले आहे.

3) बेघर (Homelessness) – शासनाने भूमीचे अधिग्रहण केल्यानंतर जी भरपाई दिली जाते. त्या नुकसानभरपाईचे मूल्य व्यवस्थित ठरविले जात नसल्यामुळे दुसऱ्या जागी त्याच स्वरूपाचे दुसरे घर तयार केल्या जाऊ शकत नाही. विस्थापित लोक विविध घटकांद्वारे तात्पुरत्या स्वरूपाच्या निवासाची सोय करतात. कालांतराने त्याच जागी हलक्या दर्जाचे जीवनमान जगतात. जेथे विस्थापनानंतर सुविधा नाही तिथे जगणे हे कठीण आहे. आपले गाव, घर हे कसेही असले तरी ते सर्वांना आवडते. टिनाचे टप्पर, लहान लहान खोल्या, पाणी, ऊन, थंडी यात राहणे खूप त्रासदायक आहे. कितीतरी लोक आपल्या नातेवाईकांकडे निघून जातात पण घराची कमतरता त्यांना नेहमी वाटते.

तसेच बेघर झाल्यामुळे लोकांचे सामाजिक संबंध, सांस्कृतिक अंतर आणि ओळख व नातेसंबंध दुरावतात. पर्यायाने व्यक्ती स्वतःची ओळख गमावून बसतो. ज्यामुळे त्याला विविध मानसिक त्रासातून जावे लागते. तसेच पुरामुळे सर्व घरदार वाहून जाऊन राहण्यायोग्य जागा राहत नाही.

मूलभूत सुविधांच्या अभावाने प्रकल्पग्रस्तांना कुठल्याही संस्थांचा पाठिंबा मिळत नाही. परिणामतः मानसिक स्थिती ढासळते. त्यामुळे ते उच्च दर्जाचा व योग्य जीवनमान जगू शकत नाही. अशाप्रकारे विस्थापनाच्या कारणांमुळे हजारो कुटूंब बेघर होतात. त्यांच्या समोर घराची समस्या निर्माण होऊन त्यांना राहण्यासाठी इतरत्र भटकत राहावे लागते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण कुटूंब चिताग्रस्त होते आणि अनेक समस्या निर्माण होतात.

4) किफायतशीर भाव (Marginalization) – जेव्हा व्यक्ती अगर कुटुंबाची आर्थिक स्थिती कमकुवत होते त्याला आर्थिक विपन्नता असे म्हणतात. बऱ्याच वेळेस संपत्तीच्या वास्तविक अधिग्रहणापूर्वी ही प्रक्रिया सुरू होते. एकदा हा प्रकल्प जाहीर झाला की इतर कोणत्याही आर्थिक संस्था त्या संपत्तीला आर्थिक सुरक्षा प्रदान करीत नाही. त्याचबरोबर शासन सुध्दा त्या भागात इतर मूलभूत सोयी सवलतीमध्ये गुंतवणूक करीत नाही. उदा. शाळा, सार्वजनिक सुविधा इत्यादी. लगतच्या भूमीची किंमत मात्र वाढीस लागते. त्यामुळे आर्थिक मिळकतीच्या साधनांमध्ये कमतरता निर्माण होते. जेथे पुर्ननिर्माण व्यवस्थित आखलेले नसते. तसेच इतर आर्थिक उत्पन्नाचे साधन निश्चित केलेले नसते. तेव्हा विस्थापित कुटुंबांना पुन्हा आर्थिक मिळकतीचे साधन प्राप्त होऊ शकत नाही. पर्यायाने संपत्तीचा अभाव जाणवते.

5) आरोग्याचे परिणाम (Loss of Health) – मानसिक तणावामुळे प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे आरोग्य बिघडते. भूकबळी, सांडपाण्याचा अभाव, स्वच्छतेचा अभाव व रोगराई इत्यादीमुळे व्यक्तीचे जीवनमान खालावते. जेव्हा वास्तविक पुनर्वसाहतीचे बांधकाम सुरू होते. त्या ठिकाणी बऱ्याचशा आरोग्याच्या सोईचा अभाव असतो. उदा. दूषित पिण्याचे पाणी व इतर प्रादुर्भावामुळे निर्माण होणारी रोगराई तसेच पर्यावरणविषयक बदलामुळे सुध्दा व्यक्तीचे आरोग्यमान खालावते.

विस्थापित लोक लवकरच कितीतरी रोगाचे बळी होतात. खराब पाणी तसेच मूलभूत विल्हेवाटाची गैरसोय यामुळे डायरिया, मलेरिया, हैजा इ. रोग विस्थापित लोकात व परिसरात पसरतात.

6) अन्नधान्याची असुरक्षितता (Food Insecurity) – विस्थापनाचा परिणाम सर्वसाधारणपणे अन्नधान्याच्या तुटवडयामध्ये होतो. अन्नाचा तुटवडा निर्माण होईल या भीतीपोटी प्रकल्पग्रस्त व्यक्ती एकतर कमी अन्नाचे सेवन करायला लगतो किंवा अन्नाचे साठवणूक करतो. याचा परिणाम कुपोषणामध्ये होतो. जरी नवीन ठिकाणी व्यक्तींचे पुनर्वसन झाले असले तरी सुध्दा त्या जमिनीवर अन्नाचे उत्पादन घेणे सहज शक्य नसते. त्यामुळे जेथे पारंपारिक शेतीची सुविधा उपलब्ध नसते तेथे अन्नधान्याची असुरक्षा हा मुद्दा गंभीर बनतो.

पुरामुळे सर्व वाहून गेल्याने लोकांना भोजनाची, स्वयंपाकाची, अन्नाची मुख्यतः समस्या भेडसावते. त्यामुळे शासन, स्वयंसेवी संघटनाद्वारे अन्नाची, बिस्किटांची पाकीटे पुरविली जातात.

साधारणतः विस्थापनामुळे लोकांच्या समोर अन्नधान्याची समस्या निर्माण होऊन लोक उपाशी पोटी इतरत्र भटकत असतात. योग्य अन्न न मिळाल्यामुळे त्यांना जिवंत राहणे कठीण जाते यासारखा अत्यंत वाईट परिणाम लोकांवर पडतो.

7) सामान्य संपत्तीच्या स्त्रोतांचे नुकसान (Loss of common property Resources) – सर्वसामान्य संपत्तीचे स्त्रोत भूमीहीन तसेच भूमीधारक लोकांना सामान्य जीवन जगण्याकरिता अन्न, इंधन, चारा, पाणी, वैरण इत्यादीचा पुरवठा करते. ग्रामीण आणि आदिवासी भागात या स्त्रोतांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण सर्वात जास्त असते. परंतु जेव्हा संपत्तीचे अधिग्रहण केले जाते तेव्हा या स्त्रोतांचा क्वचितच विचार केल्या जातो किंवा त्यांचा मोबदला दिला जातो. जेव्हा या स्त्रोतांचा प्रभाव भूमीहीन व भूमीधारकांवर कठोर प्रमाणात होतो. तेव्हा संपूर्ण समुदायाचे जीवन विस्कळीत होते. पुरामध्ये सर्व वाहून गेल्यानंतर, वाहून गेलेल्या संपत्तीची भरपाई केली जात नाही. अगदी नगण्य स्वरूपात मदत दिली जाते. विस्थापनाने व्यक्तीकडील सर्व उत्पन्नाची साधने नष्ट होऊन उत्पन्नाच्या स्त्रोतांचा तुटवडा पडू लागतो.

8) सामाजिक संबंधात विस्कळीतपणा/दुरावा (Unravelling of the social fabric) – विस्थापनामुळे सामाजिक संबंध तुटतात. लोकांना त्यांचे निवासस्थान आणि नाते संबंधितांपासून दूर जावे लागते. जरी पुनर्वसनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून दिल्या गेल्या तरी सुध्दा लोकांना इतर बऱ्याचशा समस्येला तोंड द्यावे लागते. उदा. सुविधांचा अभाव, कमकुवत उत्पादन प्रणाली, सामाजिक संबंधाचा अभाव तसेच लोकांचा एक दुसऱ्यांना मदत करण्याच्या प्रवृत्तीचा अभाव आढळतो. नवीन पुनर्वसन केल्यानंतर पूर्वी ज्या प्रकारची गावांची रचना होती ती पूर्णतः विस्कटली जाते नवीन स्वरूपाची रचना अस्तित्वात येऊन नवीन शेजारी निर्माण होतात.

9) विस्थापित आणि पुनर्वसनासंबंधीचा सामान्य दृष्टिकोन (The general approaches to displacement, resettlement and rehabilitation) – संशोधनाअंती विस्थापनाचा प्रश्न कशाप्रकारे सोडवायला पाहिजे याबद्दल डॉ. ए.एम. भट्टराय यांनी तीन दृष्टिकोन सांगितले. ते पुढीलप्रमाणे आहेत.

1) परंपरागत दृष्टिकोन (The Traditional Approach), 2) लोक केंद्रीत दृष्टिकोन (People Centred Approach), 3) अधिकार विषयक दृष्टिकोन (The Right of Entitlement Approach)

**संदर्भ :–**


1) भट्टाराय ए.एम. डीसप्लेसमेंट ॲन्ड रीहॅबीलेटेशन इन नेपाल : अनमोल प्रकाशन नवी दिल्ली 2001,
2) एकका अलेक्स, झारखंड : विस्थापन और पुनर्वास, भारतीय सामाजिक संस्थान, नई दिल्ली 2003,
3) सेरेविया मायकल : आफ्रीकन इनव्हॅलून्टरी पॉकलेशन रीसेटलमेंन्ट इन ग्लोबल कॉन्टेस्ट 10 वॉशींगटन डी. सी. वर्ल्ड बॅन्क 1997,
4) दैनिक भास्कर असम मे बाढकी स्थीती गंभीर नागपूर प्रकाशन, 3 नोव्हेंबर 2007
5) तरूण भारत, नागपूर प्रकाशन 2 ऑगस्ट 1991

# आधुनिकीकरणाचा वृध्दांवर पडलेला प्रभाव – एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. अनिल रामचंद्र गावंडे**, समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कला वाणिज्य सायम् महाविद्यालय, कॉटन मार्केट, नागपूर. मो. नं. 9923946282

**प्रास्ताविक** :– प्राचीन व मध्ययुगीन काळात वृध्दांची अवस्था चांगली होती. पूर्वी संयुक्त कुटुंबपध्दती होती. संयुक्त कुंटुबपध्दतीत वृध्दांना आदराचे स्थान हेते. तसेच वृध्द मातापित्याचा सांभाळ करणे, हे मुलांचे आवश्यक कर्तव्य मानले जात होते. भारतीय संस्कृतीनुसार वयोमानानुसार व्यक्तीचा दर्जा निश्‍चित हेत होता. त्यामुळे वयाने लहान असणारी व्यक्ती आपल्यापेक्षा वयाने मोठया असलेल्या व्यक्तीशी आदराने वर्तन करीत होती. त्यामूळे कोणतीही समस्या किंवा प्रश्न असेल तर वृध्दांचा सल्ला व मार्गदर्शन घेतले जात होतें. त्यामूळे कुटुंबात व समाजात वृध्दांना मान होता. सर्वत्र वृध्दांचा आदर केला जायचा. वृध्दांच्या मताला किंमत होती.

कोणतेही धार्मिक आचार करतांना प्रथमतः देवाला नमस्कार केल्यानंतर त्यांनतर कुटुंबातील वृध्द व्यक्तीला नमस्कार करून आर्शिवाद घेतले जात होते. जन्म, मृत्यु, संस्कार, सण समारंभ,, विवाह इत्यादी कार्यात वृध्दांचा सहभाग अग्रस्थानी होता. त्यांच्या मताचा आदर केला जायचा. त्यांचे मार्गदर्शनाशिवाय कुठलाही संस्कार, सण समारंभ, विवाह संपन्न होत नव्हते. कुटुंबातील तरूण–तरूणींचे विवाह वृध्द निश्‍चित करायचे.

वृध्द व्यक्ति नातवंडाना सांभाळणे, कुटुंबाच्या सदस्यांना मार्गदर्शन करणे, इत्यादी कार्य करायचे. तसेच वृध्द माता–पित्यांचा सांभाळ करणे हे मुलांचे आवश्यक कर्तव्य मानले जात होते. त्यामूळे भारतात 19 व्या शतकापर्यंत वृध्दांची समस्या निर्माणझाली नव्हती. पण त्यानंतरच्या विविध स्थित्यंतरानंतर भारतात 19 व्या शतकाच्या सुरूवातीपासून वृध्दांची समस्या निर्माण झाली आहे.

सतराव्या शतकात भारतात इंग्रज आले. जवळ–जवळ संपूर्ण भारतात त्यांचे साम्राज्य अठराव्या शतकात स्थिर झाल्यावर शिक्षण, औद्योगिकीकरण व कायद्याचे राज्य या बाबींना चालना मिळाली. त्यामूळे भारतातील रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, आणि धर्माधंता यातून निर्माण झालेल्या ज्वलंत प्रश्नांकडे किंवा समस्यांकडे त्यांचे लक्ष गेले. त्यांनी सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नी विवाह, कुलपरंपरा, स्त्री–शिक्षण, विधवा विवाह, स्त्री–पुरूष समानता, स्त्री–स्वातंत्र्य, अस्पृश्यतेला विरोध, जाती निर्मुलन इत्यादींच्या विरोधात आवाज उठविला. त्यामूळे भारतीय समाजाची परंपरागत समाज चौकटीला तडे जावून सामाजीक परीवर्तनाला सुरूवात झाली. भारतात इंग्रजानी राजकीयदृष्टया स्थिर झाल्यावर युरोपीय देशातील औद्योगिकीकरणाच्या प्रभावाने कापड गिरण्या, कारखाने, उद्योगधंदे, दळणवळण, रस्ते, रेल्वे वाहतुक, पोस्ट, तारयंत्रे, इंत्यादी सोयींचा विकास केला. औद्योगिकीकरणामूळे भारतीय समाजात आमुलाग्र परीवर्तन होवू लागले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंचवार्षिक योजना व आर्थिक नियोजनाच्या माध्यमातुन भारतातील कृषी, उद्योग, व्यापार, मुलभुत सुविधा, शिक्षण व सेवा क्षेत्रात विकासाच्या योजना राबविण्यांत आल्यात. त्यामुळे भारतात विकासाला चालना मिळाली. देशातल्या विशिष्ट भागत व शहरात मोठया प्रमाणांत उद्योगधद्यांची निर्मीती झाली. या उद्योग धंद्याकरीता शिक्षित, प्रशिक्षित आणि नजरान असलेल्या लोकांची गरज भासली. त्यातुन मोठया प्रमाणात देशाच्या कानाकोप–यातून, खेडयापाडयातुन अशा देशातील विशिष्ट भागातील किंवा शहरातील औद्योगिक, व्यापार व उद्योग क्षेत्रात लोकांनी स्थानांतरण केले. स्थलांतरणामुळे नोकरी व्यवसायाच्या निमीत्ताने स्थलांतरण करणारी व्यक्ती, व त्याची पत्नी व मुलांसहीत त्यांनी स्थलातंरण केले. कारण शहरात जागेचा प्रश्न किंवा घरांचा प्रश्न होता. तिथे मोठे कुटुंब ठेवणे शक्य नव्हते. परंतू यामुळे वृध्द आई वडील तेथेच खेडयात किंवा ग्रामीण भागात राहीले. यातून ग्रामीण भागात वृध्दांच्या पालनपोषणाचा व सांभाळ करण्याचा प्रश्न निर्माण झाला. संयुक्त कुटुंबपध्दती मोडीस निघू लागली. शहरात जे संयुक्त कुटुंबपध्दती होती त्यावरही औद्योगिकीरणातून निर्माण झालेला आधुनिकीकरणाचा प्रभाव पडला.

शिक्षणाचा प्रचार–प्रसारामुळे नविन पिढी शिक्षण घेवू लागली. मुलांबरोबर मुलीही शिकू लागल्या. नोकरी व्यवसाय करू लागल्या. त्यातून मुला–मुलींचा संपर्क येवून आंतरजातीय विवाह, जातीय प्रेमविवाह, होवू लागले. तरूण पिढी आपला जोडीदार स्वतःच शिक्षण, नोकरी, व्यवसाय या आधारावर निवडू लागली. त्यामूळे पूर्वी विवाह जोडणीत वृध्दांचे असलेले वर्चस्व संपूष्टात आले. समाज व कुटुंबातील आदरसन्मान कमी होवू लागला.

अशाप्रकारे औद्योगिकीकरणापासून आधुनिकीकरणा पर्यंत आणि आता उत्तर आधुनिकीकरण किंवा जागतिकीकरणातील विविध परीवर्तनामूळे जे पूर्वी भारतीय समाज व्यवस्थेत स्थान होते. त्याचा –हास होवून वृध्द ही समाजातील आणि कुटुंबातील अडगळ होवून वृध्दांकडे दुर्लक्ष होवून वृध्दांची भारतीय समाजात मोठी समस्या निर्माण झाली आहे.

एका बाजूला आधुनिकीकरणाच्या प्रभावातून वृध्दांची आगतिकता वाढत आहे तर वैद्यकीय व भैतिक सुखसुविधेत विकसीत राष्ट्राबरोबरच विकसनशिल राष्ट्रातील लोकांचे सरासरी आयुष्यामान वाढलेले आहे. त्यामुळे वृध्दांच्या संख्येत मोठया प्रमाणांत वाढझाली आहे.

**आधुनिकीकरणाची संकल्पनाः–** आधुनिकीकरण म्हणजे विशिष्ट सामाजिक परीवर्तन घडवून आणणारी गतीमान व सर्वस्पर्शी अशी सातत्याने चालू असलेली एक प्रक्रिया होय. आधुनिकीकरण ही प्रक्रिया आहे, फलीत नव्हे. ही प्रक्रिया केव्हा आणि समाजाच्या कोणत्या अवस्थेत थांबेल व परीणामी समाज कोणत्या अवस्थेत जाईल ते निश्चितपणे सांगत येत नाही. अमेरीका, इंग्लड, फ्रान्स, जर्मन, जपान इ. विकसीत राष्ट्रांमध्ये प्रकर्षाने दिसून येणारी आणि अविकसीत राष्ट्रांना आदर्शवत ठरलेली प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरणाची प्रक्रिया होय. ही प्रक्रिया या पाश्चिमात्य राष्ट्रात अठराव्या शतकापासून सुरू झाली व भारतात ही प्रक्रिया विसाव्या शतकात पूर्णत्वास आली.

**आधुनिकीकरणाच्या प्रकियेत तीन मुलभूत कारणे आहेत** – 1. ऐहिक संपत्ती वाढविण्याची प्रवृत्ती आणि उपभोग्य वस्तुचा अधिकाअधिक संग्रह करण्याची व्यक्तीची अभिलाषा. 2. यांत्रिकीकरणाला उद्गम आणि त्यामुळे व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात यांत्रीक साधनांचा झालेला प्रसार. 3. सर्व क्षेत्रात तर्कशुध्द वैज्ञानिक दृष्टीकोन, समता, बंधुभाव व्यक्तीस्वातंत्र्य इ. मुल्यांना मिळालेले प्राधान्य.

**वृध्द –** भारतीय समाजात आजही वृध्दांना सन्मान देण्याची परंपरा आहे. संयुक्त कुटुंबपध्दतीत आजही वृध्दांना महत्वपूर्ण स्थान आहे. कृषीवर आधारीत त्यांचे व्यवसाय असल्यामूळे निरीक्षण व अनुभवाला इथे प्राधान्य दिले जाते. परीणामस्वरूपी शेती करतांना वृध्दांचा सल्ला अतिशय मौल्यवान मानला जातो. व त्यांच्या निर्णय क्षमतेवर विश्वास ठेवून कृषी म्हणजेच शेतीची कामे केली जातात.

समाजिक उत्सव, सण, समारंभ, इत्यादी कार्यक्रमात वडीलधा–या मंडळीकडे नेतृत्व असायचे. सर्व सदस्य वृध्दांशी अदबीने व विनम्रपणे वागत असत. वृध्दांचा आर्शिवाद हा महत्वाचा व आवश्यक मानला जाई.

पूर्वी जातपंचायतीचे प्रस्त होते. जातपंचायतीमध्ये वृध्द सामाजिकवादयांचे महत्वपूर्ण काम चोखपणे बजावत असे. वृध्दांनी दिलेला निर्णय हा अंतीम मानुन सर्वच त्यांचा स्विकार करीत असे.

ग्रामसभेच्या कारभारामध्येही वृध्दांच्या अनुभवाला महत्वाचे मानले गेल्यामूळे वृध्दांचा सहभाग ग्रामसभेतही दिसून येतो. वृध्द म्हणजे जिवन जगण्यासाठी आवश्यक असलेली अनुभवाची शिदोरी ज्यांच्यापाशी आहे असे ते लोक म्हणजे ''वृध्द'' असे मानले जाई.

थोडक्यात भारतीय समाजव्यवस्थेमध्ये वृध्दांना अतिशय महत्वाचे व आदराचे स्थान प्राप्त झाले होते. आधुनिकीकरणाचा वृध्दांवर सकारात्मक व नकारात्मक दोन्ही स्वरूपाचा प्रभाव पडला असल्याचे दिसून येते. परंतू सकारात्मक प्रभावापेक्षा नकारात्मक प्रभावंच जास्त असल्याचे दिसते.

**आधुनिकीकरणाचा वृध्दांवर पडलेला नकारात्मक प्रभाव :–** आधुनिकीकरणाचा वृध्दांवर खुप मोठया प्रमाणांवर नकारात्मक स्वरूपाचा प्रभाव दिसून येतो. यामध्ये जीवनशैलीतील बदल, कुटुंबाचे विघटन, एकाकी जिवन, सामाजिक मुल्यांमध्ये होत असलेले परीवर्तन, चंगलवाद, भोगवाद, स्वार्थी प्रवृत्ती इत्यादी.

**नकारात्मक प्रभाव निर्माण होण्याची कारणे** :– 1. संयुक्त कुटुंबाचे विघटन. 2. ग्रामीण व शहरी जिवनशैलीतील बदल. 3. औद्योगिक अर्थव्यवस्था व शहरीकरण. 4. लोकसंख्येची अतिरीक्त वाढ. 5. सामाजिक मुल्यांमध्ये होत असलेले परीवर्तन. 6. स्त्रियांचे शिक्षण, नविन कायदे, व आर्थिक स्वावलंबन. 7. व्यक्तीवादी दृष्टीकोन. 8. वैज्ञानिक प्रगती. 9. जागतीकीकरणाचा प्रभाव. 10. बदलत्या गरजा. 11. निवासस्थानातील अपूरी जागा.

**वृध्दांसाठी करण्यांत येणा–या उपाययोजना :–** 1. वृध्द व्यक्तींना कुटुब, समाजाकडून व आर्थिक दृष्टीने मदत करण्यांस प्रोत्साहन करणे. 2. कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करणे. 3. वृध्दांसाठी आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि जिवनभर शिकता यावे यासाठी कार्यक्रम राबविणे. 4. वृध्दांचा स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर बनविणे, त्यासाठी योजना राबविणे. 5. सर्व वयोगटातील वृध्दांमध्ये सेवा कार्याचा भाव जागृत करणे. 6. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बाबतीत विस्तृत जाणीव जागृती करणे. 7. वयस्क व्यक्तींशी योग्य वागणुक ठेवणे, त्यांचा

मान ठेवणे. 8. वृध्दाश्रमाची स्थापना करणे, तेथे मनोरंजन, शिक्षण, आरोग्य व सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे.इत्यादी.

म्हातारपणाचा काळ अनेकांना नकोसा वाटतो. वृध्दत्व म्हणजे शाप आहे असे वाटायला लागते. म्हणून –

वय झालं म्हणून थकायचं कशाला?
आयुष्यातल्या आनंदाला मुकायचं कशाला?
सगळयावरती करावं प्रेम, हाच धरावा नेम.
नुसतचं देवळाच्या पायरीवर बसून
विसावयाचं कशाला?

तरूणांना मानणारं जग मात्र वृध्दांचा अवमान करतं हे एक कटू सत्य आहे. इमर्सन म्हणतात वृध्दांशी वाईट वागणां–यानी आपणही एके दिवशी वृध्द होणार आहोत हे लक्षात घ्याव. तरीही ब–याच वृध्दांना उपेक्षीत जिवन जगावं लागतं!

म्हणून लक्षात ठेवा –

योग्य तो आदर । करावा वृध्दांचा
उपकार त्यांचा । स्मरणीय ।।1।।
भविष्यकाळाचे । तेच जन्मदाते
वर्तमानाचे ते । माता–पिता ।।2।।
जिवनाच्या अंती । घ्यावया विश्रांती
करावी कां खंती । सांगा त्यांनी ।।3।।

---

**संदर्भसुची–**


1. आगलावे डॉ. प्रदीप – 'समाजशास्त्रीय सकंल्पना' साईनाथ प्रकाशन नागपूर. 1996.
2. हडप डॉ. गोविंद नी. – वृध्दांच्या सामाजिक समस्या आणि जेष्ठांचे समुपदेशन, पिंपळापूरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर 2007.
3. डॉ. प्रा. जे. बी. शिंदे – 'नव्या युगासाठी प्रबोधन' रिया पब्लिकेशन्स, 678–ई निदान हॉस्पिटलसमोर शाहुपुरी, 2 री गल्ली, कोल्हापूर, 2013
4. WWW.marathi.vishwkosh.in/index.php?option.....id

# शैक्षणिक ग्रंथालयातील ज्ञान व्यवस्थापन

**प्रा. रंजना बी. व्यवहारे,** ग्रंथपाल, विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, 310–ब, न्यु नंदनवन, नागपूर.

**प्रस्तावना :–** ज्ञान म्हणजे सत्य परिस्थिती सभोवलताच्या घटना असा सर्वव्यापी अर्थ होतो. वस्तू किंवा व्यक्ती यांच्याषी झालेल्या संपर्कातून जो अनुभव येतो तो म्हणजे ज्ञान. तात्विकदृष्टया व रचनात्मक पध्दतीने असलेली प्रत्येक माहिती ही ज्ञान निर्माण करते त्यामुळे ज्ञान ही एक शक्ती आहे. एखादया गोष्टीचा अनुभव येणे किंवा सत्य माहिती होणे ही ज्ञान होण्याची कृती आहे.

ज्ञान हे दोन प्रकारचे असते व्यक्त आणि अव्यक्त. शब्दातून वक्तव्यातून, पुस्तकातून, अहवालातून व वेगवेगळया माध्यमाद्वारे जगासमोर येत ते व्यक्त ज्ञान आणि आपल्या जाणिवा, प्रेरणा, मुल्यविचार याला अव्यक्त ज्ञान म्हणतात.

**व्याख्याः–** डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्या मते, "ज्ञान म्हणजे एकून मानवी कल्पनांचे विश्व" !

**ज्ञान व्यवस्थापन :–** ज्ञानाचे व्यवस्थापन हे व्यक्त आणि अव्यक्त ज्ञान ओळखून ज्ञानाची निर्मिती जमवाजमव, संरचना वापर तसेच संप्रेसारण होय.याकरीता संस्थेतील प्रत्येकाचे ज्ञान संख्यात्मक पातळीवर आणून या ज्ञानाचा फायदा संस्थेमधील सर्व विभागांना मिळवून देणे हा ज्ञान व्यवस्थापनेचा महत्वाचा हेतू असतो. त्यामुळेच संस्था इतर संस्थाबरोबर स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यास मदत होते.संस्थेतील व्यक्तीचे ज्ञान ओळखून त्यांचा इतरांषी संपर्क साधणे महत्त्वाचे ठरते.याकरीता सभा संम्मेलन, चर्चासत्रे, परीषदा या माध्यमाद्वारे त्या व्यक्तीचा संपर्क घडविता येतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ज्ञान व्यवस्थापनाला व्यापक अर्थ आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ज्ञानार्जनाची व ज्ञानप्रसाराची अ्दयावत साधने उपलब्ध झाली आहे.पुर्वी फक्त छापील स्वरुपात माहीती मिळत होती पण आता छापील माहितीबरोबरच संगणकीय साधनाद्वारे माहितीचे ज्ञानव्यवस्थापन करणे सोपेझाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून जागतीक स्तरावरील व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय माहितीचे व्यवस्थापन करता येणे षक्य झाले आहे.इंटरनेटवर ई–मेल व्हिडिओकॉन्फरसिंग यामुळे ज्ञानाची देवाणधेवाण व ज्ञानाचा प्रसार माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन करु शकतो.

**शैक्षणिक ग्रंथालयातील ज्ञान व्यवस्थापनः–** शैक्षणिक ग्रंथालयात ज्ञान व्यवस्थापन करतांना ज्याप्रकारचे शैक्षणिक कार्य संस्थेतून दिल्या जात असेल त्याप्रकारचे ज्ञान व्यवस्थापन करणे महत्वाचे ठरेल शैक्षणिक ग्रंथालयात विद्यार्थीच्या मागणीचा, त्यांच्या गरजेचा विचार करणे त्यानुसार ज्ञानाचा साठा जमविणे गरजेचे राहील. शैक्षणिक ग्रंथालयात वेगवेगळया विषयाची वेगवेगळया विभागानुसार मागणी असते. जितके विभाग त्या संस्थेत शिकवायला असेल त्या विभागात क्रमिक पुंस्तके, संदर्भ ग्रंथ तसेच जर्नल्स, नकाशे, इअर बुक, ज्ञानकोश, शब्दकोश इत्यादी स्वरुपात ज्ञानाचे व्यवस्थापन करता येते.

शैक्षणिक ग्रंथालयातील ज्ञानाचे व्यवस्थापन करतांना त्या संस्थेत शिकविणारे विषय तसेच संस्थेत येणारा वाचक वर्ग, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचा येणारा स्तर त्यानुसार वाचन संग्रह करुन ठेवणे गरजेचे असते. शैक्षणिक संस्था ही ज्ञानार्जनाचे महत्वाचे कार्य करीत असते म्हणून शैक्षणिक ग्रंथालयात ज्ञान व्यवस्थापन महत्वाच ठरते.

**ज्ञान व्यवस्थापनाचा उद्येशः–** 1) ज्ञानाचा साठा गोळा करणे, संग्रह करणे आणि योग्यवेळी त्याचे वितरण करणे. 2) संशोधनाला प्रोत्साहन देणे. 3) ग्रंथालय आणि वाचक वर्ग यांच्यातील संबंध प्रस्थापित करणे. 4) माहीती तंत्रज्ञानाच्या युगात बौध्दिक मालमत्ता, हक्काचे संरक्षण करणे. 5) सर्वांना सहजपणे उपलब्ध होऊ शकेल अशाप्रकारे ज्ञानाचे वितरण परिणामकारकरित्या करणे 6) संस्थेत ज्ञानाचे देवघेव करतांना येणारे अडथळे दुर करुन सर्व विभागाना माहीती मिळू शकेल अशाप्रकारचे माहीतीचे संप्रेषण घडविणे. 7) ज्ञानात अद्ययावत माहीतीची नोंदी करुन योग्यवेळी त्यामध्ये सुधारणा करणे. 8) उपयोग कर्त्यांच्या दुष्टीने अधिकाअधिक चांगल्या प्रकारे वापर होईल किंवा उपयुक्तता वाढले अशाप्रकारे निर्माण होण्या–या अडथळयावर उपाययोजना करणे.

**ज्ञान व्यवस्थापनेची वैशिष्टेः–** ज्ञान व्यवस्थापन करतांना त्याची काही वैशिष्टे सांगता येतील ती पुढीलप्रमाणे आहे. 1) ज्ञानाचे व्यवस्थापन संस्थेच्या उदिदष्टयेपूर्ती करीता केलेले असते. 2) ज्ञान व्यवस्थापन हे नेहमीच उपयुक्त ठरते. 3) ज्ञान व्यवस्थापनात बदलत्या काळानुसार त्यात बदल करणे आवश्यक असते. 4) ज्ञान व्यवस्थापन हे नेहमी प्रवाही असते. 5) ज्ञान व्यवस्थापन हे भविष्याचा नियोजनाकरीता आवश्यक व उपयुक्त ठरणारे असते. 6) ज्ञान व्यवस्थापन करण्यात संस्थेचे

वैशिष्टे असते. 7) ज्ञान व्यवस्थापनाची उपयुक्तता ओळखुन ते अधिक चांगल्या प्रकारे करता येते.

**ज्ञान व्यवस्थापनाची आवश्यकताः—** ज्ञान व्यवस्थापनामुळे कोणतेही काम सहजरित्या पार पाडल्या जाते. ज्ञान व्यवस्थापनाने संस्थेचे कार्य्र अधिक चांगल्याप्रकारे सक्षम होण्यास मदत होते. संस्थेच्या कार्यपध्दतीत नविनता येण्यास मदत होऊन काळानुसार कार्यप्रणाली करण्यास वाव मिळते. त्यामुळे सेवा प्रदान करताना गुणवत्तपूर्ण व नाविण्यपूर्ण आणता येते. संस्थेचे व्यवस्थापन यामुळे अधिक स्वरुपात आर्थिक लाभाकरीता सिध्द करता येते. बाजारपेठेत स्पर्धा सुरु असतात. अशा स्पर्धेच्या वेळेत बाजारपेठेत आपल्या उत्पादनाला जास्तीत जास्त मागणी मिळावी म्हणून प्रयत्न केल्या जातात. याकरीता नवीन क्लृप्त्या उपयोगात आणाव्या लागतात. नवीन काही तांत्रिक ज्ञान आत्मसात करणे याकरीता कर्मचा—यामध्ये तेवढे कौशल्य व कार्यक्षमता असणे जरुरी राहते. ज्ञान व्यवस्थापनामुळे वाचनसंस्कृती वाढविण्यास मदत होऊ शकते.

**ज्ञान व्यवस्थापनाचे प्रकारः—** ज्ञान व्यवस्थापन हे पुढील प्रकारे करता येतात. 1) सुधारीत ज्ञान व्यवस्थापन 2) तांत्रिक ज्ञान व्यवस्थापन 3) संख्यात्मक ज्ञान व्यवस्थापन

गंथालय ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. ज्ञानदानाचे कार्य करीत असतांना गंथालय आणि ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग यांना नेहमीच नवीन ज्ञान आत्मसात करण्याची इच्छा असणे आवष्यक आहे. नवीन प्रणाली आत्मसात करून ग्रंथालयात येणा—या उपयोगकर्त्यांना चांगल्या प्रकारे सेवा प्रदान करता याव्या याकरिता ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग सदैव तत्पर असणे आवश्यक आहे. यामुळे वाचकांना चांगल्या सेवा पुरवून त्यांचे समाधान करणे हे ग्रंथालयाचे कर्तव्य असते. त्यामुळे वाचक वर्ग ग्रंथालयात जास्तीत जास्त येण्यास उत्सुक असतात.

आधुनिक ग्रंथालयात माहीती तंत्रज्ञानाचा वापर करुन ज्ञान व्यवस्थापन करता येते. जागतीत स्तरावरील माहीती साठविणे, तिच्यावर प्रकिया करुन ती वाचंकापर्यंत पोहचविणे हे ग्रंथपाल आणि ग्रंथालयातील कर्मचारी यांचे कार्य असते. ग्रंथालयातील ज्ञानाचा जास्त प्रमाणात वाचंकाना लाभ मिळावा यासाठी प्रयत्न केल्या जातो. ज्ञान ही फार मोठी शक्ती आहे. ज्ञानाचा संचय करणे तिच्यावर किया करणे व तिचे वितरण करण्यापर्यंत ग्रंथपालाचा सहभाग महत्त्वाचा असतो. गंथालयात ज्ञान व्यवस्थापन करतांना ज्या माहितीचा साठा करतो त्या माहीतीचे योग्य जाणकार असणे आवश्यक असते त्याच बरोबर तांत्रिक स्वरुपाच्या कामात कुशल असणे आवश्यक आहे. कारण ग्रंथालयात ज्ञान व्यवस्थापन करतांना योग्य तीच माहीती आली पाहीजे तरच वाचकांना सेवा पुरवितांना त्यांच्या गरजेनुसार, मागणीनुसार ज्ञानाचा पुरवठा करता येईल. ज्ञान आणि व्यक्ती यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा म्हणजे ग्रंथपाल असतो.

**ग्रंथपाल—एक ज्ञान व्यवस्थापक :—** आधुनिक ग्रंथालयात ग्रंथपाल एक नुसता प्रशासक नाही तर तो एक ज्ञान व्यवस्थापक म्हणूनही ओळखला जातो. कारण ग्रंथालयात विविध प्रकारचे ज्ञान असते आणि त्या ज्ञानाची जाण ग्रंथपालास असणे आवश्यक असते. आधूनिक युगात ग्रंथालय आणि माहीती तंत्रज्ञानाचे जवळचे संबध आहे. ग्रंथालयातील कामकाज पूर्णपणे संगणकावर होतांना दिसून येते. अशावेळेस ग्रंथपालास माहीती तंत्रज्ञानाचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे. त्यांना सतत नवीन ज्ञान आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. त्यामुळे ते सेवा देतांना निश्चितपणे सेवा देऊ शकतील. ग्रंथालयात विविध प्रकारचे वाचक येतात त्यांच्या गरजेनुसार त्यांना सेवा प्रदान कराव्या लागतात. विविध विषयानुसार सेवा प्रदान करतांना प्रथम ग्रंथपालाला त्यांच्या विषयाचे ज्ञान अद्ययावत असणे गरजेचे झाले आहे. सर्वच विषयांच्या संबधीत तसेच सर्वच क्षेत्राषी संबधीत ज्ञानाचा व ज्ञानस्त्रोताचा परीचय असणे ग्रंथपालाचे कर्तव्य आहे. कारण कोणत्याही क्षेत्रातील, कोणत्याही विषयाची मागणी आली तरी ती माहीती देतांना ग्रंथपालाची भूमिका अचूक राहली पाहीजे तरच त्याची ज्ञान व्यवस्थापकाची भूमिका सार्थ ठरु शकेल .आज ग्रंथालय व माहिती केंद्रच्या प्रभावी प्रयत्नामुळे ज्ञान व्यवस्थापन अधिक सक्षम व प्रभावी बनव्यास मदतच होऊ शकेल. आणि ग्रंथालयाच्या बदलत्या भुमिकेसाठी ग्रंथलयातील मानवी संसाधनाने स्वतःमध्ये बदल घडवून आणणे गरजेचे झाालेले आहे. त्याच्या बदलत्या भूमिकेवर ग्रंथलयाचे यश अवलंबून राहील.

**निष्कर्ष** :— आजच्या स्पर्धेच्या काळात वेळेला महत्व प्राप्त झाले आहे. वाचक ग्रंथालयात आल्यावर त्यांच्या मागणीनुसार माहितीचा पुरवठा होणे आवश्यक असतो. याकरिता ग्रंथालयात ज्ञान व्यवस्थापन करणे गरजेचे झाले आहे. ग्रंथालयातील ज्ञान व्यवस्थापन जर बरोबर झालेले असेल तर वाचकांना माहितीचा पुरवठा करणे कठीण जात नाही. यात वाचकांबरोबरच ग्रंथालयातील कर्मचा—यांचा वेळ वाचू शकतो. व अधिकाधिक वाचकांना सक्षमपणे सेवा

पुरविता येऊ शकेल. म्हणून ग्रंथालयात ज्ञान व्यवस्थापन करणे महत्वाचे समजल्या जाते.

**संदर्भ सूची** :–

1. पवार, एस.पी. : ग्रंथालय व माहितीशास्त्र, फडके प्रकाशन,कोल्हापूर 2009
2- crl.du.ac.in/ical09/papers/index_files/ical-124_198_418_2_RV.pdf

# नव्वदनंतरच्या आदिवासी काव्यातील सामाजिक भान

**प्रा. राजेश दिपटे**, मराठी विभाग, एम.बी.पटेल महाविद्यालय, साकोली जि. भंडारा

प्राचीन काळापासून एकंदरीत समाजजीवनाचा विचार केला असता आपल्या लक्षात येते की, या देशातील आदिवासी समाज ज्यात गोंड, भिल्ल, कोरकू, आंध, पावरा, इ. हा समाज पिढयानपिढया जंगलात निसर्गाच्या सानिध्यात पहाडात राहून आपली वेगळी निसर्गाधारित संस्कृती जपत आला आहे. आपला जन्म हा वन गिरिकंदरावर अधिराज्य करण्यासाठीच झाला आहे, आपण या देशाचे मूळ राहिवासी आहोत या विचारसरणीवर आधारीत त्यांची जीवन पध्दती आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत या समाजाची दिशा आणि दशा निसर्गाधारित व स्वतंत्र्य संस्कृती जोपासणारी होती.

स्वातंत्र्यानंतर आदिवासी समाजाच्या उत्थानासाठी विशेष सवलतीची तरतद भारतीय राज्यघटनेत करण्यात आली. देश स्वतंत्र्य होता बरोबर देशातील समाजासमोरील प्रश्न लवकर सुटतील ही स्वातंत्र्य प्राप्तीच्यावेळी पाहिलेले स्वप्न भंग झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ठक्करबाप्पा यांच्या प्रयत्नांनी आदिवासी समाज जीवनात हळूहळू लागला व मूक सामाजिक जीवन दबलेल्या आवाजात का होईना अभिव्यक्त होऊ लागला.

नव्वदनंतरच्या काळात बदलेल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, जागतिकीकरण, औद्योगिकीकरण या सर्व क्षेत्रात हा समाज आपले अस्तित्व शोधू लागला. यात विनायक तमराम, वसंत कनाके, वाहरू सोनावने, रवि कुलसंगे, सुरेश धनवे, भुजंग मेश्राम, मारूती कुळमेथे, प्रचलित पितांबर कोडापे, कवडू आत्राम, आदि कविनी या समाज जीवनाच्या वेदना प्रचलित समाजासमोर मांडण्याचा जोरकस प्रयत्न केला. प्रचलित पांढरपेशी व्यवस्थेवर प्रहार करणारी ही कविता असून ती संघर्षप्रवण व भविष्याचा वेध घेणारी आहे .

''स्वातंत्र्याच्या सूर्योदयानंतरही अस्तित्व टिकवून असलेल्या काळोखाच्या विषारी दंशाने घायाळ झालेल्या आयुष्याचे दुःख कवितेच्या रूपाने आज आकारास येऊ लागले आहे.''[1] एकोन्नीसे नव्वदच्या काळातील आदिवासी कवितेचे समाज जीवनात जो सामाजिक बदल घडवून आणला आहे तो पाहणे गरजेचे वाटते , ' उलगुलात ' रूपाने चळवळीला अधिक तिव्र करण्याचा प्रयत्न केला. शोषणाचा प्रतिकारासाठी, अन्याय व अत्याचार झूगारून देण्यासाठी ही कविता आदिवासी समाजबांधवांना जागृत करू लागली.

उध्दाराच्या व परिवर्तनाच्या गप्पा मारणाऱ्या प्रस्तापित वर्गाने आदिवासीच्या कल्याणाचा कधीही विचार केला नाही. अशा या प्रवृत्तीवर कवी भुजंग मेश्राम हल्ला चढवितात कारण पिढयानपिढयांपासून दुर्लक्षित, अन्याय अत्याचाराने पोळलेला आदिवासी जीवन अभिव्यक्त होतांना शब्दाच्या टिणग्या पडणे स्वाभाविक होते. समाजात पेरलेला गरीबीचा, दारिद्रयाचा, शिक्षणाचा अंधकार कवी नेमके शब्दशब्द करतात.

महानगरातील महागर्दी पाहतांना कविला स्वतःच्या अस्तित्वाची आंतरिक भिती वाटू लागते. ती भिती व्यक्त करताना ते म्हणतात –

तू मात्र जागा रहा तुझा गुन्हेगार
वस्तीच्या गल्लीत ,
तुझ्या डोळयात दिसते कारण,
उध्वस्त विद्यापीठ
आपल्या जखमेसहित '
(उलगुलान,अस्तित्व. पृष्ठ–4 )

नव्वदोत्तर कवितेच्या संदर्भात डॉ. विनायक तुकाराम म्हणतात –

''आदिवासी कविता ही आदिवासी साहित्य सृष्टीचे नक्षीदार कोरीव व भक्कम महाव्दार आहे.''[2]

समाजातील अन्याय, अत्याचार पाहुन कवीमन आक्रमक झाल्याचे दिसते, पुरातन काळापासून प्रस्तापीत धर्मपंडितांनी चातविलेले शोषण कविला अस्वस्थ करते, ब्रिटिशांनी ईशपूजनाच्या नावाखाली केलेली फसवणूक कवी शब्दबध्द करतांना म्हणतो की –

''ते आले तेव्हा त्याच्या हातात

बायबल होते नी आमच्या हातात जमीन
देवाजवळ काळा— गोरा नाही या प्रार्थना करून
डोळे मिटले नकळत आशेने उघडले डोळे
तर त्यांच्या हातात जमीन होती,
आमच्या हातात बायबल''
(उलगुलान,ग्रॅन्डफादर पृष्ठ—68 )

अशा प्रकारे इंग्रजांनी या देशातील आदिवासी समाजाला भाविनक स्तरावर भक्ती , दया, करूणा, शांती, या येशूप्रार्थनेच्या नावाखाली नागवण्याचा प्रयत्न केला. भोळयाभाबळया अंध्दश्रध्दाळू, अल्पशिक्षित समाजाला हे इंग्रजांचे फसवणारे ध्येयधोरण समजण्यासारखे नव्हते हे वास्तव चित्रण कवीने ग्रॅन्डफादर या कवितेत मांडले आहे.

आदिवासी साहित्य प्रवाहातील अग्रगण्य आदिवासी साहित्यीक कवी डॉ. विनायक तुकाराम यांच्या ' गोंडवन पेटते आहे ' या कवितेत एकलव्य, कर्ण, बिरसामुंडा , राणी दुर्गावती असे महानायक त्याच्या कवितेचे चिंतन विषय आहेत. '' पहाडाच्या कुसाकुसात आणि काटेरी झुडपाच्या वस्त्यावस्त्यात ज्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण बेडीबंद झाला आहे.''[3]

आदिवासी कवितेच्या प्रवाहातील सजगपणे लिहिणाऱ्या कवियित्री उषाकिरण आत्राम आपल्या कवितेतून मातृसत्ताक परंपरेचा आग्रह धरतांना दिसतात , आर्थिक विषमतेते जगणारा आदिवासी वर्ग रूढी परंपरेच्या पालनामुळे त्यांच्या जीवनाता येणारा अंधार हा त्यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. बाजारहाटातील शिंपी, सावकार, दुकानदार तिच्याकडे वाईट नजरेने पाहतात तेव्हा तीन निमूटपणे सहन न करता आपल्यातील लढाऊ वृत्तीचा वापर करावा असे कवियित्रींना वाटते— —

सावध हो पोरी .......
हो! सूर्यसळी
हो! नागकमळी
हो! सूर्यफूल
हो! तांबडी पळसाची लाल अंगार
तरच उठून दिसल
या बाजार फुक्याले तुहा श्रृंगार
(म्होरकी,श्रृंगार पृष्ठ—25)

हया कवितेतील नायिका आदिवासी समाजातील असून ती कर्तृत्ववान स्त्री आहे. नागकमळी, सूर्यसळी, सूर्यफुल पळसाची लाल अंगार अशा निसर्ग प्रतिमेतून कवियित्री तिचा गौरव करताना तिच्यातील प्रतिकार करण्याच्या शक्तीची जाणीव करून देते.

देशाला स्वातंत्र्य मिळाले पण सुराज्य मिळवता आले नाही याची खंत माधव सरकुंडे या कविच्या कवितेतून जाणवते ,

वा रे स्वातंत्र्य !
उपाशी राहण्याचं स्वातंत्र्य !
भीक मागण्याचं स्वातंत्र्य !
चोऱ्या करण्याचं स्वातंत्र्य !
बलात्कार करण्याचं स्वातंत्र्य !
लबाड बोलण्याचं स्वातंत्र्य !
कुणाला लुटण्याचं स्वातंत्र्य !
पक्षातून फुटण्याचं स्वातंत्र्य !
तडफन जगण्याचं स्वातंत्र्य !
फडफडत मरण्याचं स्वातंत्र्य !
गहाळ केले या स्वातंत्र्याने
(मनोगत, स्वातंत्र्य , पृष्ठ — 34)

देशाला स्वातंत्र्य मिळले, एक तेजस्वी ओजपणा सुरवातीला प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होते, पण, पहिल्या अर्धशकातच सर्वसामान्य, भोळयाभाबळया, दलित, ग्रामीण, आदिवासी बांधवांचा भ्रमनिरास झाला . एकीकडे महानगरांचा झपाटयाने विकास झाला, यंत्रयुग, संगणकयुग शिक्षणाच्या नव्या शाखा अद्ययावत झाल्या, पण दऱ्याखोऱ्यात राहणारा, जंगलाकपारीत, वनाच्या आश्रयाने राहणारा आदिवासी मात्र या व्यवस्थेचा बळी ठरला, त्याच्या जीवनात स्वातंत्र्याची पहाट उगवलीच नाही, एवढेच नव्हे तर, त्यांची परंपरागत रोजगारांची साधने हिरावून घेण्यात आली, त्यांची समृध्द सांस्कृतिक परंपरा या आधुनिकीकरणाने, जागतीकीकरणाने नेस्तनाबूस केली स्वातंत्र्याच्या एवढया कालावधी नंतर देखील आपण त्यांच्यासाठी पर्यायी विविध साधनांचा अवलंब करू शकलो नाही, प्रखर राजकीय ईच्छाशक्तीच्या अभावामुळे आदिवासी जनजीवन अधिकच विष्कळीत व सैरभैर झाला. आदिवासीसाठी विविध शासकिय योजनाचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचू शकला नाही. त्याच्या साठीच्या योजना भष्ट्राचाराने गिळकृत केल्या, त्याचेच वेधक चित्रण कविने स्वातंत्र्य या कवितेतून केले आहे.

दलित कविता ही आक्रमक, झंझावती व प्रस्तापीथ व्यवस्थेला हादरा देत आली, समीक्षकांना निमे बोलायला भाग पाडले, दुर्दैवाने आदिवासी कवितेचे तसे दिसत नाही, ज्या आदिवासी जीवनाला राजसत्तेचा स्पर्श झाला त्याचे प्रतिबिंब मात्र त्यांच्या कवितेतून दिसून आले नाही, सामाजिक व वाङःमयीन दबावगट तयार करण्यासाठी मानवीमूल्यांचे अधिष्ठान असणाऱ्या विज्ञाननिष्ठ

तत्वज्ञानाचा पाया भक्कम असणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून ही चळवळ उभी राहिली ''शिका संघटीत व्हा आणि संघर्ष करा'' या प्रेरणेने शैक्षणिक जागृती आल्यामुळे गावकुसाबाहेर जीवन शोषल्यावरही हा समाज स्वतःची भक्कम पाऊले आज व्यवस्थेमध्ये रूजवू पाहतो आहे. त्या तुलनेत आपल्या आदिम संस्कृतीवर अवलंबून असणारा, सहजासहजी बदलण्यास तयार नसलेला आदिवासी जेव्हा खऱ्या अर्थाने सुशिक्षित होईल ती खरी त्यांच्या परिवर्तनाची नांदी ठरेल.

संदर्भ :–

1) आदिवासी साहित्य स्वरूप आणि समिक्षा – डॉ. विनायक तुमराम विजय प्रकाशन नागपूर, पृ. क्र. 5 प्र आवृत्ती 1994
2) आदिवासी साहिल संसंद ' उलगुलान ' पृ. 19
3) साठोत्तरी मराठी वाङ्‌मयातील प्रवाह – पृ.153,संपादन शनकुमार लिंबाळे, दिलीप राज प्रकाशन , पुणे
4) शतकातील आदिवासी कविता : डॉ. विनायक तुमराम, प्र.आ. 2003, हरीवंश प्रकाशन, चंद्रपुर ऑगष्ट 2003

# भारतीय जातीव्यवस्थेची उत्पत्ती आणि संरचना

**डॉ. उल्हास रामजी राठोड**, समाजशास्त्र विभाग, मॉडेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कारंजा (घा.) जि. वर्धा

भारतीय समाजव्यवस्था ही जगातील इतर समाज व्यवस्थेपेक्षा वेगळी आहे. याचे कारण म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेची रचना जातीव्यवस्थेनूसार झालेली आहे. 'जात नाही ती जात' या पासून तर समान कुल गोत्र, आचारधर्म असलेल्या व्यक्तींचा समुह म्हणजे जात. रीस्ले हा समाजशास्त्रज्ञ जातीची व्याख्या अशी करतो. पुराणकाळातील दैवी किंवा मानवी पूर्वजांचा वंष म्हणून सांगणारा, परंपरागत एकूणच व्यवसाय करणारा, एक विशिष्ट नांव धारण करणारा, अनेक कुटुंबांचा एकजिनसी गट म्हणजे जात होय. जातिची व्याख्या करणे तसे अवघड आहे. परंतू त्या व्यवस्थेची वैशिष्टये वेगवेगळया विचारवंतांनी वेगवेगळया पध्दतीने मांडली आहे.

प्रत्येक समाजाचे विभाजन व स्तरीकरण हे व्यावसायिक किंवा आर्थिक घटकांवर अवलंबून असते तसेच सामाजीक स्तरीकरण हे सामाजिक नियंत्रणासाठी आवश्यक आहे. स्तरीकरणातून सामाजिक नियंत्रण प्रस्थापीत होवून समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण केल्या जावू शकते पण हिंदू समाजाचे विभाजन हे पितृक आधारावर आहे. हिंदू समाज हा चार वर्णामध्ये विभाजित असून ते ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे आहेत. सुरूवातीच्या काळात आर्यामध्ये कोणतेंच विभाजन नव्हते पण जेव्हा भारतात आले आणि अनार्य त्यांच्या संपर्कात आले तेव्हा हा आर्य समाज दोन भागात विभागल्या गेला ते विभाग म्हणजे – (1) वेदांना जाणणारा आर्य. व (2) वेदांना न जाणणारा अनार्य समाज. असे दोन विभाग झाले आहे. नंतर कार्याच्या आधारावर ब्राम्हण जे शिकवते व शिकते आणि धार्मिक कार्य करते ते लोक समाविष्ट करण्यात आले. क्षत्रिय यामध्ये युध्द आणि शासन करणारे लोक समाविष्ट होते वैश्य या मध्ये व्यापार व शेती करणारे लोक समाविष्ट होते शुद्र यामध्ये अनार्य व अन्य तीन वर्गाची सेवा करणारे लोक समाविष्ट होते सुरवातीला या व्यवस्थेला वर्ण व्यवस्था संबोधल्या जायचे व वैदीक काळापर्यंत ही चातूर्वर्ण व्यवस्था लवचिक होती कारण हा कर्मावर वर्ण बदल करणे शक्य होते. तसेच शुद्र सोडून अन्य सर्व वर्णामध्ये परस्पर संबंध होते कार्याच्या आधारावर अधिकार सुध्दा परिवर्तीत होत होते. वैदिक काळानंतर वर्णव्यवस्थेचे समर्थन धर्म व तर्क या आधारावर केले जावू लागले पुरूषसुक्तामध्ये असे म्हटले आहे की, ईश्वराने आपल्या शिलेतून ब्राम्हण, भुजांमधून क्षत्रिय, कटिकेमधून वैश्य आणि चरणातून शुद्रांना जन्म दिला. कपीलने या वर्णव्यवस्थेचे समर्थन मानव आणि निसर्गाच्या विभीन्न आधारावर केले आहे. यामध्ये अनेक सात्विक गुणांनी युक्त व्यक्तीला ब्राम्हण संबोधले राजस गुणांनी युक्त व्यक्तीला क्षत्रिय व वैश्य आणि तामस गुणांनी युक्त व्यक्तीला शुद्र संबोंधले. तसेच तर्काच्या आधारावर सुध्दा या व्यवस्थेचे समर्थन केले आहे. आत्म्याच्या आवा–गमणाच्या सिध्दांतानूसार आत्मा वेळोवेळी जन्म घेतो त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचा वर्ण हे मागील जन्माचे कर्म–कर्माचे फळ आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या धर्माचे पालन केले पाहीजे.

आर्यांची चार्तुवर्ण व्यवस्था उदारता व व्यावहारिक उपयोगीतेवर आधारित असून त्यावेळी विजयी व्यक्ती पराजयी व्यक्तीला नष्ट करत होता किंवा दास बनवत होता भारतीय आर्यांना मात्र पराजीत व्यक्तीला आपल्या समाजात स्थान दिले तसेच जेव्हा चार्तूवर्ण व्यवस्था निर्माण झाली तेव्हा भारतीय अनार्याना सुध्दा त्यामध्ये

सामील केले गेले. तसेच सुरवातीला वर्णव्यवस्था कार्यावर आधारीत होती म्हणजेच चार्तुवर्ण व्यवस्था ही उदारतापुर्वक निर्माण झाली त्याच बरोबर अनार्याला आर्य समाजात स्थान देवून व्यावहारिक उपयोगिता सुध्दा निर्माण झाली म्हणजेच आर्य व अनार्य मिळून समाज निर्माण झाला. त्यामुळे प्रगती शक्य झाली त्यातुन समाजात स्थिरता, सुरक्षितता निर्माण झाली पर्यायाने विकास घडुन आला.

अशा प्रकारे चार्तूवर्ण व्यवस्थेची निर्मिती उदारता व सामाजिक वर्गाद्वारे देण्याघेण्याच्या भावनेच्या आधारे झाली. एकीकडे योग्यतेनुसार स्थान प्राप्त करण्याची संधी व्यक्तीला मिळाली तर दुसरीकडे सामाजिक सदस्यांना एका साखळीत घेवून उच्चशृंखला प्रवृत्तीच्या मतांनी मर्यादित केले त्यामुळे समाजिक एकता मिर्माण होण्यास मदत मिळाली. तसेच वर्णव्यवस्था जोपर्यंत जाती व्यवस्थेमध्ये रूपांतरीत झाली नाही तोपर्यंत ती भारतीय समाजात एकात्मता, अखंडता व सुरक्षितता निर्माण करण्यात प्रभावी ठरली होती कालांतराने चार्तुवर्ण व्यवस्थेचे परिवर्तन झाले व सुत्र काळात धर्म व तर्कस्थानावर आधारित व्यवस्था कठोर झाली हळुहळु वर्ण बदल करणे कठीण झाले तसेच विभीन्न वर्णामध्ये विवाह, खाणपान संपुष्टात आले विविध वर्ण छोटया छोटया वर्णात विभाजीत झाले तसेच ही वर्ण व्यवस्था आधूनिक जातीव्यवस्थेत परावर्तित झाली. ज्यामध्ये चार प्रमुख जातीच्या अंतर्गत हजारो उपजाती निर्माण झाल्या. जातीय व्यवस्थेमध्ये भारताची विशालता– विभिन्नता व्यवसायाच्या आधारावर नविन जातीची निर्मिती झाली विदेशी व्यक्तीना हिंदुत स्थान देणे तसेच वेगेवेगळया जातीमध्ये पारस्पारीक स्पर्धा संकुचित मनोवृत्ती समाज नियम निर्माण करणाऱ्या कायद्याच्या शक्तीचा अभाव मुंसलमानांचे आक्रमण इ. कारणामुळे आधुनिक हिंदू समाज तीन हजार पेक्षाही अधिक जातीमध्ये व उपजातीमध्ये विभाजित झाला आहे व त्यामध्ये कोणताही सामाजिक संपर्क शक्य नाही त्याचबरोबर प्रत्येक जात आपल्याला इतरापेक्षा श्रेष्ट समजते त्यामुळे हिंदू समाजामध्ये अस्पृश्यता निर्माण झाली. अशा अस्पृश्यांना आर्य समाजात कोणतेच स्थान नव्हते.

जातीव्यवस्थेचा उगम कसा झाला याबाबतही वेगवेगळे मतप्रवाह आहेत या व्यवस्थेनुसार जात ही जन्मावरून निश्चित होते ही एक श्रेणीबध्द समाजव्यवस्था असून एका जातीतून दुसऱ्या जातीत जाता येत नाही. जाती व्यवस्थेच्या श्रेणीनुसार उच्च जातींना जादा सवलती तर कनिघ्ठ जातींना कमीत कमी सवलती देण्याची तरतूद आहे या व्यवस्थेनुसार जातीच्या बाहेरच्या व्यक्तीशी रोटी–बेटी व्यवहार वर्ज्य असतात ही विषमता भेदभावावर आधारित असून या व्यवस्थेच्या तळाशी असलेले शूद्र–अतिशूद्र यांना अमानवी वागणूक दिली गेंली समाज सुधारकांनी ही व्यवस्था नष्ट व्हावी म्हणून अनेक प्रयत्न केले महात्मा फुले, डॅा. बाबासाहेब आंबेडकर यांनी या व्यवस्थेवर प्रहार केले. या व्यवस्थेची वैशिष्टये अशा प्रकारे विशद करता येईल.

1) प्रत्येक जात हा समाजाचा विभक्त गट असतो. 2) जाती जातीत उच्च नीचता पाळली जाते. 3) रोटी–बेटी व्यवहारावर बंदी असते. 4) व्यवसाय स्वातंत्र्यावर बंदी असते.

जातीय व्यवस्थेने हिंदू समाजाला वर्तमान काळामध्ये हजारो खंडात विभाजीत केले आहे. त्यामुळे सामाजिक एकता व अखंडता धोक्यात आली आहे सैनिकी दृष्टीने देखील भारत दुर्बल बनला आहे. कारण सैनिकांसाठी क्षत्रियच असावे हे त्यांचेच काम आहे. असे समाजनिष्ट घटक समजतो. आज उच्च जातीकडून निम्न जातीचे शोषन वाढले आहे. राष्ट्रीय एकता धोक्यात आली आहे जातीय व्यवस्था व्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधी आहे बौध्दीक आणि आर्थिक प्रगतीत अडथळा निर्माण करणारी आहे. पारस्पारीक द्वेष व घृणा निर्माण करणारी आहे.

आधूनिक समाजामध्ये जातीय व्यवस्था दुर्बल होत आहे. ते पूर्णपणे संपूष्टात येणे हिंदू धर्माच्या हिताचे आहे. जातीय भेदभावाचे समर्थन धर्म–कर्म इतिहास सामाजिक न्याय या कोणत्याही आधारावर करता येत नाही 'श्रीकृष्णाने गीतेमध्ये असे म्हटले आहे की, योग्यता व कर्माच्या आधारावर विभीन्न वर्णाची निर्मिती केली, याचाच अर्थ असा होतो की, जन्माच्या आधारावर समाज विभाजन हे त्यानाही अमान्य हाते. के. एम. पनीकरांनी विभाजनाचा मुळ आधार संयुक्त कुटुंब मानले आहे. त्यांच्या मते धर्म व तर्क या आधारावर या जातीय व्यवस्थेचे समर्थन करणे शक्य नाही.

**जातीप्रथेची निर्मिती :–**

1) **रंगाच्या (वर्णाच्या) आधारावर** – काही विचारवंताच्या मतें, भारतात जाती प्रथेच्या निर्मिती मागे वर्णभेद प्रमुख कारण आहे. गौर वर्णाचे लोक आर्य समजल्या जाते. तर शाम (काळया) वर्णाचे लोक अनार्य किंवा दास समजल्या जाते.

2) **पुरूष सुक्ताच्या आधारावर** – ईश्वराने मुखातून ब्राम्हण, भुजेतुन क्षत्रिय, जांगेतुन वैष्य, आणि पायाच्या आंगठयातून षुद्रांची निर्मिती केली असा उल्लेख आहे.

3) **श्रमविभाजनाच्या आधारावर** – आधुनिक विचारवंताच्या मते जातीप्रथेची सुरूवात श्रमविभाजनाच्या आधारावर झाली असून जे लोक देषाच्या रक्षणाचा भार उचलतात ते क्षत्रिय, जे लोक शिक्षण देण्याचे कार्य, यज्ञ, पुजापाठ करण्याचे कार्य, धार्मिक संस्कार करण्याचे कार्य करते ते ब्राम्हण, शेंती आणि व्यापार करण्याचे काम करतात ते वैश्य आणि या तिन्हीची सेवा करणारे लोक शुद्र समजल्या जावू लागले. पुरातन काळापासून चालत आलेल्या जातीप्रथेचे परिणाम आधुनिक काळातही जाणवते.

**आधुनिक काळात जाती व्यवस्था कमजोर होण्याची कारणे** :– 1) पाश्चात्य विचारसरणी, 2) नवीन आर्थिक व्यवस्था, 3) राजनैतिक आंदोलन, 4) विविध सामाजिक व राजकीय विचारधारा, 5) औद्योगिक विकास, 6) नागरीकरण/शहरीकरण, 7) वैज्ञानिक दृष्टीकोन, 8) सामाजिक न्याय.

वरील कारणामुळे आधुनिक काळात जातीय व्यवस्था दुर्बल होवून समाजाची प्रगती होत आहे. आणि सकारात्मक बदल मानवी हीताच्या दृष्टीने समाजात दिसून येत आहे. यामुळे सामाजिक सुरक्षितता, मानवतावाद निर्माण होण्यास मदत मिळत आहे आणि आशावादी दृष्टीकोन मानव समुहामध्ये निर्माण होत आहे.

एकोणीसाव्या शतकामध्ये सर्व हिंदू धर्मावलंबित व समाजसुधारकांनी या व्यवस्थेचा विरोध केला होता स्वामी विवेकानंद, गौतम बुध्द यांच्यापासून तर राजा राममोहन रॉय यांच्या काळापर्यंत सर्व व्यक्तींनी जाती प्रथेला धार्मिक संस्था मानण्याची चूक केली आहे. विसाव्या शतकात महात्मा गांधींनी जातीय व्यवस्था निर्मूलनाकरिता प्रयत्न केले आज देखील जाती प्रथा निर्मूलनाकरिता शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे.

भारतात इस्लामच्या शिकवणुकीच्या व ब्रिटीशांनी बरोबर आणलेल्या आधुनिकतेचा प्रभाव येथील सामाजिक सुधारणांवर होवून त्यांनी जातिभेदाविरूध्द परिणामकारकपणे कार्य केले. भारतीय राज्यघटनेने तर जातीभेद अमान्य करून अस्पृश्यता मानणे हा कायद्याने गुन्हा ठरविला आहे तरी देखील राजकारण, अर्थकारण व समाजकारन यात जातीव्यवस्थेचा प्रभाव कमी झालेला दिसत नाही.

**संशोधन विषयाची उद्दिष्टये** :– 1) जातीव्यवस्थेच्या उत्पत्तीचा शोध घेणे. 2) जाती व्यवस्थेच्या आधारावर सामाजिक लाभांचा अभ्यास करणे. 3) जातीव्यवस्थेमुळे झालेल्या सामाजिक हानीचा अभ्यास करणे. 4) जाती व्यवस्थेसंबंधी सुधारणात्मक दृष्टीकोनातुन उपाय सुचविणे. 5) देशाची सुव्यवस्था, अखंडता टिकवून ठेवण्यासाठी उपाय सूचविणे.

**अभ्यास पध्दती** :– प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे तथ्य संकलनासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, विविध लेख, मासिके, वृत्तपत्रे यांचा आधार घेतला आहें.

---

संदर्भग्रंथ सूची :

1) भारतीय सामाजिक व्यवस्था– डॉ सुधीर राजाराम देबरे
2) प्राचीन भारत का सामाजिक इतिहास – रश्मि पाठक
3) प्राचीन भारत का इतिहास – व्ही. डी. महाजन
4) प्राचीन भारत का इतिहास – राजगिर शास्त्री
5) भारतीय समाजिक समस्या – डॉ. एस. चंद्रकुमार राय
6) आधुनिक भारत के सामाजिक परिवर्तन – डॉ. संजीव महाजन
7) समाजशास्त्र विश्वकोष – हरिकृष्ण रावत
8) सर्वधर्मकोश – डॉ. रामस्वरूप राशीकेष

# 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण': ग्रंथ समीक्षण

**डॉ. नलीनी बोरकर–भगत,** समाजशास्त्र विभाग, कला, वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेटोलपंप, जवाहरनगर, जि. भंडारा

डॉ. दीपक पवार यांचे आचार्य पदवीच्या संशोधनासाठी लिहिण्यात आलेल्या प्रबंधाचे विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली व्दारा प्राप्त फेलोशिप च्या अंतर्गत नागपूरच्या साईनाथ प्रकाषन ने 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित केला आहे. डॉ. दिपक पवार यांचा हा ग्रंथ अत्यंत अभ्यासपूर्ण व दर्जेदार झालेला आहे. लेखक समाजशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक आहेत आणि त्यामुळे या गुंतागुंतीच्या विषयाला त्यांनी अत्यंत सोपे करून सांगितले आहे. समाजव्यवस्थेत अनेकदा असे म्हटले जाते की, संसार रथाची दोन समान चाके म्हणजे स्त्री व पुरूष होत परंतू भारतातच नव्हे तर इतर सर्व देषात स्त्रीला पुरूषापेक्षा गौण स्थान दिलेले आहे तेही याच समाजव्यवस्थेने.

स्त्रिला सुध्दा पुरूषांप्रमाणे सर्व क्षमता प्राप्त असतात परंतू तरीही तिचे क्षेत्र मात्र 'घर आणि आंगण' या पलीकडे जावू दिले जात नव्हते त्याला कारणीभूत पुरूषी मानसिकता. पुरूषप्रधान संस्कृतीने एकीकडे 'यत्र पुज्यते नारी तत्र रमनो देवता' असे म्हणून तिला देवी बनवले परंतू सामान्य माणूस म्हणून तिचे अधिकार तिला सहजतेने बहाल केले नाहीत. बौध्द कालीन स्त्रिया याला अपवाद ठरतात, कारण तथागत भगवान बुध्दांनी अडीच हजार वर्षापूर्वीच स्त्रि ही पुरूषांच्या बरोबर आहे, तिलाही षिक्षण घेण्याचा अधिकार आहे हे सांगितले होते. परंतू पूरणकाळात मात्र स्त्रिची तुलना ढोर, गवार व पषू यांच्यासोबत करण्यात आली.

स्त्रियांना त्यांच्या हक्काची जाणिव व्हावी असे वाटत असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे या क्रांतीकारी विचारासह सनातनी समाजांचा कमालीचा रोष पत्करून महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले या दांपत्याने नवीन इतिहास रचला. पुढील काळात याच पावलांवर पाऊल ठेवत क्रांतीसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदामंत्री असतांना हिंदू कोडबीलाच्या माध्यमातून हे कार्य पुढे नेले. बाबासाहेबांनी संविधानात स्त्रियांना समानतेचे हक्क व अधिकार बहाल केले. यामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण घडून आले. अनेक स्त्रिया उच्च शिक्षण घेवू लागल्या. त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनातही भाग घेतला. स्त्रियांमध्ये जागुती निर्माण होऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर महिला सुधार चळवळींना चालना मिळाली एकूण काय तर भारतीय समाजात स्त्रि जिथे तुच्छतेची वागणूक मिळत होती तिथे तिच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक सक्षमिकरणास गती मिळाली. परंतू अजूनही एक क्षेत्र होते जे स्त्रिला नवखे होते आणि ते म्हणजे राजकीय क्षेत्र होय. म्हणून 24 एप्रील 1993 ला महिलांना स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राज मध्ये 33 टक्के आरक्षण देण्यात यावे यासाठी 73 आणि 74 वी घटना दूरूस्ती करण्यात आली. आरक्षणामुळे अनेक महिला राजकारणात आल्यात, पक्षीय राजकारणातही त्यांचा सहभाग वाढला. हे 33 टक्के आरक्षण महाराष्ट्रात 14 एप्रील 2011 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी 50 टक्के करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायती राज प्रमाणेच विधमंडळातही महिलांना 33 टक्के आरक्षण मिळावे अशी मागण कली जात आहे. या राजकीय क्षेत्रातील भरारीमुळे स्त्रियांचे मनोबल उंचावलेले आहे. त्यांच्यामध्ये राजकीय सामाजिकरणाचे नवे पर्व सुरू झाले आहे. त्यांच्या भुमिका, दर्जा व स्थानातही बदल घडून येत आहेत. हे परिवर्तन अधोरेखीत करण्यासाठी प्रस्तुत अध्ययन लेखकांनी केलेले आहे. या ग्रंथात महिलांच्या राजकीय सक्षमीकरणांचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात आले आहे.

या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात भारतातील स्त्रियांची स्थिती व दर्जा यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. भारतातील स्त्रियांचा दर्जा व स्थिती दर्शवितांना लेखकांनी त्याची विभागणी दोन भागात केलेली आहे. पूरातन काळ आणि आधुनिक काळ, पुरातन काळातील सिंधू संस्कृतीमधील स्त्रियांना पुरूषा प्रमाणेच सर्व अधिकार होते परंतू मुलाला जन्म देण्याचा नैसर्गिक अधिकार फक्त स्त्रिलाच प्राप्त आहे म्हणजे तिच्याकडे एखादी चमत्कारीक शक्ती आहे असे समजले जात असे त्यामुळे तिचा दर्जा पुरूषांपेक्षा श्रेष्ठ मानला जात असे यातूनच मातृसत्ताक कुटुंब पध्दतीचा उदय झाला. पुढे भटके जिवन संपुष्टात येऊन मानवाला कृषीचा शोध लागला. शेतीमुळे मानव स्थिर जिवन जगू लागला परंतू अजूनही कुटुंबात सर्वोच्च स्थान हे स्त्रिलाच होते.

वैदिक काळात आर्यांचे आगमण झाले. हा पशुपालक समाज होता आणि पशुपालक समाज पुरूषप्रधान असल्यामुळे त्यांच्या समाजात स्त्रियाला दुय्यम स्थान होते. इथे लेखक प्रसिध्द समाजतज्ञ 'बॅकोफेन ब्रिफॉ' यांच्या विचारांचा उल्लेख करतात. बेकोफेन म्हणतात भटक्या पशुपालन अवस्थेतील लोकांची समाजरचना पुरूषप्रधान

असते, तर प्राथमिक कृषीजिवी समाजाची रचना मातृसत्ताक स्त्रीप्रधान असते'. वैदिक काळात स्त्रिया दोन प्रकारच्या होत्या – ब्रम्हवादीनी आणि सदोवधू. ब्रम्हवादींनीना उपनयन, अग्नीहोत्र, वेदाध्ययन आणि स्वगृही भिक्षाचार्या या गोष्टी करता येत असत तर सदोवधूंचे नावापुरतेच उपनयन करून विवाह केला जात असे. या काळातील गार्गी, मैत्रयी, घोषा, लोपामुद्रा या स्त्रिया ब्रम्हवादींनी होत, या तत्कालीन वैदिन स्त्रियांचे प्रतिनिधित्व करीत नाही तर त्या अपवाद होत्या. धार्मिक बाबतीतही या काळात स्त्रिला फारसे अधिकार नव्हते.

उत्तर वैदिक काळात मात्र स्त्रियांचा सर्वच प्रकारे दर्जा खालावलेला दिसतो असे लेखक स्पष्ट करतात. याच कालखंडात स्त्री शुद्र आहे, स्त्री वेली प्रमाणे कोणत्याही पुरूषाला बिलगते, हजारो स्त्रियांत एखांदी पतिव्रता असते अशी विचारसरणी निर्माण झाली. स्त्रि पुरूष भेद विकोपाला पोहचला आणि मुलगी जन्माला घालणे पाप समजले जावू लागले. स्त्रिला पूर्णपणे पुरूषांच्या अधिन करून तिला गुलाम बनविण्यात आले. या काळात स्त्रि ला सर्वोतोपरी शुद्र समजले जावू लागले. कारण मुळचे द्रविड लोक व त्यांची संस्कृती आर्यांनी नष्ट केली होती व लढाई जिंकून त्यांना आपले गुलाम बनविले होते.

बौध्द काळात गौतम बुध्दांनी स्त्री–पुरूष असा भेद केला नाही तर त्यांनी स्त्रिस्वातंत्र्याचा विचार मांडला आणि त्याची अमंलबजावणी सुध्दा केली. स्त्रियांना भिक्षुसंघात प्रवेश दिला व केवळ श्रीमंत किंवा राजघराण्यातीलच स्त्रियांना नव्हे तर वेश्या, गणिका, दासी यांना सुध्दा प्रवेश दिला. वैदिक धर्माने स्त्रियांना मानसिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक गुलामगिरीत टाकले होते. बुध्दांनी त्यांना गुलामीतून मूक्त केले. बौध्द तत्वज्ञानामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्यात मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'The rise and fall of the Hindu Women : who was responsible for it' या लेखात म्हणतात ''बौध्द काळ हा स्त्रियांच्या उन्नतीचा काळ होता तर मनुस्मृतीच्या काळापासून स्त्रियांची अवनती झाली''.

मनुस्मृती ही तर 'स्त्री निंदेची गीता आहे' असे विचार लेखक मांडतात. स्त्री ही केवळ वाईटच नाही तर ती अपवित्र ही आहे अशी विचारसरणी मनूने निर्माण केली. मनूस्मृतीने स्त्रिया प्रजननासाठी असतात असे लिहीले तर कौटील्याने अर्थशास्त्रात स्त्रिया पुत्र निर्मितीसाठी असतात असे लिहिले आहे. लेखक इथे पंडिता रमाबाई यांचे विचार मांडतात. त्या म्हणतात, कायदेपंडीत मनू हा त्या शंभरातला एक आहे, ज्यांनी स्त्रियांना या जगाच्या नजरेतून अत्यंत तिरस्कारणिय बनविले. तिला बालसंगोपणात व घरकामात गुंतविले तरच ती पुरूषाच्या अधिन राहील असे तो म्हणतो.

मध्ययुगीन कालखंडात तर बालविवाहासारखी क्रुर प्रथा सुरू झाली. मुस्लिम शासकांच्या काळात तर स्त्रिला केवळ उपभोगाची वस्तू समजले जावू लागले. परंतू या काळातही महात्मा बसवेश्वर, मंहमद तुगलक आणि बादशहा अकबराने सुधारणा केल्याचे दिसून येते. 'ऐने अकबरी' या ग्रंथात 'भारतीय स्त्रियांच्या हक्काची पहिली सनद' म्हणून सती जाण्यावर बंदी, हिंदू स्त्रियांना पूर्नविवाहाचा अधिकार, बालविवाह बंदी, जरठविवाह बंदी, वेश्या व्यवसायासबंधी अशी कलमे टाकण्यात आली होती.

आधुनिक काळातील स्वातंत्र्यपूर्व कालखंडात भारतात राजा रातमोहन रॉय आणि व्दारकानाथ टागोर यांनी स्त्री मुक्ती चा भारतीय प्रवास सुरू केला. राजा राममोहन रॉय यांनी बालविवाह, बहुपाणी विवाह, कुळपरंपरा, सतीप्रथा यांना विरोध केला तर स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, आंतरजातीय विवाह यांना उत्तेजन दिले. त्यांच्या आंदोलनामुळेच 4 डिसें, 1829 ला इंग्रजानी सती प्रथे विरूध्द आंदोलन केले. याच काळात इश्वरचंद्र विद्‌यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, न्या. रानडे, पंडीता रमाबाई, आनंदीबाई जोशी, एफ. सोराबजी, ॲनीबेझंट, गोपाळ गणेश आगरकर इत्यादींनी स्त्री सुधारणेच्या चळवळी निर्माण केल्या.

याच काळात शिक्षणाचे प्रणेते महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म झाला. त्यांनी शुद्र व स्त्रि यांच्या शिक्षणासाठी स्वतःला वाहून घेतले. सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात ते नमुद करतात की, आपल्या निर्माणकर्त्यांने स्त्री व पुरूषाला जन्मताच स्वतंत्र व एकंदर सर्व अधिकाराचा उपभोग घेण्यास पात्र केले आहे म्हणून स्त्रि ही कनिष्ठ आहे असे मानने चुकीचे आहे. स्त्रिही गुलाम होऊ शकत नाही. ज्योतीबांना तेवढीच मोलाची साथ दिली ती सावित्रीबाई फुल्यांनी, जोतीबांच्या निधनानंतरही स्त्री मुक्तीची चळवळ त्यांनी जोमाने राबविली.

गांधीजींच्या उदयानंतर खऱ्या अर्थाने स्त्रियांचा राजकीय सहभागाचा प्रवास सुरू झाला. गांधीजींच्या स्वातंत्र्य लढयाला प्रतिसाद म्हणून अनेक स्त्रियांनी चभ्वळीत सक्रीय भाग घेतला. म. गांधीनी 1936 च्या अखिल भारतीय महिला परिषदेत 'अबला ते सबला' हा संदेष दिला महिलांच्या विविध संघटना 1912 पासून स्थापन झाल्या, 1917 मध्ये महिलांची अखिल भारतीय समिती मद्रास येथे स्थापन झाली. या समितीच्या अध्यक्षा

डॉ. ॲनी बेझंट होत्या. 1929 ला अखिल भारतीय महिला परिषद या संघटनेची स्थापना झाली. 1937 मध्ये प्रातीक कायदेमंडळाच्या निवडणुकीत 54 स्त्रिया निवडून आल्या होत्या. 1 जुलै 1942 मध्ये नागपूर येथे अस्पृश्य स्त्रियांची परिषद झाली. या परिषदेला उपदेश करतांना डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना शिक्षण घेऊन प्रगती करण्याचा उपदेश दिला होता.

स्वातंत्र्योत्तर काळात 1960 मधील भूदान चळवळीत स्त्रियांनी सक्रीय भुमीका वठवली. 1970 च्या चिपको आंदोलनात सुध्दा स्त्रियांचा मोठा वाटा होता. 1980–90 मध्ये महाराष्ट्र शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीने बरीच कामगिरी केली. 1975 हे संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष आणि 1975–85 हे महिला दशक घोषीत केले. 1970 ते 2000 च्या दरम्यान अनेक महिला संघटना निर्माण झाल्यात. 73 व्या आणि 74 व्या घटना दुरूस्तीने स्त्रियांना राजकारणात 33 टक्के आरक्षण मिळाले ते आता 90 टक्के इतके असावे अशी मागणी विविध महिला संघटना कडून होत आहे.

या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणात लेखक भारतीय संविधानाने महिलांना दिलेले हक्क व तरतुदी यांचा उहापोह करतात. संविधान कर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रि स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी भारतीय राज्यघटनेत स्त्रियांना समान अधिकार दिलेले आहेत. घटनेच्या कलम 15 नूसार लिंगभेदाच्या आधारावर कोणत्याही नागरिकां विरूध्द राज्य भेदभाव करणार नाही. म्हणजेच स्त्री ही पुरूष समान आहेत. 19 व्या कलमानुसार स्वातंत्र्याचा हक्क मिळाला. 16 व्या कलमानुसार लिंगभेदामुळे सेवायोजन किंवा पदाकरीता अपात्र ठरविता येणार नाही यामुळे स्त्रियांना नोकरीत समान संधी मिळाली. कलम 39 (क) नुसार उपजिविकेचे पुरेसे साधन मिळविण्याचा हक्क स्त्रि व पुरूष नागरिकांना सारखा असावा. 39 (घ) समान कामाबद्दल समान वेतन मिळावे. 39 (क) नूसार समान न्यायाची तरतूद केल्या गेली. घटनेच्या राज्यधोरणाच्या निर्देशक तत्वातील कलम 42 नुसार स्त्रियांकरीता प्रसुतिविषयक सहाय्याकरिता तरतुद केली आहे.

भारतीय राज्यघटनेच्या पंचायती कलम 243 घ (4) नूसार ग्राम किंवा अन्य कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील पदे राज्याचे विधिमंडळ कायदयाव्दारे तरतूद करेल, अशा रीतीने महिलांकरीता राखून ठेवण्यात येतील. तसेच प्रत्येक पातळीवरील सभासदांच्या एकुण संख्येत 1/3 पेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील. त्याच प्रमाणे नगरपालिका अनुच्छेद 243 घ (4) नुसार नगरपालिकेत 1/3 जागा महिलांकरीता राखून ठेवण्यात आल्या आहेत त्यामुळे महिलांना पंचायत पातळीवर आणि नगरपालिका क्षेत्रात 1/3 टक्के राजकीय स्थाने मिळविण्याची संधी मिळाली. इतकेच नाही तर 1/3 टक्के अधिकाराची पदे पंचायती व नगरपालिका पातळीवर आरक्षीत झाली. कलम 300 (क) नुसार स्त्री देखील मालमत्तेची समान वारसदार झाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदामंत्री असतांना हिंदू कोउबिलाव्दारे  त्यांनी हिंदू महिलांना अनेक अधिकार देवू केले होते परंतू हिंदू धर्म मार्तडांनी त्याल विरोध करून सप्टें. 1951 मध्ये बाबासाहेबांना राजिनामा देण्यास भाग पाडले परंतू आता तेच हिंदू कोडबिल तुकडया–तुकडयात पारित करण्यात आले. हिंदू विवाह कायदा 1955, हिंदू वारसा कायदा 1956, हिंदू अज्ञान पालकत्वाचा कायदा 1956, विशेष विवाह कायदा 1956, हिंदू दत्तक आणि पालनपोषण कायदा 1956 तसेच गर्भपात कायदा 1971 हा एक होय.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या सहभागावर प्रकाश टाकतांना लेखक 1952 ते 2009 दरम्यान संसदेतील महिलांच्या सहभाची आकडेवारी प्रस्तुत करतात. त्यानंतर भारताच्या मंत्रिपरिषदेत महिलांचा सहभाग 1952 ते 2009 या कालावधीतील आकडेवारी प्रस्तुत करतात. तसेच 1962 ते 2009 दरम्यान महाराष्ट्रात विधिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व याची आकडेवारी प्रस्तुत करतात. भारताच्या मंत्रीपरिषदेत महिलांचे प्रमाण या टेबलमध्ये 2004 या वर्षी हे प्रमाण सर्वाधिक म्हणजे 11 आढळले तर महाराष्ट्र विधिमंडळाच्या प्रतिनिधित्वामध्ये 1972 च्या निवडणूकीत महिलांचे प्रमाण 10.33 टक्के हे सर्वाधिक आढळते. प्रत्यक्ष निवडणूक न लढविता मतदार स्त्री म्हणून 1984 व 2009 च्या निवडणुकीत स्त्री मतदारांची टक्केवारी पुरूषांच्या तुलनेत जास्त आढळते.

पक्षीय राजकारणात भारतातील संसद आणि विधिमंडळातील सहभागाबरोबर, पक्षीय सर्वोच्च समित्यांच्या राजकारणात देखील स्त्रियांचा सहभाग हा कमीच राहिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज मध्ये महिला आरक्षण प्राप्त झाल्यामुळे स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. महाराष्ट्राचे उदाहरण देतांना लेखक म्हणतात की, 1997 च्या निवडणुकीत 29 जिल्हा परिषदांमधुन 587 महिला निवडून आल्या आहेत. 319 पंचायत समित्यावर 1974 महिला आहेत तर राज्यातील एकुण 43 हजार गावातील

27656 ग्रामपंचायतीवर 80 ते 85 हजार महिला निवडून आल्या आहेत. यात महाराष्ट्रात अधिकार पदावर निवडून आलेल्या स्त्रियांपैकी 10 जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा, 106 पंचायत समिती सभापती,आणि 9000 अधिक महिला सरपंच पदावर कार्यरत होत्या.

हा बदल 73 व 74 व्या घटनादुरूस्तीने मिळालेल्या आरक्षणामुळे घडून आला व त्यामुळे महिलांमध्ये नवा स्व–विश्वास निर्माण झाला.

या ग्रंथाच्या तिसऱ्या प्रकरणात राजकीय सहभागाची समाजशास्त्रीय संकल्पना तसेच क्रियाशील महिलांची समाजशास्त्रीय संकल्पना लेखकांनी स्पष्ट केली आहे. राजकीय सहभागाची संकल्पना स्पष्ट करतांना लेखक जे. एल. वुडवर्ड, एफ रॉबर्ट, लेस्टर डब्ल्यु, मिलवर्थ, कल्पना रॉय, रश आणि आलझफ, मिलबर्थ इत्यादी विचारवंताचे विचार मांडतांना वरिल सर्व विचारवंताच्या मतावरून लेखक राजकीय सहभागाची संकल्पना मांडतात ही अशाप्रकारे :

1) एखादया राजकीय पक्षाचे सभासदत्व स्वीकारणे आणि पक्षशिस्त म्हणून त्या पक्षाने घेतलेल्या निर्णयाला पाठींबा देणे. 2) त्या राजकीय पक्षाच्या सभा किंवा मेळाव्यास उपस्थित राहणे, पक्षाकरीता सभा किंवा मेळावे घणेव त्या पक्षाची ध्येय धोरणे, मते लोकांवर बिंबवणे आणि पक्षाच्या समर्थनाकरीता जनतेला आकर्षीत करणे. 3) पक्षाच्या गुप्त सभांना उपस्थित राहणे किंवा आयोजित करणे, त्यातील राजकीय चर्चेत सहभागी होणे, मन मांडवे तसेच पक्षा करीता इतर पक्षातील माहिती, व्युहरचना, नियोजन व इतर गुप्त माहिती मिळविणे आणि ती पक्षप्रमुखांपर्यंत पोहचवेन त्यानुसार स्वजःच्या पक्षाची व्युहनिती बनविणे. 4) पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढविणे किंवा पक्षाच्या उमेदवाराला निवडून आणण्यात सर्व ते प्रयत्न करणे. मतदारांना पक्षाकरिता आकर्षित करणे. 5) पक्षाचा पदाधिकारी होणे आणि जबाबदारीची कामे पार पाडणे. पक्ष संघटनेकरीता आवश्यकते प्रयत्न करणे. निधी गोळा करणे, निधिनचे योग्य ते वितरण करणे, पक्षाकरीता प्रचार साहीत्य जमविणे, पक्षाशी जास्तीत जास्त लोकांना जोडणे. 6) निवडणूकीव्यतिरिक्त सांसद, विधिमंडळ सदस्य, पंचायतीराज व स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य व पदाधिकारी यांचेशी संवाद साधून देणे किंवा संवाद साधून जनतेच्या समस्या अवगत करून देणे. त्याचबरोबर सार्वजनिक कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधने व जनतेच्या समस्या अवगत करून सोडवून घेणे. 7) लोकांशी संपर्क साधून प्रचार माध्यमाव्दारे पक्षाची, शासन कार्याची स्तुती करणे किंवा विरोधी पक्षाची किंवा विरोधी पक्षाच्या व्दारे शासनाची निंदा करणे. 8) सर्व प्रकारच्या राजकीय मोहिमेत सहभागी होणे. 9) कोणत्याही पक्षाचे सदस्यत्व न घेता अपक्ष म्हणून निवडणूकीत उमेदवार राहणे. निवडून आल्यावर किंवा निवडून न आल्यावरही जनतेच्या हिताबाबत, समस्या आणि मागण्याबाबत प्रयत्न करणे. इतर पक्ष, शासन आणि शासकीय अधिकाऱ्यांवर जनतेच्या प्रश्नाबाबत दबदव आणून लोककार्य करणे. 10) पक्षाअंतर्गत राजकीय दबदव निर्माण करणे, गट करणे, आपण व आपल्या समर्थकांना पद प्राप्त करून देणे इत्यादी क्रिया करणाऱ्या व्यक्तिच्या वर्तनाला राजकीय वर्तन आणि या सर्व क्रिया करणाऱ्यास क्रियाशिल राजकीय व्यक्ति म्हणू शकतो.

राजकीय क्रियाशिल महिला ही संकल्पना स्पष्ट करतांना लेखक खालील निकष देतात.

1) ज्या महिला राजकीय पक्षांशी संबंधीत असून, ज्याचा पक्षाच्या राजकारणात विशेष सहभाग आहे.

2) ज्या महिलांनी राजकीय पक्षातर्फे किंवा अपक्ष पण सक्रियपणे कोणतीतरी निवडणूक लढविली आहे.

3) ज्या महिलांनी निवडून आल्यावर महत्वाचे पद किंवा स्थान भूषविले आहे.

4) ज्या महिला सर्व प्रकारच्या राजकीय मोहिमेत सहभागी आहेत.

73 व 74 व्या घटना दुरूस्तीमुळे पक्षीय राजकारणातही महिलांचा सहभाग वाढला आहे. अनेक राजकीय पक्ष बदलते वातावरण पाहून आपल्या पक्षाची महिला आघाडी स्थापन करून स्त्रियांना त्यात सहभागी करून घेत आहेत. अशा प्रकारे राजकारणात मोठया संख्येने क्रियाशिल राजकारणी महिलांचा वर्ग निर्माण झाला आहे.

या ग्रंथाच्या चौथ्या प्रकरणात प्रस्तुत अध्यनासाठी निवडण्यात आलेल्या उत्तरदात्याच्या जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण, धर्म, वयोगट, वैवाहिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, सांपत्तीक स्थिती, अपत्य संख्या, राजकारणातील सहभाग इत्यादी संदर्भात सारणीयुक्त माहिती देण्यात आली आहे. 47.5 टक्के उत्तरदाते गावात जन्मलेले आहेत. तर 42 टक्के उत्तरदाते शहारत जन्मलेले आहे. 57.5 टक्के उत्तरदाते शहरात राहतात तर 36.00 टक्के उत्तरदाते गावात राहतात. एकुण डत्तरदात्यापैकी 80.5 टक्के उत्तरदाते हिंदू आहेत. तर 15.5 टक्के उत्तरदाते बौध्द आहेत. 24 टक्के उत्तरदाते 36 ते 40 वयोगटातील आहेत तर 21.5 टक्के उत्तरदाते 41 ते 45 या वयोगटातील

आहेत. 88 टक्के उत्तरदाते विवाहीत आहेत तर 8 टक्के उत्तरदात्या विधवा आहेत. 36 टक्के उत्तरदात्यांने फक्त माध्यमिक शिक्षण घेतलेले आहे तर 26.5 टक्के उत्तरदात्या उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्या आहेत. राजकारणात सक्रिय सहभाग घेणाऱ्या महिला सर्वाधिक 74.5 टक्के गृहिणी आहेत. तर स्वंयरोजगार करणाऱ्या महिलांची संख्या 13.5 टक्के आहे. 74.5 टक्के उत्तरदात्यांचे मासिक उत्पन्न 'काहीही नाही' तर उद्योग किंवा नोकरी करणाऱ्या महिलांचे उत्पन्न जास्त आहे. 59.5 टक्के उत्तरदात्यांकडे कोणतीही संपत्ती नाही तर 19.5 टक्के उत्तदात्यांकडे घर, प्लॉट इ. संपत्ती आहे. 43.36 टक्के उत्तरदात्यांना दोन अपत्ये आहेत तर 27.4 टक्के उत्तरदात्यांना तीन अपत्ये आहेत. 28.64 टक्के उत्तरदात्यांच्या पतीचे शिक्षण माध्यमिक पर्यंत झालेले आहे. 25.0 टक्के उत्तरदात्यांचे पतीचे शिक्षण उच्च माध्यमिक पर्यंत झालेले आहे. 25.57 टक्के उत्तरदात्यांचे पती शेती करतात. अशा प्रकारे उत्तरदात्यांची कौटूंबिक, सांपत्तीक पार्श्वभूमी प्रस्तुत अध्ययनात तपासण्यात आलेली आहे.

विभाग 'ब' मध्ये उत्तरदात्यांच्या राजकीय सहभागाबद्दलच्या मीहितीचे विश्लेषण केले आहे. उत्तरदात्यांच्या कौटूंबिक राजकीय वारसा दर्शविणाऱ्या सारणीवरून 38.00 टक्के उत्तरदात्यांचे पती राजकारणात आहे. तर 16.0 टक्के उत्तरदात्यांचे सासरे राजकारणात आहेत. महिला आरक्षणाच्या धोरणामुळे अनेकदा पती किंवा साऱ्यांना पत्नी किंवा सुनेला पुढे करावे लागते. राजकारणात जाण्याबाबत उत्तरदात्याची इच्छा दर्शविणारी सारणी अभ्यासली तर 57 टक्के उत्तरदात्यांनी 'नाही' असे उत्तर दिले आहे. तर 36.5 टक्के उत्तरदाते 'होय' म्हणतात. कुटूंबातील सदस्य राजकीय क्षेत्रात असणे व राजकारणात जाण्याची उत्तरदात्यांची इच्छा याचा सहसबंध दर्शविणारी सारणी अभ्यासली असता हे स्पष्ट होते की वडील, भाऊ, सासरे, पती, दीर आणि इतर नातेवाईक राजकारणात असलेल्या 170 (85 टक्के) उत्तरदात्यांपैकी 64 उत्तरदात्यांना राजकारणात जाण्याची इच्छा होती परंतू 96 टक्के उत्तरदात्यांना राजकारणात जाण्याची इच्छा नव्हती. तरी देखील नातेवाईकांच्या आग्रहाने, पाठीब्यांने व सहकार्याने त्या राजकारणात आल्या. यावरून हा निष्कर्ष निघतो की, कुटुंबातील सदस्य किंवा इतर नातेवाईक राजकारणात असल्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम होऊन महिला मोठया संख्येने राजकारणात आल्या आहेत. राजकारणात कुणाच्या प्रेरणेने आलेत हे दर्शविणाऱ्या सारणीवरून लक्षात येते की, 47.0 टक्के उत्तरदात्या पतीच्या प्रेरणेने आल्यात तर 22.5 टक्के स्वंयप्रेरणेने राजकारणात आल्यात. 25.5 टक्के उत्तरदाते राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे आहेत. तर 33.5 टक्के कांग्रेस या पक्षाच्या आहेत. 31.55 टक्के उत्तरदात्या शहरातील पदावर आहेत तर 30.48 टक्के उत्तरदात्या तालुका स्तरावरील पदावर आहेत. उत्तरदात्याने अर्वाधिक 30.0 टक्के नगरपालीका सदस्य पदाकरीता निवडणूक लढविली आहे. तर फक्त 1.0 टक्के विधानसभा सदस्य पदाकरीता निवडणूक लढविली आहे. उत्तरदात्यांची शैक्षणिक पात्रता आणि त्यांनी कोणत्या पदाकरिता निवडणूक लढविली याचा सहसबंध दर्शविणाऱ्या सारणीवरून हे स्पष्ट होते की, जिल्हा परिषद व महानगरपालिके सारख्या वरच्या पदावरील जांगावर एकही अशिक्षित उत्तरदात्या नाही, तर 21 प्राथमिक शिक्षण घेतलेल्या उत्तरदात्यांपैकी 2 जिल्हा परिषद व 2 महानगरपालिका सदस्य आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, राजकीय क्षेत्रातही षिक्षणाचा प्रभाव पडतो. उत्तरदात्यांनी निवडणूक कोणत्या प्रवर्गवारीत लढविली या सारणीवरून महिला राखीव, ओबीसी प्रवर्ग, महिला राखीव, , खुला प्रवर्ग येथील टक्केवारी 29.10 टक्के सारखीच आहे. 17.5 टक्के उत्तरदाते नगरपालिका समिती सभापती होत्या तर 47.0 टक्के उत्तरदात्या कोणत्याही पदावर नाहीत. राजकारणात टिकून राहायचे असेल तर आर्थिक, कौटूंबिक, राजकीय आणि जनतेचे पाठबळ या सर्व पाठबळांची गरज आहे. महिला उमेदवाराला महिलांचे मतदान कमी आहे तर त्या तुलनेत पुरूष उमेदवाराला जास्त आहे. प्रत्यक्ष काम करतांना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो पण ज्यांचे अशा प्रकारचे सामाजिकरण झाले त्या 8.0 टक्के महिलांना कोणत्याही अडचणी आल्या नाही. 77.5 टक्के उत्तरदात्यांनी सक्रिय राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा ठस्त आपण उमटवू शकलो असे सांगितले. उत्तरदात्यांचा शिक्षणाचा स्तर ज्या प्रमाणात वाढत जातो त्या प्रमाणात राजकारणात राहून कर्तृत्व दाखवू शकणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण वाढत जाते. प्रतिस्पर्ध्याशी सबंध कसे आहेत या प्रवकाला 68.5 टक्के उत्तरदाते चांगले असे उत्तर देतात. उच्च पदावर जाण्याची आकांक्षा बाळगत 65.5 टक्के उत्तरदात्यांनी होय असे उत्तर दिलेले आहे. जसजसा उत्तरदात्याचा शैक्षणिक स्तर वाढत जातो त्या प्रमाणात वरच्या पदावर जाण्याची महत्वाकांक्षा असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे वाढत गेलेले आढळून येते.

लोकांच्या सेवेकरीता व स्वतःच्या क्षमतेमुळे वरच्या स्तरावर जाण्याची महत्वाकांक्षा ठेवणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या जवळपास सारखीच आहे. 47.59 टक्के उत्तरदात्यांना पक्षांच्या सर्वच निर्णय प्रक्रियेत आणि व्युहरचनेत नेहमीच सहभागी करण्याचे प्रमाण आहे. तर 58.29 टक्के उत्तरदाते पक्षाच्या महत्वपूर्ण बैठकीत व निर्णयात स्त्री म्हणून डवलल्या जाण्याची खंत व्यक्त करतात. बहुतांश उत्तरदात्यांचे महिला धोरणाबाबत, पक्षाच्या बैठकीत मत विचारात घेतले जाते. पक्षाच्या बैठकीत किंवा निर्णय प्रक्रियेत उत्तरदात्यांना डावलले जाणे किंवा मनांची किंमत केली न जाणे या कारणांमध्ये सर्वाधिक 34.61 टक्के उत्तरदाते ही अवहेलना स्त्री म्हणून होते किंवा खालच्या जातीतील असल्यामुळे होते असे म्हणतात. यावरून असे लक्षात येते की, अजूनही समाजाची मानसिकता निम्न दर्जाची आहे. पक्षाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांच्या संदर्भातील विषयावर पक्षातील इतर महिला मिळून दबाव गट कधिही तयार करीत नसल्याचे, सर्वाधिक म्हणजे 82. 65 टक्के महिलांनी सांगीतले. संसदेत व विधिमंडळात महिलांना 33 टक्के अरक्षण मिळावे काय? या प्रश्नाचे उत्तर जवळजवळ सर्वच 97.5 टक्के उत्तरदात्यांनी होय असे दिले. आरक्षण मिळावे याकरीता पक्षाचे धोरण काय यावर सकारात्मक आहे असे 96.25 टक्के महिला म्हणतात. संसदेत व विधिमंडळात महिलांना 33 टक्के आरक्षण मिळावे म्हणून पक्षाच्या अंतर्गत महिलांनी दबाव आणला काय या प्रश्नाला 90.91 टक्के उत्तरदाते 'नाही' असे उत्तर देतात. यावरून असे लक्षात येते की, आरक्षण मिळावे याकरीता पक्ष संघअनेवर अंतर्गत दबाव आणण्यात महिला राजकारणी अपयशी ठरल्या आहेत.

प्रस्तुत ग्रंथाच्या पाचव्या प्रकरणात लेखकांनी महिलांचा सामाजिक दर्जा व भुमिकांमधील परिवर्तनाची चर्चा केलेली आहे. हे परिवर्तन महिलांच्या सक्रिय राजकीय सहभागातुन झाले का? या सबंधीच्या महिलेचे विश्लेषण निर्वचन याबाबतचे निष्कर्ष लेखकांनी मांडले आहेत. महिला सक्रिय राजकारणात आल्यामुळे त्यांच्या परंपरागत सामाजिक दर्जा व भूमिकामध्ये परिवर्तन होऊन त्यांचे सामाजिक स्थान उंचावले आहे असे उत्तर 91.5 उत्तरदात्यांनी दिलेले आहे. 52.5 टक्के उत्तरदात्यांना राजकारणात सक्रिय झाल्यामुळे कोणताच त्रास झाला नाही तर 22.5 टक्के उत्तरदात्यांना राजकीय त्रास झाला असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. 28.5 टक्के महिलांना राजकारणात सक्रिय होण्यासाठी कोणत्याही महिलेकडून मदत झाली नाही तर सर्वाधिक उततरदात्यांना एक महिला म्हणून राजकारणात सक्रिय होण्यास महिलांकडून मदत झाली. 85.8 टक्के उत्तरदाते सर्व क्षेत्राप्रमाणे राजकीय क्षेत्रात देखील स्त्रिया चांगले कार्य करतात असे मत व्यक्त केले. स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करीत आहेत तरी त्यांच्या कार्यांना एक मर्यादा पडते ती म्हणजे मातृत्वाची. मातृत्व व कुटूंब सांभाळणे हे महत्वाचे कार्य स्त्रियांना करावे लागते असे उत्तर 73.0 टक्के उत्तरदात्यांनी दिले. उत्तरदात्यांची शैक्षणिक पात्रता व स्त्रियांचे अत्यंत महत्वपूर्ण कार्य यांचा सहसबंध तपासतांना हे लक्षात येते की, कुटूंब सांभाळणे हेच स्त्रियांचे अत्यंत महत्वाचे कार्य असल्याचे सर्वच शैक्षणिक पात्रता असलेल्या स्त्रियांचे मत आहे. शैक्षणिक पात्रतेशिवाय त्यांचे सामाजिकरण कशा प्रकारचे झाले हे अधिक महत्वाचे आहे. उत्तरदात्यांच्या शेजारी, वसाहतीतील व गावातील लोक सल्ला घेतात काय? या प्रश्नाचे 85 टक्के उत्तरदात्यांनी नेहमीच असे दिले आहे. यावरून समाजातील लोकांचा महिला प्रती परपंरागत करसटलेला दृष्टीकोण बऱ्याच प्रमाणात बदललेला आहे. स्त्रियांची प्रगती किंवा विकासदैव व प्रयत्न या दोन्हीवर अवलंबून आहे असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या 36.5 टक्के आहे. परंतू षिक्षणामुळे परंपरागत विचारांना महिला मान्य करीत आहेत मंगळसुत्र घालणे सारख्या परंपराप्रिय रूढीपासून मात्र त्या मुक्त झालेल्या नाहीत. राजकारणातील सक्रिय महिलांमध्ये स्त्री पुरूष समानतेबद्दल खेप जागरूकता असून राजकारणात स्त्री–पुरूष असा राजकिय भेदभाव करता कामा नये या मताशी 97 टक्के उत्तरदात्या सहमत आहेत. निसर्गतः स्त्री पुरूषांपेक्षा कमजोर आहे म्हणून तिला सामाजिक दर्जा पुरूषांपेक्षा निम्न असला तरी राजकारणात सक्रिय सहभागामुळे तीचा सामाजिक दर्जा वाढतो या मताशी 64.5 टक्के उत्तरदाते सहमत आहेत. स्त्रि ही पुरूषापेक्षा कमजोर आहे असे माननाचा उत्तरदात्यांचे प्रमाण कमी होत आहे हे यावरून आढळून येते.

या ग्रंथाच्या सहाव्या प्रकरणात राजकारणात सक्रिय सहभाग असल्यामुळे महिलांच्या कौटूंबिक संबंधावर परिणाम होतो काय? यासंबंधीचे निष्कर्ष मांउण्यात आले आहेत राजकीय क्षेत्रात क्रियाशिल असल्यामुळे कुटुंबातील सदस्य सम्मान देतात असे उत्तर 89.5 टक्के उत्तरदात्यांनी दिले तर त्या घराबाहेर राजकीय कामाला पुरूषांप्रमाणे एकटे जातात त्यामुळे त्यांच्यात हिंम्मत आली आहे, त्यांचा स्वविश्वास वाढलेला आहे. कुटुंबिय एखादया विशिष्ठ प्रंसगी किंवा प्रश्नाच्या संदर्भात नातेवाईक सल्ला घेतात असे 37.00 टक्के उत्तरदाते म्हणतात. व 62 टक्के

उत्तरदात्यांच्या कुटुंबातून सर्व प्रकारचे पूर्णतः सहकार्य त्यांना मिळते आवडीनुसार पोषाख परिधान करण्यासाठी इतर सदस्यांकडून सहकार्य मिळते असे मत 53.5 टक्के उत्तरदात्यांनी मत व्यक्त केले. कुटुंबाचे आर्थीक नियोजन पती व स्वतः मिळून घेतात. व कुटूंबातील इतर सदस्यांनाही राजकारणात यावे या संदर्भात 69.00 टक्के महिला पूर्णतः सहमत आहेत. यावरून असा निष्कर्ष निघतो की, राजकारणातील सक्रिय महिलांना राजकारणाबद्दल नितकारा वाटत नाही.

या ग्रंथाच्या सातव्या प्रकरणात राजकारणात विविध पदावर महिला असल्याने त्यांनी महिलांचे प्रश्न व महिला विकास क्षेत्रात कोणकोणती कामे केली यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. एक महिला म्हणून महिला विकासाची कामे केल्याचे 83.5 टक्के उत्तरदाते सांगतात महिला राजकारणात आल्यामुळे महिलांच्या समस्या सोडविण्यात काही प्रमाणात मदत झाली आहे. महिला राजकारण्यांनी मूलभूत हक्क आणि न्यायासंदर्भात, रोजगार विषयक, आरोग्य क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणातील सक्रिय महिलांनी कामे केली आहेत.

60 टक्के उत्तरदाते महिलांना पैतृक संपत्तीत अधिकार असावा या मताचे आहेत. बहुसंख्य उत्तरदात्यांनी महिलांच्या कल्याणाकरीता व त्यांना अधिकार मिळावे या संदर्भात आपापल्या सत्तापदावरील अधिकाराच्या मर्यादेनुसार महिला जागृतीचे कार्यक्रम राबविले आहेत. जर पक्षाने महिलांच्या हिती संदर्भात नकारात्मक किंवा अन्याय करणारी भुमिका घेतली तर 70.59 टक्के उत्तरदात्यांनी पक्ष नेतृत्वाला समजावून सांगू असे उत्तर दिले. तर 17.11 टक्के उत्तरदाते पक्ष सोडून बंडखोरी करू असे मत व्यक्त केले. हेही इथे अधोरेखीत करणे महत्वाचे आहे.

या ग्रंथाच्या आठव्या प्रकरणात लेखक राजकीय आरक्षण व महिला सक्षमिकरण या संबंधीच्या प्रश्नाचे विश्लेषण व निर्वचन करून निष्कर्ष मांडतात. स्त्री सक्षमीकरणाकरीता शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक घटकांबरोबर राजकीय सहभागाचा घटकही महत्वपूर्ण आहे असे 88.0 टक्के उत्तरदाते म्हणतात. 56.81 टक्के उत्तरदाते राजकिय सहभागामुळे स्त्रियांचा स्वविश्वास वाढतो असे मत व्यक्त करतात. 24 एप्रिल 1993 ला 72 आणि 73 वी घटना दुरूस्ती होऊन खालच्या स्तरांवर स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज मध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. जर हे आरक्षण मिळाले नसते तर उत्तरदात्या राजकारणात आल्या नसत्या असे मत 68 टक्के उत्तरदात्यांनी व्यक्त केले आहे. राजकारणात स्वविश्वास वाढल्यामुळे 58 टक्के उत्तरदाते सभेत नेहमीच प्रश्न मांडतात किंवा स्थनिक स्वराज्य संस्थामध्ये आल्यानंतर मिळालेल्या प्रशिक्षणामुळे प्रशासन यंत्रणेची माहिती मिळाली असे मत 76.54 मतदाते व्यक्त करतात. राजकीय सत्तेच्या संदर्भात लेखक इथे ब्लूम्बर्ग यांचे विचार स्पष्ट करतात. त्यांच्या मते सर्व घटकांवर मात करू शकणारा घटक म्हणजे राजकीय सत्ता होय. राजकीय सत्ता स्त्रियांच्या हाती आल्याशिवाय पूर्णतः स्त्रिसक्षम होवू शकत नाही असे मत 81.5 टक्के उत्तरदाते व्यक्त करतात. व हे 33 टक्के आरक्षणामुळे घडून आले असे मत 97 टक्के उत्तरदाते मान्य करतात. आरक्षण मिळाले म्हणून विविध पक्षांनी स्त्रियांना सहभागी केले व विविध पदांवर नियुक्त केले या मताशी 98.5 टक्के उत्तरदाते सहमत आहेत तर राजकीय पुरूषांप्रमाणे राजकीय महिलांचा एक वर्ग आरक्षणाच्या माध्यमातून निर्माण झाला या मताशी 82.5 टक्के उत्तरदाते सहमत आहेत. इथे लेखक मॅक्झिन मोलिनॉक्स यांचे निरिक्षण चुकीचे ठरते आहे असे मत व्यक्त करतात कारण संधी नव्हती म्हणून महिला मागे राहील्यात पण संधी मिळताच त्यांनी राजकीय क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. आरक्षण धोरणामुळे विविध राजकीय पदांवर महिला आहेत त्यामुळे महिला हिताचे व कल्याणाचे निर्णय घेतात असे मत 60.5 टक्के उत्तरदाते सहमती दर्शवितात तर राजकारण अतिशय वाईट क्षेत्र आहे या विधानाशी सर्वाधिक 44.5 टक्के उत्तरदाते पूर्णतः असहमत आहेत. यावरून हे स्पष्ट होते राजकारणात आल्यामुळे महिलांनी सर्व तंत्रे, गुण व कला अवगत केल्या असून महिला राजकारणी पुरूषांपेक्षा याही क्षेत्रात मागे नाहीत हे सिध्द केले आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे शेवटचे प्रकरण म्हणजे निश्कर्ष होय. अत्यंत अभ्यासपूर्ण आणि मुद्देसुद निष्कर्ष या संशोधनावरून मांडण्यात आले आहेत.

(प्रस्तुत ग्रंथाला मराठी समाजशास्त्र परिषदेचा 2014 चा 'जय जोशी संदर्भ ग्रंथ पुरस्कार' दि. 26 व 27 डिसेंबर 2014 ला अरविंद ब. तेलंग वरिष्ठ महाविद्यालय, निगडी, पूणे येथे संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या 25 व्या रौप्य महोत्सवी अधिवेशनात नुकताच प्राप्त झाला आहे.)

# व्यसनाचे स्वरूप आणि परिणाम

**प्रा. रामु हिरामणजी उईके,** शरदचंद्र कला–वाणिज्य महा.बुटीबोरी, जि. नागपूर मो.नं. 9422805637

**प्रस्तावना :–** व्यसन, व्यसनाधिनता हे शब्द काही वर्षापूर्वीपर्यंत मध्यमवर्गाच्या परीघाबाहेर होते. परंतु आज काळ बदलला आहे, कॉम्पुटर, इंटरनेट, मोबाईल, टी.व्ही. यामुळे जग दिवसेंदिवस अधिकाधिक जवळ आले आहे. ज्ञान आणि माहितीचे महाजाल युवकांसमोर खुले झाले आहे. त्यात सतत डोळयासमोर असणारी भौतिक सुखाची साधने मुलांना सांस्कृतिक मूल्यांपासून दूर नेम आहेत आणि आंधळेपणाने मुले त्यामागे धावत आहेत. त्यामुळे जीवनाची वास्तव जाणीव होण्यापूर्वीच त्यात भंपकपणाचे रंग भरले जाते आहे. परिणामी स्वतःची भूमिका, स्वतःच्या क्षमत, जीवनपध्दत याबद्दलेचे सम्यक ज्ञान होण्यापूर्वीच मुले कुठल्यातरी अप्राप्य ध्येयामागे धावू लागतात. काही काळानंतर त्यातला फोतपणा स्वतःतील कमतरता सुखाचे मृगजळ यांची बोचरी जाणीव होते. मग हे भरकटलेले आयुष्य निराशेच्या खाईत कोसळते. त्यातून वर येण्यासाठी जवळचा सोपा उपाय शोधू लागते.

साधारणतः 90 ते 95ः व्यसनी लोकांना व्यसन सुरू होण्यापूर्वी नैराश्य ;कमचतमेपवदद्ध आलेले असते. असा एक अभ्यास आहे. सर्व बाजूंनी निराश झाल्यावर व्यक्ति आनंदी होण्यासाठी शांत झोपण्यासाठी असुसलेली असते आणि त्यामुळेच व्यसनाच्या जाळयात अडकते. कारण व्यसन कोणतेही असो. परंतु त्याचे सेवन केल्यावर एक वेगळीच तरतरी, उत्साह, हवाहवासा वाटणारा अस्वस्थपणा जाणवू लागतो आणि कुणीतरी 'छान 'आहोत असे वाटु लागते. आनंदी उर्मी दाटुन येतात. त्यामुळे व्यसनाचा सुरूवातीचा अनुभव 'रोज थोडे घ्यायला काय हरकत आहे' असाच असतो. परंतु पुढे या 'थोडया प्रमाणाने' हा परिणाम जाणवत नाही. त्यामुळे हे प्रमाण वाढू लागते. हे प्रमाण पुढे इतके वाढते की व्यक्तीचा प्रवास एका डोसकडून दुसऱ्या डोसकडे असाच होऊ लागतो. हा 'डोस' बंद केला तर सामान्य आयुष्य वेगवेगळया लक्षणांमुळे कठीण बनते त्यामुळे व्यसन करणे अत्यावश्यक होऊन बसते. हया प्रवासात 'एक सहज गोष्ट सवय अत्यावश्य व्यसन ' येथेपर्यंत टप्पा कसा येऊन पोहोचतो. ते व्यसन माणसाला कळतच नाही.

व्यसन म्हणजे शरीर आणि मनाला लागलेली अशी सवय की ज्यामुळे व्यक्ती मानसिकरित्या त्यावर विसंबून राहू लागते कारण व्यसन/सवयीच्या असणाऱ्या पदार्थांचा गुणधर्म म्हणजे ते रक्तामार्फत लवकर मेंदूपर्यंत रासायिक क्रियांवर नियंत्रण मिळवितात त्याव्दारे काही काळ मेंदूच्या कार्यात बदल घडवून आणतात. त्याच्या शरीर आणि मनावर नकारात्मक प्रभाव पडतो. त्यातून निर्माण होणाऱ्या वरवरच्या तात्पुरत्या आनंदासाठी माणूस त्यात गुंतून राहू लागतो. हया सवयीचा तो गुलाम झाला की त्यावरचे ऐच्छिक नियंत्रण आपोआपच संपुष्टात येते व वारंवार हया अनिष्ठ सवयीकडे मन ओढ घेऊ लागते म्हणूनच त्यास 'सवय' म्हणत नाहीत. 'व्यसन' असे म्हणतात.

व्यसनाचे जगात अनंत प्रकार आहेत. कारण कुठलीही साधीशी सवय जर अत्याश्यक होऊन बसली. 'हे' केल्याशिवाय 'ते' शक्य होणार नाही हया टप्प्यावर येऊन पोहोचली की ते व्यसन आहे. असेच समजले जाते. कारण त्यामुळे जीवनातील साध्या गोष्टींची पूर्तताही होऊ शकत नाही. शारीरिक–मानसिक ताण येतो. सामाजिक टिकेलाही तोंड द्यावे लागते. उदा.पेपर वाचलयाशिवाय दिवसाची सुरूवातच न होणे. चहा घेतल्याशिवाय पोट साफ न होणे.. . वरवर साध्या दिसणाऱ्या हया गोष्टी जेव्हा 'कराव्याच' लागतात. तेव्हा या आपोआप 'व्यसना'च्या सावलीखाली येतात. पण तरीही 'व्यसन' हा शब्द त्यापासून लांब असतो. कारण त्यामुळे फार मोठी शारीरिक मानसिक हानी किंवा सामाजिक टीका यांस तोंड द्यावे लागत नाही. परंतु परदेशात हया 'वाईट' सवयीमुळे घटस्फोट होऊ लागते. त्यामुळेच त्यांचा व्यसनाच्या 'साध्या प्रकारात' अंतर्भाव करण्यात आला.

**व्यसनाचे प्रकार :–**

**1) साधी व्यसने :–** जुगार, अन्नलालसा, सेक्स, सेक्ससंबंधी साहित्य, कॉम्प्युटर, इंटरनेट, मोबाईल, काम (करिअर), व्यायाम, देवाची परमभक्ती, टी.व्ही.,व्हिडिओ, आत्मोन्नतीची तीव्र इच्छा, स्वतःस यातना देणे, अनिर्बंध खरेदी करणे, वाचन, लेखन, संगीत, चहा शीतपेये इ.

**2) विशेष व्यसने :–** जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यु.एच.ओ.) निष्कर्षाप्रमाणे खालील पदार्थ आपण व्यसनजनक म्हणून ओळखतो. दारू, ओपिऑइड किंवा गर्द, हेरॉईन, मॉरफिन, खोकल्याचे कोडीनसारखे औषध, चरस, गांजा, भांग, झोपेच्या गोळया बेन्झोडायझेपिन, कोकेन, कॅफीन, एल.एस.डी. तंबाखु (बिडी, सिगारेट, मशेरी) उडून जाणारे (व्होज्यॅटाईल), ग्लू, केरोसीन, पेट्रोल, डिझेल, व्हाईटनर वगैरे, स्टीरॉइड्स (खेळाडू वापरतात.)

यापैकी साधी व्यसने करणाऱ्या व्यक्ती उत्तम समुपदेशनव्दारे त्यातून बाहेर पडू शकतात. काही वेळा शरीरावर झालेल्या दुष्परीणामांकरीता त्यांना औषधेही द्यावी लागतात. परंतु एकंदरच व्यसनमुक्त होण्याची प्रक्रिया तुलनेने सोपी असते. त्यात भयंकर अपमान, टीका, यांना तोंड द्यावे लागत नाही.

परंतु विशेष व्यसने ही खरी भयंकर व्यसने असतात. त्यांचा परिणाम केवळ व्यसन करणाऱ्या व्यक्तीवरच नाही तर आई–वडिल, पत्नी, लहान मुले, समाज ह्या सर्वांवर होतो. एक व्यसनी माणूस आपल्याबरोबर किमान वीस जणांचे नुकसान करतो. असे संशोधनाअंती सिध्द झालेले आहे. प्रथम मुले केवळ सहज म्हणून ह्या गोष्टी करतात. मग पार्ट्या करु लागतात. रात्री उशिरा येऊ लागतात. मग कुटुंबातील लोकांना काळजी वाटू लागते. मुलगा/पती ह्या लोकांना न जुमानता खोट्या सबबी सांगू लागतात. 'व्यवसाय म्हटला की पार्ट्या आल्याच' असं म्हणून स्वतःची व कुटुंबियांची समजूत घालू लागतात. पुढे हे वारंवार होऊ लागते. पार्टीत 'जास्त' होऊ लागते. मग कुटुंब सतर्क होते. व्यसनी व्यक्तिला प्रेम, राग, लोभ, अपमान, टीका यांव्दारे सरळ करण्याचे निष्फळ प्रयत्न सुरु होतात. कुटुंबियांशी वाद होत असले तरी कुटुंब व्यसनी माणसासोबतच असते. समाजात बेइज्जती होऊ नये म्हणून त्याच्या व्यसनांवर पांघरुण घातले जाते. पैसे न देणे, सतत पहारा ठेवणे वगैरे निकराचे प्रयत्न केले जातात. पण त्यात कुटुंबियांची शारीरिक–मानसिक शक्ती खर्च होण्यापलिकडे काहीही होत नाही. कुटुंबियांना समाजात मिसळणे नकोसे वाटते. 'कोणी काही बोलले तर' ह्या भीतीमुळे सारे कुटुंबच भिती, अनादर, तिरस्कार, खिन्नता ह्यांच्या काळ्या सावलीत येऊन पडते. मग व्यसनी माणसाची कर्जे, घरातील स्त्रियांची व्रत–वैकल्ये, मांत्रिके ते डॉक्टर असा हताश प्रवास सुरु होतो. वृध्द आई–वडिल यामुळे कोलमडून जातात. स्त्रियांना पाठदुखी, रक्तदाब, निद्रानाश, गर्भाशयासंबंधित विकार यांसारख्या अनेक मनोकायिक समस्यांना तोंड द्यावे लागते. घरात असणारे लहान भाऊ, बहिण, मुले गांगरुन जातात, एकलकोंडी होतात तर काही अकाली प्रौढ होऊन बंडखोर होतात. काही आत्मविश्वास हरवतात. हे दुष्टचक्र असेच सुरु राहते. त्यामुळे केवळ व्यसनी माणसालाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबालाच व्यसन दुःखाच्या गर्तेत लोटते. त्यामुळेच व्यसनापासून प्रत्येकाने लांबच राहिले पाहिजे. व्यसनमुक्त हा क्षण कोणता, तर व्यसन करण्यापूर्वीचा हे गडकऱ्यांचे वाक्य आजही खरे आहे.

जेवढे वय लहान तेवढी ही समस्या अधिकच गंभीर बनते. परंतु त्याची कारणे मात्र त्या मानाने सामान्य आहे.

**1. जिज्ञासा** : ह्या वयात नवनवीन गोष्टींचे अनुभव घेण्याकडे मुलांचा ओढा असतो आणि ज्या गोष्टींवर बंधन असते, त्या एकदा तरी करुन बघण्याचे आकर्षण असते.

**2. बंडखोरी** : ज्या गोष्टी 'नाही' म्हणून सांगितल्या जातात, त्या मुद्दाम करण्याकडे कल असतो.

**3. दबाव** : मुलांना आत्मसन्मान अति''ाय प्रिय असतो. त्यामुळे जर व्यसनी मुलांच्या संगतीत असतील तर स्वसन्मान राखण्याच्या प्रयत्नात व्यसनास बळी पडतात.

**4. अनुकरणप्रियता** : मुलांसमोर सतत वावरणारे, मुलांच्या मनात आदर्श 'आयडॉल' असणारे लोक जे करतात त्यांचे मुले सहज अनुकरण करु लागतात. त्यात आई–वडिल, समाजातील मान्यवर, सिनेनट असे सगळेच येतात.

**5. प्रयोगशीलता** : काही वेळा केवळ औत्सुक्य **'बघू तरी काय होतंय', 'फक्त एकदाच'** या इच्छेपोटी मुले ह्या धोकादायक सवयीत पाऊल ठेवतात.

**6. मनाच्या खंबीरतेचा भ्रम** : मुलांमध्ये आपण कुठल्याही गोष्टीचे नियंत्रण करु शकतो. आपल्या मनाविरुध्द कुणीही आपले काहीही बिघडवू शकत नाही हा भ्रम असतो त्यामुळे गमतीत ह्या व्यसनाची सुरुवात होते. पण ही वाईट गंमत कधी त्यांच्या शरीर–मनावर नियंत्रण मिळवते ते त्यांना कळतच नाही.

**7. वजन कमी करण्यासाठी** : अतिप्रमाणात वाढलेले वनज ही आजच्या काळातील गंभीर समस्या आहे. सतत जागणाऱ्या भुकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही मुले व्यसनाधीन होतात असा एका अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

**8. मनाची सर्जनशीलता वाढवण्यासाठी** : व्यसन केल्यानंतर निर्माण होणाऱ्या (खोट्या का होईना) आनंदी अनुभूतीने मन अधिक सर्जनशील झाल्याचे मत अनेकांनी नोंदवले आहे. उत्तमोत्तम निर्मितीची ऊर्जा त्यांना व्यसनानंतर मिळते.

**काही गंभीर कारणे :**

**1. समस्यांचा विसर** : ह्या वयात मुलांना अनेक शारीरिक, मानसिक बदलांना सामोरे जावे लागते. त्याचा मनावर ताण येतो काही सामाजिक, कौटुंबिक समस्या असतील तर त्याचाही मनावर ताण पडतो. मग हा ताण कमी व्हावा, समस्यांचा विसर पडावा म्हणून मुले व्यसनाकडे ओढली जातात.

**2. मानसिक समस्या** : नैराश्य आत्यंतिक दुःख यांमुळे व्यसनास जवळ करणारी मुले कमी नाहीत.

जीवनातील आशा पूर्णतः लोप पावली असेल तर व्यसन हेच मुलांना आधार वाटू लागते. ज्या व्यक्तिंकडून प्रेम मिळावे अशी अपेक्षा असते त्यांच्याकडून झालेला अपेक्षाभंग मुलांना व्यसनाच्या दारात नेऊन सोडतो.

त्या आणि अशा कितीतरी कारणांचा अभ्यासकांनी काथ्याकूट केला तरी व्यसनाचे प्रमुख कारण **'व्यसन करावेसे वाटणे'** हेच आहे. विकासाच्या वेगात आजचा माणूस न्हाऊन निघत आहे. अधिकाधिक भौतिक सुखाची लालसा त्यांना स्वस्थ, शांत राहू देत नाही. त्यामुळे प्रत्येकाच्या वैयक्तिक समस्यांत वाढ झाली आहे. एकाच घरातील लोक एकमेकांसाठी पैसे देऊ शकतात. पण वेळ देऊ शकत नाही. ह्या सगळ्याच मुलांचेच अधिक हाल होतात. पूर्वी सहज आणि भरपूर मिळणारा आई–वडिलांचा सहवास आता कमी झाला आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे घरोघर असणाऱ्या एकट्या मुलांकडे जाणीवपूर्वक लक्ष देणारी माणसे नाहीत. त्यामुळे एकटेपणा घालवण्यासाठी भावनांचा निचरा होण्यासाठी मुले जवळच्या सोप्या मार्गाकडे वळतात आणि मग त्यांना आणि त्यांच्या आजूबाजूच्या सगळ्याच लोकांना अचानक भयानक परिणामांना तोंड द्यावे लागते आणि त्या परिणामांची साखळी वर्तुळाकार असते. उदा. नैराश्य, तणाव यांसाठी व्यसन सुरू केले जाते परंतु व्यसनाधिनता निर्माण झाल्यानंतर पुन्हा वेगळ्याच नैराश्य आणि तणावांना तोंड द्यावे लागते. परिणामी पाय अधिकच खोलात जाऊ लागतो. त्यामुळे त्यातून सुटका होणे अतिशय कठीण असते.

**व्यसनाचे दुष्परिणाम** :– कोणत्याही व्यसनाचे दुष्परिणाम दोन प्रकारचे असतात.

**1) तात्कालिक** :– तात्कालिक परिणाम हे व्यसनाच्या सुरुवातीला दिसून येतात. पण व्यसनी पदार्थ सवयीचे झाल्यानंतर त्याचे दीर्घकालीन दुष्परिणाम दिसून येतात. त्यात व्यसनी माणसाचे शरीर, मन, कुटुंब, समाज, मुले सारेच भाजून निघतात.

**2) दीर्घकालीनः**– व्यसनी माणसाचे मन सुरुवातीपासूनच कमकुवत असते. त्यामुळेच समस्येवर विधायक मार्ग शोधून उपाय करण्यापेक्षा त्यांनी व्यसनाची निवड केलेली असते. यामुळे व्यसनाधीन झाल्यावर मानसिक लक्षणे प्रकर्षाने दिसू लागतात.

1. व्यसनाची जबरदस्त ओढ वाटू लागते.
2. अनियंत्रित व्यसन केले जाते.
3. फक्त व्यसनाचा विचार केला जातो.
4. वाईट परिणाम दिसत असूनही व्यसन सुरू ठेवले जाते.
5. 'आपण व्यसनी आहोत' ही वस्तूस्थितीच नाकारली जाते.

ह्या नकारात्मक भावनांमुळे माणूस अधिकच व्यसनी होतो आणि त्यातून मुक्म होण्याची त्याची इच्छाच संपते. मग आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात.

**आरोग्य समस्या** : शरीरांतर्गत अवयवांवर व्यसनाचा दूरगामी परिणाम झालेला असतो. त्यामुळे त्यांचे विविध आजार निर्माण होऊ लागतात. व्यसनामुळे शरीर पोखरले गेलेले असते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेली असते. त्यामुळे व्याधींना तोंड देणे अवघड होऊन बसते. जठर, अन्ननलिका, मुख, यकृत, आंत्र यांचे रोग उत्पन्न होतात.

**सामाजिक समस्या** : व्यसनी व्यक्ती आणि तिचे कुटुंब समाजातील स्थान, आदर गमावते. त्यामुळे सामाजिक संपर्क नकोसा वाटते, एकटेपणा, तुटलेपणा अधिकच ताण निर्माण करतो. व्यसनी व्यक्तीच्या कुटुंबियांना समाजाच्या नकोश्या सहानुभूतीचे धनी व्हावे लागते.

**अपघाताचे प्रमाण वाढते** :– व्यसन न केल्यास थरथर कापणे, अतिप्रमाणात घाम येणे, नाडीचे ठोके वाढणे अशी अनेक लक्षणे निर्माण होतात त्यामुळे केवळ जिवंत राहण्यासाठी देखील व्यसन आवश्यक वाटू लागते. ह्या लक्षणांनाच **'विड्रॉल'** किंवा व्यसनावलंबित्व दाखवणारी लक्षणे म्हणतात.

व्यसनी व्यक्ती समाज, मित्र, कुटुंबिय यांच्यापासून दूर जाते. मनावरील नियंत्रण सुटते त्यामुळे अनिर्बंध प्रतिक्रिया देणे सुरू होते. कुठल्याही गोष्टी आनंद घेण्याच्या प्रवृत्तीचा ऱ्हास होतो. जगणे नकोसे होते. निद्रानाश, अतिचिंता, अचानक हल्ला केल्यासारखी प्रतिक्रिया देणे. आत्महत्येचे विचार प्रबळ होणे – सामान्य माणसांस ह्या लक्षणातून बरे होणे तुलनेने सोपे असते. व्यसनी माणसाच्या मेंदुची ताण–तणाव सहन करण्याची एकंदर क्षमताच खालावलेली असल्याने त्यांना ह्या गर्तेतून बाहेर काढणे कठीण होते.

**मानसिक समस्या** : नैराश्य, अतिचिंता, बरोबरीच्या लोकांत मिसळता न येणे, सतत एकच गोष्ट करण्याची प्रवृत्ती, अपराधीपणाची भावना, मेंदूवरील नियंत्रणाचा व शरीर मनाच्या सुसुत्रतेचा अभाव, एकाग्रचित्त न होणे, सतत व्यसनाचे विचार, विचारशक्तीचा अभाव, स्मृती–चिंतनक्षमता कमी होणे, अतिसंवेदनशीलता किंवा

अ–संवेदनशीलता निर्माण होणे, निद्राविकार, तणावाच्या व्यवस्थापनेचा अभाव 'झटका' येणे, पाहिलेल्या किंवा न पाहिलेल्या काल्पनिक गोष्टींची भिती, स्वतःकडून व इतरांकडून अवास्तव अपेक्षा करणे, अकार्यक्षम इ.

**शारीरिक समस्या** : दुर्बलता, जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या व्याधी, मुखांपासून आंत्रापर्यंतचे निरनिराळे कॅन्सर, यकृतविकार, दृष्टीदोष, कुपोषण इ.

**व्यसनमुक्तीचे उपाय** :– व्यसनी माणसाचे व्यसन सोडण्यासाठी ती विशिष्ट व्यक्ती त्याचे सारे कुटुंब मिळून उपाययोजना केली तरी ती निश्चितच फलदायी ठरते. परंतु सर्व उपायांत महत्त्वाचा उपाय म्हणजे व्यसनी व्यक्तीची व्यसन सोडण्याची इच्छा आणि त्यापेक्षाही महत्त्वाचे असते ते ह्या इच्छेवर टिकून राहण्याचा निर्धार. समाजाच्या दृष्टीने व्यसनी माणूस टीकेचा धनी असला तरी वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने तो एक 'रूग्ण' असतो. त्यामुळे त्याचे मन आणि शरीर ह्या दोघांसाठीही योग्य उपाययोजना केली जाते.

शारीरिक व्याधींवर त्या त्या व्याधींनुसार चिकित्सा केली जाते. ह्या दरम्यान मनाची शक्ती वाढवण्यासाठी आणि व्यसनमुक्तीचा निर्धार टिकवून ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात.

1. प्रथम व्यसनी व्यक्तिने आपण व्यसनी असल्याचे मान्य करणे आणि व्यसनाच्या वाटेला पुन्हा न जाण्याचा निर्धार करणे.
2. आपले दोष, चुका कबूल करणे. आपल्या प्रकृतीकडे डोळसपणे बघून योग्य उपाययोजना करणे.
3. व्यसनमुक्तीची तीव्र इच्छा ठेवणे.
4. वास्तववादी ध्येय ठेवणे.
5. जबाबदारीचे भान ठेवणे, जीवनातील प्राधान्यक्रम ठरवणे.
6. समुपदे"ाकाकडे नियमितपणे जाणे, त्यांच्याकडे मन मोकळे करणे.
7. छंद जोपासणे, आवडीच्या गोष्टी करणे.
8. नाटक, सिनेमा, मित्रांबरोबर सहलीला जाणे.
9. निराश वाटत असतांना महत्त्वाचे निर्णय न घेणे.
10. शरीर–मनाचे आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी उपचारांची टाळाटाळ न करणे.
11. परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची तयारी ठेवणे.
12. हलका व्यायाम नियमितपणे करणे.
13. ध्यान–धारणा
14. प्राणायाम
15. सकारात्मक विचार करणे.

हे सर्व उपाय चालू असतांनाही काही वेळा रूग्ण घसरतो आणि पुन्हा व्यसनाकडे वळतो हे टाळण्यासाठी काही गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात.

1. **उपाशी अजिबात राहू नये** – कारण भरल्यापोटी व्यसनाचे विचार सहसा येत नाही.
2. **रागावर नियंत्रण ठेवणे** – कारण एकटेपणाने नैराश्य वाढतेच पण एकांतात व्यसनांची सोबत हवीशी वाटते.
3. **कंटाळ्यापासून लांब रहावे** – कुठल्यातरी विधायक, सन्मान्य कामात वेळ आणि मन गुंतवावे, त्यामुळे आत्मसन्मान वाढण्यास मतद होते.
4. **नियमित योगासने करणे** – त्यामुळे शरीर व मनाला योग्य ताण देऊन संतुलन साधले जाते. नियमित 'शवासनाने' मनःशांती मिळते.
5. **प्राणायाम, ध्यान, धारणा** – अस्थिर मनाला स्थीर करणारे मनोबल वाढवणारे हे अनमोल उपाय आहेत. सात्त्विक आहार हाच सात्त्विक जीवनाचा आधार आहे.
6. ईश्वर हे अंतिम सत्य असल्याचे मान्य करणे. ईश्वरावर असलेली निरामय श्रध्दा मनास अत्यंत बल देणारी असते.

अर्थात कारणे, परिणाम, उपचार एवढेच सांगून ह्या समस्येचा वेध घेता येणार नाही, तर समाजात 'व्यसनाची सहज उपलब्धता' ह्या मुळावरच आधी आघात केला पाहिजे. व्यसनाचे परिणाम सांगून आपण मुलांचे प्रबोधन करू शकतो. पाय स्थीर राहावेत यासाठी प्रत्येकाने म्हणजेच समाधाने प्रशासनाइतकेच प्रयत्नशील राहायला हवे. कारण लोकशाहीत कुठल्याही आरोपाची सूई अखेरीस लोकांकडेच वळते. त्यामुळे निर्व्यसनी, उत्तम संस्काराची मुले घडवणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे.

व्यसन ते व्यसनमुक्ती हा प्रवास कठीण असतो. पण अशक्य नाही. यातील सगळ्यात धोकादायक भाग म्हणजे व्यसनातून मुक्त होतांना वारंवार व्यसनी व्यक्तीचे मन व्यसनाकडे ओढले जाते. त्यासाठी 'सिग्नल विचारसरणी' वापरली जाते.

लाल दिवा : थांबा, कृती करण्यापूर्वी शांतपणे विचार करा.

पिवळा दिवा : काय करण्याची इच्छा आहे व स्वतःस सांगा कसं वाटतं ते बघा. सकारात्मक उद्दीष्ट ठेवा. अन्य पर्यायांचा विचार करा आणि त्या पर्यायांचे परिणामही लक्षात घ्यावे.

हिरवा दिवा : योग्य पर्याय निवडा, कृती करा.

पण अर्थातच ह्या सगळ्या मानसोपचारांचा एक बेसावधक्षणी 'कचरा' होऊ शकतो. त्यामुळे काही औषधांचा वापरही करावा लागतो.

त्यात 1) ॲन्टि – डिप्रेसंट – नैराश्यरोधी औषधे. उदा. सिटालोप्राम, असिटालोप्राम, बेन्झोडायझेपाईन्स, कार्बामासोपाईन इ. 2) डायसल्फिराम 3) नॉयट्रेक्झोन 4) अकॅम्प्रोझेट

ही औषधी मनाची उमेद वाढवण्याचे व व्यसनी पदार्थाची तीव्र निकड कमी करण्याचे काम करतात. काही औषधे घेतल्यानंतर जर व्यसनाचे पुन्हा सेवन केले तर जीवन–मरणाचा संघर्ष उभा राहील अशी लक्षणे निर्माण करतात. (रूग्ण व त्याच्या कुटुंबियांना पूर्ण कल्पना देऊनच अशा औषधांचा वापर केला जातो.) त्यामुळे रूग्णाच्या मनाला हादरा बसतो. मृत्यूच्या भीतीने तो व्यसनाचे सेवन करण्याचे टाळतो.

ॲन्टि–डिप्रेसंट औषधे मुख्यतः मेंदूच्या बिघडलेल्या रासायनिक प्रक्रियांना पुन्हा 'समेवर' आणण्याचे काम करतात आणि निराशावादातून रूग्णास बाहेर काढतात.

व्यसनी माणसांची काही ठराविक लक्षणे

1. मंत्रचळेपणा अर्थात नशा करण्याची जबरदस्त ओढ.
2. अनियंत्रितपणा अर्थात व्यसनांवर नियंत्रण नसणे.
3. फक्त व्यसनांबद्दल विचार करणे.
4. विपरीत – वाईट परिणाम झाले तरीही व्यसन चालू ठेवणे.
5. वस्तुस्थिती नाकारणे.

**मंत्रचाळेपणा** : मंत्रचाळेपणा म्हणजे सारखा सारखा एकाच गोष्टींचा विचार करणे. ती गोष्ट न केल्यास त्याचा त्रास होणं. मग त्रास होऊ नये म्हणून व्यसन करणं. मंत्रचळ लागलेलं असतं तेव्हा माणसं स्वतःचं हित कशात आहे, स्वतःला कशाचा तोटा होणार आहे या गोष्टींचा अजिबात विचार करत नाहीत.

**अनियंत्रितपणा** : नियंत्रण नसणं म्हणजे नेमकं काय? अगदी खरं सांगायचं तर व्यसनी माणसाचं त्याच्या नशेवर नियंत्रण नसतंच! त्याला दारु (नशा) हवी असते म्हणजेच हवीच असते. त्याकरीता अगदी पानपट्टीच्या दुकानातून पैसे उधार घ्यायची सुद्धा त्याला लाज वाटत नाही. मिळालेल्या रुपयांची दारू पोटात ढकलून तो मोकळा होतो. अशी एक म्हण आहे की, 'व्यसनी माणूस नशेवर नियंत्रण ठेवत नाही तर नशा व्यसनी माणसावर नियंत्रण ठेवते ! नशेवर नियंत्रण ठेवण्याचे व्यसनी माणसाचे सारे प्रयत्न फसतात आणि तो अक्षरशः भरडला जातो. '

नियंत्रणाबाबत दुसरा मुद्दा असतो – किती प्यायची आणि कितीवेळा प्यायची? नियंत्रण संपलं म्हणजे माणूस अगदी तर्राट होईपर्यंत पिऊ लागतो. असं म्हणतात की, खिशातले पैसे संपेपर्यंत किंवा बेशुद्ध पडेपर्यंत माणसं पित राहतात. हे पिणं म्हणजे खरोखर अनियंत्रित पिणं!

# महिला हिंसाचार आणि कायद्याची उदासिनता यंत्रना

**प्रा. राजकुमार भगत**, राजीव गांधी महाविद्यालय सडक/अर्जुनी 9422348295, bhagatrajkumar 22@gmail.com

आज स्त्रियांना जिवनाच्या सर्वच क्षेत्रात समानता प्राप्त झाली आहे. स्त्रियांचे षैक्षणिक प्रमाण वाढले त्या आर्थिक दृष्टिने स्वावलंबी झाल्या, नोकरी क्षेत्रातील प्रत्येक विभागात स्त्रियांनी पाऊल टाकले. एकंदरित स्त्रियांची विकासात्मक वाटचाल सुरू झाली. शासनाने स्त्रियांच्या स्वरक्षणा करिता अनेक फायदे केले कौटुंबिक हिंसाचार नियंत्रण ठेवण्यासाठी 498 (अ) कायदा करून स्त्रियांना सुरक्षीत ठेवण्याचा प्रयत्न केला न्यायालयाने देखील कौटुंबिक हिंसाचारावर कायदयाची अंमलबजावणी केली. आज अनेक कायदे केले असतांनाही स्त्रियांवर होणारा हिंसाचार थांबलेला दिसत नाही. कायदे स्त्रियांच्या बाजुने असले तरी महिला अत्याचार सबंधी वाढते प्रमाण लक्षात घेता कायदा राबविण्याच्या संबंधीत यंत्रणा उदासीन दिसत आहे.

महिलांवर अत्याचाराला कारणीभुत असलेल्या बाबी जसे का हुंडा, बालविवाह कुटूंबात होत असलेले महिलांवरील अत्याचार, महिलांकडे पाहण्याचा पुरूषंचा कल आजच्या परिस्थितीत महिलांचे होत असलेले लैगींक शोषन इ. व अशा अनेक रूढी परंपरा या समाजात खोलवर रूजलेल्या आहेत. त्याच्या अनिष्ट परिणामाची तमा न बाळगता समाज व समाजात राहात असलेले लोक, त्यांच्या अधिन जात असतात व त्यामुळे गुन्हयांचे प्रमाण वाढत आहे. अशा रूढी परंपरा व अनिष्ट प्रथांचे निर्मुलन होण्यासाठी कायदा करून पुर्णतः चांगले परिणाम साध्य होईलच असे नाही. केवळ अशा प्रथा अनिष्ट रूढी यांना कायदेशिर मान्यता नाही. असेच या कायदयाकडे पाहिले जाते. तेव्हा कायदा करून असे प्रश्न सुटणारे नाहीत. तर त्यासाठी या कायदयामधील शिक्षा, तरतुदी यांची माहिती महीला वर्गात पसरविणे महिला विकासाच्या पुरक योजना समाजापर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे.

स्त्रियांचे दोन महत्वाचे साथीदार आहेत ते म्हणजे निसर्ग आणि शासन, निसर्गाने आयुष्यांच्या कोणत्याही थांब्यावर स्त्रिला पुरूषापेक्षा जैविकदृश्टया सबळ केले आहे. कारण निसर्गाला माहिती होते की पुढे तिला पुरूषप्रधान कुटूंबपध्दतीच ब्रम्हास्त्राचा मारा आयुष्यभर झेलावा लागणार आणि म्हणुनच तिला पुरूषापेक्ष दुप्पट, तिप्पट सहनशक्ती प्रतीकुल परिस्थितीत दोन हाथ करण्याची क्षमता तिच्या अंगी निर्माण केली तरीही पुरूषप्रधान समाजाने तिला अबला करण्याची कोणतीही संधी सोडली नाही. आणि एकविसाच्या शतकातील भारतीय समाजाने स्त्रि भ्रूण हत्येचे शिखर गाठुन सामाजिक विकास गाठण्याचा पुरेपुर प्रयत्न केला.

निसर्गाप्रमाणेच शासनही भक्कमपणे स्त्रियांच्या पाठीषी उभे असूनही पुरूषप्रधान समाजाने निसर्ग आणि शासन या दोघांच्याही युतीचा भिशन पराभव केल्याने 2001 च्या जनगणनेवरून दिसुन येते. स्त्रियांचे दर हजारी कमी होणारे प्रमाण वाढल्याचे जरी सुरूवातीला दिसुन आले तरी 0 ते 6 वयोगटातील मुलींचे प्रमाण 945 वरून 927 वर आल्याचे निश्चित झाल्यावर शासकिय विकास कामांचे पितळ उघडे पडले. स्वतःला प्रगत म्हणविणाऱ्या महाराष्ट्र, पंजाब, हरियाना, गुजरात या राज्यातुन मुलींचे प्रमाण घटले.

स्त्रियांचा आणि कायदयाचा परस्पर संबंध सर्वमान्य होईल यात शंका नाही. परंतु स्त्रि संबधातले कायदे आणि आरोग्य यांचा परस्पर सबंध कित्येकांना केवळ कल्पनेची भरारी वाटु शकते परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, व्यक्तीचे आरोग्य हे केवळ शरिरिक बाबींपुरते मर्यादित नसते. शारिरिक आरोग्यापेक्षाही महत्वाचे आरोग्याचे पैलु म्हणजे मानसिक आणि सामाजिक आरोग्य तिन्ही आरोग्याचे पैलु एकमेकात गुरफटलेले असतात. शरिरिक आरोग्य नसेल तेथे मानसिक व सामाजिक आरोग्याची कल्पनाच करवत नाही. कायदयाच्या पोकळीचा सर्वात अनिस्ट परिणाम स्त्रि आरोग्यावर आणि तिच्या व्यक्तीमत्वावर होवून नैसर्गीक मृत्यूच्या प्रमाणात वाढ, बालविवाह, अल्पवयात गरोदरपन, नको असलेले गरोदरपण, कुटूंब नियोजन साधनाच्या अभावामुळे बेकायदेशिर गर्भपातामुळे होणारे माता मृत्यू व इतर वैद्यकिय गुंतागुंतीचे बाहुल्य होते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास गुलामगिरीचे जिवन विसाव्या शतकाच्या पुर्वार्धापर्यंत भारतीय स्त्रियांच्या नशिबी होते. स्त्रि पुरूष भेदभावाचे संपूर्ण सामाजिक जिवनावर वर्चस्व असल्यामुळे स्त्रियांचे शारिरिक मानसिक आणि सामाजिक आरोग्य अत्यंत निम्न प्रतिचे होते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व अल्प प्रमाणात त्यापूर्वी करण्यात आलेल्या कायदयामुळे शासनाने स्त्रि–पुरूष विषमतेची दरी कमी करण्यात निश्चित यश प्राप्त केले. हिंदु विवाह कायदा दत्तक ग्रहण व निर्वाह कायदा,

बालविवाह प्रतिबंधक कायदा, घटणादत्त समान अधिकार व समतेसाठी कलम 15 (3) चा योग्य वापर हुंडाबळी विरोधी कायदे स्त्रि विरूध्द होणाऱ्या लैंगीक शोसनाविरूध्द कायदे, वैद्यकिय गर्भपात, समान वेतन, मातृत्व लाभ या सारखे अनेक कायदे करण्यात आल्यामुळे त्याचा अपेक्षित परिणाम स्त्रियांचे शारिरिक, मानसिक व सामाजिक आरोग्य उंचावण्याच्या दृष्टिने होवुन भारतीय स्त्रियांना देशात जिवण किमान जगण्यासारखे तरी झाले.

विविध कायदयामुळे व स्त्रि सक्षमीकरणाच्या शासकिय प्रयत्नामुळे स्त्रियांना लैंगिक न्याय व समता देणे शक्य झाले.

**कौटूंबिक हिंसाचार म्हणजे** :– कलम 3 अंतर्गत कौटुंबिक छळ म्हणजे शरिरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक किंवा आर्थिक छळ, हुंडा किंवा मालमत्ता देण्यासाठी महीलेला अपमानीत करणे, तिला शिवीगाळ करणे विषेशता अपत्य नसल्यामुळे तिला हिनवने, किंवा धमकावने या सर्व कृती कौटुंबिक छळ समजण्यात येतील. आर्थिक छळ म्हणजे महीलेचे स्वतःचे उत्पन्न, स्त्रीधन, मालमत्ता किंवा ईतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या ईतर कोणत्याही मालमत्ते पासुन तिला वंचित करणे. कौटुंबिक मिळकतीतील तिचा हिस्सा तिला न देणे, हा आर्थिक छळाचा भाग असेल. तसेच घरात राहणाच्या हक्कापासुन तिला वंचित करणे घराबाहेर काढणे हाही आर्थिक छळाचा भाग राहील.

महिलांना संरक्षण देणारे महत्वपूर्ण कायदे

| अ.क्र. | कलम | अपराधाचे स्वरूप | **शिक्षेची तरतुद** |
|---|---|---|---|
| 1. | 228 अ | बलात्काराच्या अपराधामागील अत्याचार पिढीत महिलेचे नाव | 2 वर्ष सजा किंवा दंड |
| 2. | 294 ब | महिलेकडे पाहुन सार्वजनिक ठिकानी अश्लिल किंवा असभ्य वर्तन करणे. | 3 महिण्याची सजा किंवा दंड |
| 3. | 1961 | हुंडा मागणे | 3 वर्षाची सजा |
| 4. | 304 ब | हुंडाबळी | जन्मठेप |
| 5. | 313 | महिलेचा समत्तीशिवाय गर्भपात | जन्मठेप किंवा सजा |
| 6. | 314 | महिलेच्या समत्तीशिवाय गर्भपाताच्या वेळी महिलेचा मृत्यु | 7 वर्ष सजा किंवा जन्मठेप |
| 7. | 323 | महिलेला मारहान सामान्य जखमा | 5 वर्ष तुरूंग |
| 8. | 325 | महिलेला मारहान गंभीर जखमा | 7 वर्ष सजा |
| 9. | 342 | अवैद्यरित्या डांबुन ठेवणे | 1 वर्ष सजा |
| 10. | 354 | महिलेचा विनयभंग करणे | 2 वर्ष सजा व दंड |
| 11. | 363 | अपहरण | 7 वर्ष सजा |
| 12. | 366 | विवाहाची महिलेचे अपहरण करणे. पळवुन नेने जबरदस्ती | 7 वर्ष सजा |
| 13. | 366 अ | अल्पवयीन मुलीला विवाहासाठी पळविणे | 10 वर्ष सजा |
| 14. | 370 | एखादया मुलीला किंवा महिलेला गुलाम बनण्यासाठी विकत घेणे | 7 वर्ष सजा व दंड |
| 15. | 372 | अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसायासाठी विकणे | 10 वर्ष सजा |
| 16. | 376 | बलात्कार | 7 ते 10 वर्ष सजा |
| 17. | 376 अ | कायदयाने वेगळे राहणाऱ्या पत्नीबरोबर संभोग | 2 वर्ष सजा |
| 18. | 494 | अवैद्यरित्या दुसरी पत्नी करणे | 7 वर्ष सजा व दंड |
| 19. | 497 | व्यभिचार | 5 वर्ष सजा व दंड |
| 20. | 498 | विवाहित महिलेला गुन्हेगारी वृत्तीने अटकाव करणे व घेवुन जाणे | 2 वर्ष सजा व दंड |
| 21. | 498 अ | विविवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ करणे | 3 वर्ष सजा व दंड |
| 22. | 509 | विनयभंगाच्या हेतुने स्त्रिकडे पाहणे व शब्द उच्चारणे | 1 वर्ष सजा व दंड |

**कायदा कशासाठी** :– कुटूंबासाठी कोणत्याही पुरूष नातेवाईकाकडून जर स्त्रिचा शारिरिक वा मानसिक, आर्थिक वा सामाजिक वा इतर प्रकारचा छळ होत असेल तर हया कायदया अंतर्गत स्त्रिला न्याय मागता येतो. एवढेच नाहीतर संरक्षणही मागता येते.

**संरक्षण कोण देईल** :– महिलांवरील कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा 2005 या कायदया अंतर्गत प्रत्येक जिल्हयात राज्य सरकार तर्फे संरक्षण अधिकाऱ्यांना नेमण्यात आले आहे. विशेषता हे संरक्षण अधिकारी विषेश प्रशिक्षित व अनुभवी स्त्रियांच असतील. तसेच पिडीत महिलांना मदतीसाठी काही सेवा भावी संस्थाही नेमल्या जातील. तालुका स्तरावर बालविकास प्रकल्प अधिकारी यांना संरक्षण अधिकारी म्हणुन घोषित केले आहे. तसेच अत्याचार क्षेत्रातील संबंधीत पोलीस स्टेशन कडे त्वरीत तक्रार दाखल करता येईल. त्या पोलीस स्टेशनच्या सबंधीत असलेले महिला समुपदेशन केंद्रात सदर बाबीवर मार्गदर्शन केले जाते. शासनाने महिला राज्य आयोगामार्फत जवळपास महिला समुपदेशन केंद्रे उघडलेली आहे. सदरच्या महिला समुपदेशन केंद्रात मार्गदर्शन घेवुन घटणेचे गांभीर्य लक्षात घेवुन एकतर गुन्हा नोंद करणे गरजेचे असल्यास कायदेशिर कार्यवाही केली जाते. किंवा पिडीत महिलेला संरक्षण दिले जाते.

**संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्य व कार्य** :– कलम 9 अन्वये संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्य व कार्य पुढील प्रमाणे आहे.

1) दंडाधिकाऱ्यांना या अधिनियमाखाली कार्य पार पाडण्यास मदत करणे.

2) तक्रार प्राप्त झाल्यावर विहत नमुन्यातील घटना अहवाल दंडाधिकाऱ्यांकडे सादर करणे व त्या कार्यक्षेत्रातील पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्याला व सेवा पुरविणाऱ्यांची त्याची प्रत देणे.

3) पिडीत व्यक्तीचा इच्छेनुसार संरक्षण आदेश मिळविण्या करिता नमुना 2 मध्ये दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करावे.

4) पिडीत व्यक्तीच्या विधी सेवा प्राधीकरणची मदत मिळवून देणे.

5) कार्यक्षेत्रातील विधीसहाय्य, समुपदेशन, आश्रयगृह, वैद्यकिय सुविधा पुरविणाऱ्याची यादी ठेवणे.

6) पिडीत व्यक्तीला आश्रयाची गरज भासल्यास सुरक्षीत आश्रयगृह उपलब्ध करून देवुन अहवालाची प्रत त्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशन आणि दंडाधिकाऱ्यांना देणे.

7) पिडीत व्यक्तीला शारीरिक जखमा झालेल्या असल्यास तिची वैद्यकिय तपासणी करून त्या अहवालाची प्रत कौटुंबिक हिंसाचार ज्या क्षेत्रात घडला असेल तेथील पोलीस स्टेशनला व दंडाधिकाऱ्यांना पाठविणे.

8) कलम 20 नुसार आर्थिक अनुतोषाच्या आदेषाचे अनुपालन व अंमलबजावणीची खात्री करणे.

9) संरक्षण अधिकारी दंडाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली आणि पर्यवेक्षणाखाली व दंडाधिकाऱ्यांनी तसेच षासनाने सोपविलेल्या जबाबदारीचे पालन करील.

10) पिडीत व्यक्तीला एकतर्फी अंतरिम सहाय्य देणेबाबद न्यायालयाला स्पश्टीकरण आवष्यक असल्यास प्रारंभीक चौकषी करण्यासाठी विभागुन राहत असलेल्या जागी भेट देणे व गृह भेटीचे आदेश काढणे.

11) चौकषी अंती न्यायालयाने आदेष दिल्याप्रमाणे वित्तलंब्दी, मालमत्ता, बॅक खाती व इतर दस्तऐवज याबाबत अहवाल सादर करणे.

12) पिडीत व्यक्तीच्या व्यक्तीगत वस्तु, भेटवस्तु, दागिणे व ती विभागुन राहात असलेले घर यांचा ताबा परत मिळविणे.

13) मुलांचा ताबा मिळविणे व न्यायालयाच्या निर्देशानुसार मुलांचे भेट घेण्याचे हक्क मिळविणे.

14) नमुना 4 मध्ये दर्शविलेल्या हक्कासंबंधीची माहिती पिडीत व्यक्तीला देवुन त्यानुसार कार्यवाही करणे.

15) नमुना 5 नुसार सुरक्षा योजना दर्शविली असुन त्यानुसार संरक्षण अधिकारी, पोलीस अधिकारी व सेवा पुरविणारा या नमुन्यातील तपशिल देण्यासाठी पिडीत महिलेला मदत करिल.

16) कलम 12 अन्वये पिडीत महिलेला संरक्षण अधिकाऱ्यां मार्फत स्वतरु किंवा तिच्या वतीने कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्याकडे नमुना 2 नुसार अर्ज करून मदत मागता येईल.

17) अर्ज मिळाल्या पासुन 3 दिवसाच्या आत दंडाधिकारी पहिल्या सुनावणीची तारीख निश्चित करेल.

**संरक्षण आदेश**:– कलम 18 अन्वये दंडाधिकारी महिलेला खालील प्रकारचे आदेष काढु शकतात.

1) छळापासुन संरक्षणाचे आदेश म्हणजे प्रतिवादीला कोणत्याही प्रकारचा छळ करण्यास प्रतिबंध करणे.

2) छळ स्वतःनाकरता ईतर व्यक्तीकडून करवुन घेण्यास प्रतिबंध करणे.

3) महिलेच्या कामाच्या ठिकाणी किंवा इतर ठिकाणी जान्यास प्रतिबंध करणे.

4) महिलेसी कोणत्याही प्रकारचा संपर्क करण्यास प्रतिबंध करणे. तो संपर्क लेखी असो वा तोंडी असो दुरध्वनी मार्फत किंवा ई. मेल व्दारे इ. कोणत्याही प्रकारचा.

5) महिलेकडून कोणत्याही मालमत्ता काढून घेणे. कोणत्याही प्रकारचे संयुक्त लॉकर्स, संयुक्त बॅकखाते हाताळण्यास प्रतिबंध करणे स्त्रिधन तिच्यापासुन हिरावुन घेणे.

6) महिलेला मदत करणाऱ्या ईतर कोणत्याही कुटूंबाच्या सदस्यांना किंवा तिच्या नातेवाईकांना धमकावणे किंवा इतर तऱ्हेने हानी पोहचविण्यास प्रतिबंध करणे.

7) प्रतिवादाला महिलेला घरातुन हाकलण्या पासुन प्रतिबंध करणे.

8) घरात ज्या खोलीत पिडीत महिला राहते त्या खोलीत प्रतिवादी किंवा त्यांच्या नातेवाईकाला जान्यास प्रतिबंध करणे.

9) घर विकण्यापासुन किंवा गहाण ठेवण्यापासुन प्रतिवादाला प्रतिबंध करणे.

10) गरज असल्यास महिलेसाठी पर्यायी घराची व्यवस्था करणे, किंवा पर्यायी घरासाठी भाडे देण्याचे आदेश प्रतिवादीला देणे.

11) याषिवाय कोणतेही इतर आवश्यक आदेश दंडाधिकारी देवु शकतात. उदा. हमीपत्र लिहुन घेणे. पोलीस स्टेशनला महिलेला संरक्षण देण्याचे आदेष काढणे, जप्त केलेले स्त्रीधन परत करण्याचे आदेश प्रतिवादाला देणे इ.

12) कौटुंबिक हिंसाचारामुळे करावा लागलेला खर्च तसेच आर्थिक सहाय्य देण्याचे आदेश काढु शकतात. मिळकतीची हानी वैद्यकिय खर्च, मुलांचा निर्वाह खर्च.

**महिला लोकशाही दिन :–** राज्य घटनेने नागरिकांना समान हक्क व समान संधी असा असा मुलभुत हक्क दिलेला आहे त्या अंतर्गत समस्याग्रस्त व पिडीत महीलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ देण्याकरिता शासनाने 4 मार्च 2013 रोजी शासन निर्णय क्रमांक मलो दि. 2013/प्र.क्र.11/म कक नुसार तालुका जिल्हा विभागीय व मंत्रालयीन स्तरावर महिला लोकशाही दिन पाळण्यात यावा असे घोषित केले.

| महिला लोकशाही दिन | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | तालुकास्तर | प्रत्येक महिण्याचा चौथा सोमवार | अध्यक्ष मा. तहसिलदार | सदस्य सचिव बालविकास प्रकल्प अधिकारी |
| 2 | जिल्हास्तर | प्रत्येक महिण्याचा तिसरा सोमवार | अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी | सदस्य सचिव जिल्हा महिला व बालविकास अधिकारी |
| 3 | विभागीयस्तर | प्रत्येक महिण्याचा दुसरा सोमवार | अध्यक्ष मा. विभागीय आयुक्त | सदस्य सचिव विभागीय उप आयुक्त महिला व बालविकास |
| 4 | मंत्रालयस्तर | प्रत्येक महिण्याचा दुसरा सोमवार | अध्यक्ष मा. मंत्री महीला व बालविकास | सदस्य सचिव राज्य महिला आयोग |

वरील प्रमाणे महिला लोकशाही दिन पाळण्यात येईल. या दिवसी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस महिला लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येईल. कोणतीही महिला आपली वैयक्तिक तक्रार घेवून अध्यक्षीय कार्यालयात थेट करू शकतो विहित नमुन्यात अर्ज महिला लोकशाही दिनाच्या 15 दिवस आधी पाठविणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना सदस्य सचिव यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

वरील प्रकारचे अनेक कायदे महिला संरक्षणाकरिता शासनाने केले असले तरी या कायदयाच्या उदासिन अंमलबजावणी मुळे स्त्रियांना न्याय मिळणे एवढे सोपे नाही. कायदा लालफीत शाहित अडकत असल्यामुळे स्त्रियांना या कायदयाचा फायदा होतांना दिसत नाही. तर या कायदयाचा चुकीचा आधार अधिकारी वर्ग काढतो आणि त्यामध्ये सुध्दा स्त्रियांनाच परिक्षा दयावी लागते. असे एकंदरित दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

1) कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे स्वरक्षण अधिनियम 2005 जिल्हा महिला बालविकास अधिकारी कार्यालय गोंदिया, 2003 पृ. 1 व 2
2) उपरोक्त पृ. 8
3) सक्षम स्त्रि आरोग्य आणि कायदे पृ. 41
4) हुंडा प्रतिबंधक कायदा 1961, महिला व बालविकास आयुक्तालय पूणे 2004 पृ. 4,5,8
5) सक्षम स्त्रि, आरोग्य पत्रिका पूणे पृ. 111, 112.

# गोसीखूर्द प्रकल्पग्रस्त आणि राजकारण

**प्रा. डॉ. संपदा एस. कुल्लरवार**, विमेन्स कॉलेज, नंदनवन, नागपूर

महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात गोसीखूर्द गावाजवळ वैनगंगा नदीवर इंदीरासागर नावाचे धरण बनत आहे. या धरणाचा अध्यादेश 1983 लाच निघाला! परंतू उद्घाटन मात्र 1988 साली झाले. 22 एप्रिल 1988 रोजी तत्कालीन पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी व तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी चिमुर मतदार संघात गोसीखूर्द हे गाव होत आणि चिमूरचे खासदार विलासराव मुत्तेमवार होते म्हणून उद्घाटन भंडारा जिल्ह्यात करण्यात आले तेव्हा प्रस्तावित धरणाची उंची 22 मिटरची होती पण आता ती वाढवून 28 मिटर करण्यात आली. बुडीत क्षेत्र 22 हजार 258 हेक्टरवरुन 33832 पर हेक्टरवर गेलेले आहे. 373 कोटी रुपयाचे धरण आता 11000 कोटीपर्यंत गेलेले आहे. धरणाची लांबी 11.35 किमी आहे. उजवा कालवा 107 किमी आहे. या कालव्याचे पाणी चंद्रपूर जिल्ह्यातील आसोलामेंढा तलावात नेऊन सोडले जाणार आहे. तलावाचे धरणात रुपातंर करुन 11 गावे चंद्रपूर जिल्ह्यातील विस्थापित केले जाणार आहे. चार उपसा सिंचन योजना राबविल्या जाणार आहे. त्यात अंभोरा, टेकापार, मोखाबर्डी, नेरल उपसा आहेत. डावा कालवा 23 किमी चा आहे. या धरणात 200 गावे विस्थापित होणार आहे. नागपूर जिल्ह्यातील 51 गावे पूर्णतः आणि भंडारा जिल्ह्यातील उप गावे पूर्णतः विस्थापित होणार आहे. 1 लाख 90 हजार हेक्टर शेतीला पाणी दिले जाईल असे जलसंपदा विभागाच्या प्रकल्प अहवालावरुन दिसून येते. गोसेखूर्द प्रकल्पाचे पाणी मौदा विद्युत प्रकल्पासाठी देण्याचे करार झाला असून त्याबाबत पैशाची देवाणघेवाणही झालेली आहे. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यूत व इतर प्रकल्पासाठी देण्याचे करार झाले असून पैशाची देवाणघेवाणही झालेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यूतप्रकल्प व इतर प्रकल्पाची पाणी नेण्याची तयारी असून नागपूर शहराला पाणी पूरवठ्यासाठी मोर्चेबांधणी सुरु आहे. बाटलीबंद पाण्याचा धंदा करण्यासाठी खाजगी कंपन्याही तयारीत आहेत. त्यामुळे गोसेखुर्द धरणाच्या सिंचनाचा मुळी उद्देशच निकालात निघणार आहे, की काय अशी शंका निर्माण झाली आहे.

गोसीखूर्द प्रकल्प विकासासाठी व भरभराटीसाठी आणला गेल्याचे जरी सत्ताधारी सांगत असले तरी त्यामुळे शेतकऱ्यांचे किती भले होणार हे तर काळच ठरवेल. आजच्या घडीला कंत्राटदार व कंपनीदार यांचे मात्र भले होणार हे स्पष्ट झाले आहे. येथील काही सत्ताधारी मंडळी स्वतःच्या कारखान्याकडे पाणी वळवित आहे. त्याबाजून कारखानदार व खाजगी व्यापारी हजार एकर शेती विकत घेत आहे व त्यामुळे न भरुन निघणारी हानी मात्र विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्याची, शेतीची, जंगलाची, मच्छीमाराची व मजूर असणाऱ्या बलूतेदार श्रमीकांची होणार आहे. विस्थापितांच्या पूनर्वसनाचे चित्र तर फारच भयानक आहे. पूनर्वसनाच्या नावाने विस्थापितांना पूर्णपणे नागवले जात आहे. गोसीखूर्द धरणाचा 1983साली अध्यादेश निघाल्यानंतर बाधीत गावातील जमीन व घराची खरेदी विक्रीचे व्यवहार बंद करण्यात आले. खरेदी विक्रीचे आर्थिक व्यवहार बंद झाल्याने शेतीसाठी घरगुती कामासाठी शेतकऱ्यांनी नातेवाईक, सावकार, सेवा सहकारी सोसायटी, भूविकास बँका, जिला को–ऑप. बँका व इतर लोकांकडून कर्जे काढून शेती व इतर आवश्यक गरजांसाठी पैसा वापरला गेला. कधी शेती पिकली तर कधी शेती पिकली नाही. व्यवहार सुरु राहीले, कर्ज वाढत राहीले व कर्जाचा डोंगर वाढतच गेला. शेती व घरांचा अवार्ड झाल्यानंतर मिळालेल्या कोरडवाहूचा मोबदला केवळ कर्ज फेडण्यात गेला. कर्जाच्या बोझ्याने अंगावरची लक्तरे निघाली. अतिशय दयनीय अवस्था झाली. 1983 पासून जसे खेरदी विक्रीचे व्यवहार बंद केलेत त्याचप्रमाणे बुडीत गावातील नागरी सुविधा सुद्धा बंद करण्यात आल्या. रस्ते, पाण्याची नवीन योजना, शाळेची इमारत, शिक्षकांची संख्या वाढविणे तसेच आरोग्याची सुविधा पुरविण्याचे थांबविण्यात आले. गावे तर धरणात जाणार आहेत मग कशाला खर्च करायचा असे म्हणत गेले. 27 वर्ष हे विस्थापित आवश्यक नागरी सुविधापासून शासनाने वंचित ठेवले आहे. 90ः महिलांना रक्ताची कमी, हिमोग्लोबिनची कमतरता.... आयर्नमध्ये घट झाल्याचे दिसून येते. आरोग्याच्या सोयी अभावी, नागरी सुविधापासून दूर व कर्जबाजारीपणा डोक्यावर घेवून येथील शेतकरी 27 वर्षापासून जगत आहे. याची खंत मात्र तेथील आमदार खासदार व सत्ताधाऱ्यांना मुळीच वाटत नाही.

गोसीखूर्द प्रकल्पग्रस्त आपल्या न्याय व हक्काच्या मागणीसाठी झगडतो आहे. सरकारच व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलने करीत आहे. जनावरांचा मोर्चा,

डोंगामोर्चा, चूली पेटवा सत्याग्रह, आसूड मोर्चा, नदीत मानवी साखळी, जेल भरो आंदोलन इ. च्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सरकार व प्रशासनाने पाऊने उचलली. वारसा हक्काच्या अटी शिथील केल्या. गावठाणांबाहेर घराच्या मोबदल्यासारख्या चांगल्या गोष्टी घडल्या. घराचा आणि जमिनीचा मोबदला देतांना प्रकल्पग्रस्तांवर फार मोठा अन्याय झाला. एकतर मोबदला अल्पसा दिला गेला आणि तोही प्रकल्पग्रस्ताकडून या ना त्या मार्गाने लूटला गेला. ओलीताच्या जमिनीची कोरडवाहू म्हणून नोंद केल्या गेली आणि प्रकल्पग्रस्तांना कोरडवाहूचा मोबदला दिल्या गेला. त्यामुळे प्रकल्पग्रस्ताला कमी पैसा मिळाला आणि त्यातल्या त्यात हिस्सेदारी झाल्याने तो पूरता डबघाईस आला. त्याची जमीन गेली पैसे संपले. त्यामुळे घराघरात भांडणे झालीत. बहीणभावाचे संबंध तुटले. मायलेकीची ताटातूट झाली. नवरा बायकोचे संबंध संपले. त्यांच्या चूली वेगळ्या झाल्या. लग्न समारंभात देणे घेणे, अहेर पद्धती बंद झाल्यात. नातलगांच्या मयतील जाणेही प्रकल्पग्रस्तांनी सोडले. इतक्या साऱ्या गोष्टी प्रकल्पग्रस्तांच्या जीवनात घडल्या हा झालेला बदल समाजजीवन कसे पुन्हा पूर्ववत करु शकेल याचा विचार करणे आवश्यक आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या जीवनात केवळ एवढ्या समस्या आल्या नाहीतर शेती घराची व संपत्तीची नीट नोंदणी झाली नाही. प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी कायदेही अपूरे पडले कारण कायद्याचीही अंमलबजावणी नीट झाली नाही. 1894 चा इंग्रजांनी तयार केलेला कायदा अजूनही प्रकल्पग्रस्तांची जमीन हिसकावून घेत आहे. त्यामुळे हा कायदा बदलवून नवीन कायद्याची मांडणी केली पाहिजे. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जगण्याचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी पर्यायी जमीन किंवा इतर साधनांचा विचार झाला पाहिजे. गोसेखूर्द प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत ती कोणताही विचार झाला नाही. पाणी साठवणूकीसाठी जमीन देणाऱ्यांना पाण्यापासून उभे राहणाऱ्या संपत्तीचा वाटा मिळाला पाहिजे. प्रकल्प ग्रस्तांना जीवनाची सुरक्षितता लाभली पाहिजे व म्हणून गोसेखूर्द प्रकल्पग्रस्तांचे जगण्याच्या साधनासहित पूनर्वसन झाले पाहिजे अशी गोसीखूर्द प्रकल्पग्रस्त संघर्षसमितीची मागणी आहे. ''आधी पूनर्वसन व मग धरण'' असे धोरण होते परंतू या धोरणाची अंमलबजावणी योजनेमध्ये झाली. सरकार पाणी अडविण्याचा व प्रकल्पगस्तांना हूसकावून लावण्याचा प्रयत्न करीत आहे. नागपूर शहराचे सर्व प्रदूषित पाणी धरणात अडवून वैनगंगेच्या परिसरात रोगराई पसरवली जात आहे. याविरोधात महाराष्ट्र राज्य प्रदूषण निमंत्रण मंडळाला संघर्ष समितीने पत्र देवून हा प्रकार नजरेस आणून दिला आहे. धरणाच्या उद्घाटनाला 26 वर्षे लोटली तरीही वैनगंगेच्या खोऱ्यांत प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न तसेच शिल्लक आहे.

दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय यातून प्रचंड प्रमाणावर रोजगार उपलब्ध होवू शकतो. परंतू यासाठी शासनस्तरावर निर्णय घेण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. गोड्यापाण्यातील मासोळ्यांना विदेशात फार मागणी असल्याने विस्थापितांच्या मासेमारीचे हक्क कायम ठेवून प्रशिक्षण कायम ठेवून प्रशिक्षण व साहित्याचा पुरवठा केल्यास परंपरागत मासेमारीचे इतरानांही मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करण्याची क्षमता 22258 हेक्टर इतक्या प्रचंड जलाशयात निश्चितपणे आहे. यादृष्टिने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

राज्यकर्त्याच्या नकारात्मक भूमिकेमूळे तसेच सरकारी अधिकारी, ग्रामसेवक, पटवारी, पुनर्वसन अधिकारी यांच्या अडवणूकीच्या धोरणामुळे प्रकल्पग्रस्त हवालदिल झालेला आहे तो प्रचंड मानसिक तणावाखाली वावरत आहे. स्वतःच्या वृद्धापकाळा बरोबर आपल्या लेकराच्या भविष्यांच्या चिंतेने तो ग्रासला आहे. त्याचा आत्मविश्वास खचत चालला असून त्याच्यातील व्यसनाधिनता वाढत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे पून्हा एकदा आत्महत्यासत्र सुरु होणार की काय अशी भिती निर्माण झालेली आहे.

मागासलेल्या विदर्भात हरितक्रांतीचे पर्व सुरु होण्यासाठी तसेच पर्यटन, मत्स्यविकास, उर्जा व औद्यागिक विकासासह वैदर्भिय तरुणांचा रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यामुळे हा प्रकल्प त्वरीत पूर्ण करणे गरजेचे आहे. यासाठी योग्य निधी व नियोजनाची आवश्यकता आहे. यातील राजकारण थांबल्यास प्रकल्प ग्रस्तांचे प्रश्न नक्कीच मार्गी लागतील.

**संदर्भ ग्रंथ**


1. संपादक ॲड . गोविंद भेंडारकर, गोसेखूर्द प्रकल्पाची पंचविशी
2. श्री विलास भोंगाडे, प्रकल्पग्रस्तांच्या समस्या
3. विदर्भ पाटबंधारे विकास, गोसीखूर्द राष्ट्रीय महामंडळ संचालित, नागपूर, नागपूर प्रकल्प,संक्षिप्त टिप्पणी

# वर्तमान परिस्थितीत महिला उद्योजकता : काळाची गरज

**प्रा. सुनिता चौधरी**, अंशकालीन प्राध्यापक, गृहअर्थशास्त्र विभाग, एन. जे. पटेल. कॉलेज मोहाडी जि. भंडारा

भारताच्या लोकसंख्येत महिलांचे प्रमाण जवळपास 50 टक्के आहे. म्हणजे जवळ–जवळ अर्धा भारत महिलांचा आहे. म्हणुन केवळ पुरूषांच्या माध्यमातूनच भारताचा आर्थिक विकास होऊ शकणार नाही तर प्रत्येक स्त्रीने पुरूषांच्या बरोबरीने आर्थीक विकासात सहभागी होणे गरजेचे आहे. वर्तमानकाळात अर्थाजनाचा नौकरी हा पर्याय जवळपास नाहीसा व्हायला लागलेला आहे. ग्रामीण भागात तर तो उपलब्धच नाही. नौकरीसाठी लागणारी शैक्षणिक पात्रता, अनुभव तसेच कुटूंबाच्या जबाबदारीमुळे असणारा कमी वेळ यामुळे ग्रामीण स्त्रियांसाठी नौकरी हा अर्थार्जनांचा पर्याय होऊ शकत नाही. वाढते यांत्रिकीकरण, पावसाचे कमी प्रमाण यामुळे स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारा दुसरा अर्थार्जनाचा पर्याय रोजंदारी हा ही दिवसेंदिवस कमी–कमी होत आहे. अशा परिस्थितीत आपल्या कुटूंबाची जबाबदारी सांभाळुन स्त्रिया उत्तमरीतीने छोटे–छोटे उद्योग करून अर्थाजन करू शकतात ज्याला शिक्षणाची अनुभवाची, वयाची वा जातीची पूर्व अट नाही, अशी अनेक उदाहरणे आपल्याला समजात पहायला मिळतात.

**व्याख्याः**–जेव्हा एखादी महत्वाकांक्षी आणि अभिप्रेरित स्त्री पुढाकार घेऊन उद्योजकाची भुमिका स्विकारते आणि ही भुमिका पार पाडण्याकरीता आवश्यक ते प्रयत्न करते, तेव्हा अशा स्त्रीला स्त्री–उद्योजक असे म्हणता येईल. शुम्पीटर यांच्या मते, 'जी व्यक्ती अर्थव्यवस्थेत काही तरी नावीन्य पुर्ण गोष्ट सादर करते ती व्यक्ती उद्योजक असते. ' **महिलांनी अर्थाजन का करावे** ? :– 1) वाढत्या महागाईला तोंड देण्यासाठी – आज दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. एका पुरूषांच्या उत्पन्नावर कुटूंब चालविणे कठिण झाले आहे. दिवसेंदिवस महागाई वाढत आहे. त्यामुळे घरभाडे, मुलांचे संगोपन, शिक्षण, स्वास्थ, मनोरंजन यावर होणारा खर्च वाढलेला आहे अशावेळी स्त्रीचे अर्थाजन मोलाचे ठरते. 2) कुटूंबाच्या गरजा सारख्या वाढत आहेत. कपडयामधील विविधता, खाद्यपदार्थांची समृद्धता, मनोरंजनाच्या साधनांचे आकर्षण श्रम व वेळेची बचत करणांऱ्या साधनांची लालसा त्यामुळे गरजांची पुर्ती करणे कठीण झाले आहे. म्हणुन स्त्रीने अर्थाजन करून उत्पन्नात भर घालण्याची गरज जाणवु लागली आहे. 3) आपल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अनेक महिला आपल्यातील कल्पकता वापरून उत्तम गुणवत्तेच्या वस्तु बनवुन आर्थीक उत्पन्न मिळवु शकतात. विक्री करून अर्थाजन करून आर्थीक उत्पन्न मिळवु शकतात. 4) वर्तमान काळात कुटूंबाचे प्रामुख्याने उत्पन्न हयाच गरजा भागविण्यासाठी एकमेव आधार आहे. अशा परिस्थीतीत एका व्यक्तीच्या मर्यादीत उत्पन्नावर गरजा भगविल्या जात नाही. अशा वेळी कुटूंबात ताण तणाव व संघर्ष निर्माण होतो. अशा परीस्थितीत आर्थीक बाजु मजबुत करण्याच्या हेतुने स्त्रीला स्वतः स्वयंरोजगाराची आवश्यकता वाटते व त्यामधुन ते आर्थिक उत्पन्न मिळवु शकते. 5) आधुनिक काळात समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रीयांच्या मनात आपले जीवनमान वरच्या प्रतीचे असावे अशी आकांक्षा असते. व उद्योगातून आपल्या कुटूंबाला व समाजाला ओळख पटवून देण्यासाठी. जेणेकरून समाजात तिला स्थान मिळेल. 6) पुढच्या पिढीला उद्योगाकडे वळविण्यासाठी एक आई शिकली की संपुर्ण कुटूंब शिकते असे आपण म्हणतो. तसेच एक स्त्री उद्योगाला लागली की,, तिचे संपुर्ण घर 'उद्योग मंदीर' होते. घरातील मुलांवर नकळत उद्योगाचे संस्कार होतात व मुले नोकरीसाठी पायपीट न करता उद्योगाची कास धरतात. पुढच्या पिढीला उद्योगाची माहीती मिळाली तर उद्योग वाढून आर्थीक विकास झपाटयाने होईल. व रोजगार व निर्मीतीही होईल. व आपल्यातील नवनिर्मितीची क्षमता दाखविण्यासाठी राहील. 7) आजच्या सामाजिक परिस्थीतीत स्त्रियांचे जीवन अधिक असुरक्षित झाले आहे. हुंडयासारख्या प्रथेमुळे किंवा मुलगा झाला नाही. म्हणुन स्त्रीला घराबाहेर काढले जाते अशावेळी अर्थार्जन करणारी स्त्री असेल तर ती सन्मानाने समाजात स्वकमाईवर जगु शकते आपल्या मुलांचे संगोपन करू शकते. 8) स्त्रीला आपल्या भविष्यासाठी तरतुदीचा समावेश असावा असे वाटते. तेव्हा आपल्या ज्ञानाचा उपयोग करून उद्योगातुन रोजगार निर्मिती करून त्या उद्योगावर आत्मविश्वास निर्माण झाला असून आपण सुद्धा कुटूंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्यापासून तर भविष्यकाळासाठी आर्थीक तरतुद करू शकतो. भविष्यकालीन तरतुदींमध्ये सण, समारंभ, अपत्याचे शिक्षण , विवाह, आजार आणि वृद्धापकाळात आर्थीक तरतुदींचा समावेश करावा लागतो.

**महिला उद्योजकांची गुण वैशिष्टे** :– समाजात स्त्रीला जशी वागणुक मिळते त्यानुसार सुद्धा तिच्या मनाची जडण घडण होते. तिला नेहमी गौणस्थान मिळण्याची भिती असते. व्यापारी स्त्री ही अतिशय

कार्यप्रवण, सर्जनशील, आणि सहनशील हया तिन्ही गुणांचा संगम झालेला आढळतो. महिलांच्या एकूणच अंगभूत गुणवैशिष्टये असणे आवश्यक आहे.

1) ध्येय निश्चीती :– रोजगाराच्या संदर्भात कोणत्या व्यवसायाची निवड करावयाची आहे यांचा विचार करतांना स्त्रीने ध्येय निश्चित करावे लागते. एक वेळ ध्येय ठरले म्हणजे त्या दिशेने पाऊल टाकता येतात. ध्येय निश्चीतीच्या अभावी गोंधळ होतो. कोणता उद्योग करावा ? निर्णय घेवुन स्वयंरोजगारासाठी विशिष्ट उद्योग करावयाचा असा ठाम निर्णय घेतला म्हणजे आत्मविश्वास प्राप्त होतो.

2) सहनशिलता :– लिंगभेदामुळे कुटूंब व समाज यातून स्त्रीमध्ये सहनशीलता येते अर्थातच सहनशीलतेचा ठराविक मर्यादेपर्यंत महिलेने वापर करावा कारण अति–सहनशीलता दुर्गूण ठरेल.

3) सातत्यपूर्ण चिकाटी, जिद्द :– पुरूषप्रधान समाज व्यवस्थेत आपल्या चुका पुरूष खपवून घेणार नाही हे जाणून घेऊन स्त्री सातत्यपूर्ण चिकाटी जिद्द ठेवते.

4) लवचिकता :– लवचिकता म्हणजे कोणत्याही स्थितीशी समरस होण्याची प्रवृत्ती स्त्रीला आयुष्यात अनेक प्रकारच्या भुमिका पार पाडाव्या लागतात प्रत्येक ठिकाणची/वेळेची परिस्थिती भिन्न–भिन्न असते. विशेषतः विवाहानंतर स्त्री संपुर्णपणे नव्या माणसात राहायला जाते तेव्हा आपल्या पूर्वीच्या आवडी निवडींना मुरड घालते आणि परिस्थितीशी जुळवून घेते. पुरूषांच्या तुलनेत स्त्रिचा हा गुण विशेष महत्वाचा आहे.

5) आत्मविश्वास :– महिलांना आत्मविश्वास असला पाहिजे. तिच्या स्वतःच्या कर्तुत्वावर विश्वास असला पाहिजे त्यांना एक शक्ती प्राप्त होते आणि उत्साह वाढतो.

6) एकाग्रता :– पुरूषांच्या तुलनेत स्त्रिला व्यवधाने कमी असतात त्यांमुळे त्यांच्या अंगी एकाग्रता निसर्गतःच बानावली जाते.

7) व्यवहारात कुशलता :– विवाहानंतर कुटुंबाच्या पोषणाची जबाबदारी पार पाडतांना खर्च व उत्पन्न यांना तोंड मिळविणे स्त्रीला करावी लागतात. सर्व खरेदी त्या करीत असतील तर त्यांच्यात अधिक प्रमाणात व्यवहारात कुशलता येते.

8) निर्णय अचुकता :– कुटूंबातील जबाबदारीने सर्वांना मान्य होणारा रूचवणारा निर्णय घेण्याची जबाबदारी स्त्री ला जडलेली असते.

9) जोखीम पत्करणे आणि आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जाणे.

**स्त्री व्यक्तिमत्व उद्योजकाकडे झुकणारे** :– उद्योग करणाऱ्या व्यक्तीला उद्योजक म्हटले जाते उद्योजक ही एक प्रवृत्ती किंवा मानसिकता आहे यशस्वी उद्योजक होण्यासाठी काही विशिष्ट गुणकौशल्ये स्त्रियांमध्ये उपजत असतात. उदा. कठोर परीश्रम करण्याची तयारी, बचतीची सवय लोकांकडून काम करून घेण्याचे कौशल्ये मिळेल त्या पैशात घर चालविण्याचे कौशल्य विक्री कौशल्य, कमीत कमी पैशात उत्तम रीत्या वस्तु खरेदी करण्याचे कौशल्य, घासाघासी करून किंमती कमी करण्याचे कौशल्य, नेतृत्व, उत्तम संवाद, कौशल्य इ. फक्त महिलांना थोडीसी प्रेरणांना संधी देण्याची गरज असते यांच्या जोडीला प्रशिक्षण मिळाले तर महिला उद्योग क्षेत्रात उत्तम कामगीरी बजावु शकतात. महिलांसाठी 'कस्तुरबा खादी ग्रामोद्योग विद्यालय', हे भारतातील एकमेव स्त्रियांचे प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. या विद्यालयामध्ये वेगवेगळया प्रकारे प्रशिक्षण दिले जाते., ज्यांमध्ये मसाला उद्योजकता विकास प्रशिक्षण, फळे भाज्या प्रक्रिया प्रशिक्षण, इन्स्टंट फुड तयार करणे, रेडीमेड गारमेंटस व एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण, रेषा उद्योग प्रशिक्षण (घायपात केळी) इ. च्या रेषापासून शोभेच्या विविध वस्तु बनविणे बांधणी प्रशिक्षण, मुखवास सुपारी बनविणे, हर्बल ब्युटी प्रॉडक्टस बनविणे, इ. येथे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा उद्देश असा की महिलांच्या आर्थीक विकासात सहभाग वाढावा त्यांनी आत्मनिर्भर होऊन समाजात सन्मानाने जगावे

**सारांश** :– वर निर्देशित केल्याप्रमाणे वाढती महागाई कुटूंबाच्या नव्याने निर्माण होणाऱ्या गरजा व चांगल्या जिवनमानाची आकांक्षा, एका व्यक्तीचे उत्पन्नांवर होणारा ताण, व भविष्य कालीन तरतुद, स्त्रियांच्या जिवनामधील असुरक्षितता, व आवश्यक असणारे गुण यांचा विचार करून महिलांनी लहान प्रमाणावर गृह उद्योग करून आर्थीक प्राप्तीची वाट शोधलेली आहे. या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन महिलांना उद्योजकांच्या क्षेत्रात भरीव कामगीरी करावी व स्वतःही गृह उद्योग करावा व इतरांनाही रोजगार द्यावा यामुळे स्वतःच्या कुटूंबाची, समाजाची आणि राष्ट्राची उन्नती करून घेऊ शकतात.

संदर्भ सूची :–

1) महिला विकास विशेषांक – 2013

2) उद्योजकता विकास, डॉ. प्रभाकर देशमुख, पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

3) गृह व्यवस्थापन आणि गृहकला, हिमालया पब्लिशिंग हाऊस, 'रामदुत' डॉ. भालेराव मार्ग, गिरगांव, मुंबई – 400004

# विदेशी थेट गुंतवणूक (Foreign Direct Investment – FDI)

**प्रा. कविता के. लेंडे**, सहायक व्याख्याता, वाणिज्य विभाग, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

**प्रस्तावना –** थेट परकीय गुंतवणूक म्हणजे दुसऱ्या देशाने खरेदी केलेल्या कंपनीवर त्या देशाचे नियंत्रण असणे होय किंवा विदेशातील एखाद्या कंपनीने दुसऱ्या देशाच्या उत्पादनात किंवा उद्योगात केलेली प्रत्यक्ष गुंतवणूक म्हणजे 'विदेशी थेट गुंतवणूक – FDI होय. प्रत्यक्ष किंवा थेट गुंतवणूक दुसऱ्या देशातील एखादी कंपनी खरेदी करून किंवा त्या देशात पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेल्या उद्योगातील पूर्वीच्याच व्यवहारांमध्ये अधिक किंवा जास्तीची वाढ करणे होय.

Organisation of Economic Co-operation and Development - OEDC नूसार व्यवसायाचे 10 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त नियंत्रण (मतदानाचा अधिकार) असणे, शिवाय केवळ पैसा गुंतवला म्हणजेच कंपनीवर नियंत्रण राखता येते असे नाही तर तंत्रज्ञान, व्यवस्थापन व अतिमहत्वाची माहिती कच्चा माल याव्दारे ही कंपनीवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवता येते. विदेशी थेट गुंतवणूक म्हणजे राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत पडणारी भर किंवा वाढ होय. (FDI is nothing but increase in the countries economy).

1950 पासून प्रामुख्याने विकसनशिल देशांमधील लोकसंख्या वेगाने वाढत गेली. ज्या वेगाने लोकसंख्या वाढत गेली त्या प्रमाणात एकूण उत्पन्नात, दरडोई उत्पन्नात वाढ झाली नाही. शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी यामध्ये सुध्दा फारसी प्रगती दिसून आली नाही. FDI चा यथायोग्य व कौशल्यपूर्ण वापर करून घेतल्यास त्याचा विकास कार्यावर अतिशय सकारात्मक परिणाम दिसून येतो. विदेशी थेट गुंतवणूकीमुळे स्थानिक उत्पादकतेत प्रभावी वाढ झालेली आढळून आली. विदेशी थेट गुंतवणूकीमुळे विकसनशिल देशाचा विकास हा वाढत्या गतीने होत आहे.

भारतात विदेशी/परकीय गुंतवणूक 1991 मध्ये Foreign Exchange Management Act (Fema) अंतर्गत लागू करण्यात आली. भारताने विविध क्षेत्रात किती परकीय गुंतवणूक असावी यावर मर्यादा घातलेल्या आहेत. आज हवाई सेवा आणि विमा क्षेत्रात 49 टक्के व 26 टक्के अनुक्रमे गुंतवणूक करता येते. चीन नंतर भारत हा परकीय गुंतवणूकीसाठी महत्वाचा देश असल्याचे United Nations Conference on Trade and Development ने सिध्द केले आहे.

**भारतातील विदेशी थेट गुंतवणूक** (FDI in India)– 1990 मध्ये भारतातील विदेशी थेट गुंतवणूक 1 बिलिअन (अब्ज) डॉलर्स पेक्षा कमी होती. 2009 मध्ये 1,114 अब्ज डॉलर्स, 2010 मध्ये 1,309 अब्ज डॉलर्स, 2011 मध्ये 1,254 अब्ज डॉलर्स, तर 2014 मध्ये 2,801 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक विविध देशांनी भारतात केली.

1995 ते 2014 विदेशी थेट गुंतवणूक सरासरी 1013. 94 दशलक्ष अमेरीकन डॉलर्स एवढी झाली. 2010–12 मध्ये भारतातील विदेशी थेट गुंतवणूक चीनच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर आहे. World Investment Prospects Survey 2011 नूसार भारत हा विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीला आकर्षित करणारा महत्वपूर्ण देश आहे.

**भारतातील विदेशी गुंतवणूकीचे क्षेत्र** (FDI's Sector in India) – सेवा, बांधकाम, शहरे विकास, गृहनिर्माण, बिल्टअप इन्फ्रास्ट्रक्चर, दूरसंचार, काम्प्यूटर साफ्टवेअर, हार्डवेअर, ड्रग्ज आणि फार्मास्युटिकल्स, केमिकल्स, ऑटोमोबाईल, वीज, हॉटेल आणि पर्यटन.

FDI **मध्ये गुंतवणूक करणारे देश** (Invester Countries in India) – मॉरिशस, सिंगापूर, इंग्लड, जपान, अमेरिका, नेदरलॅंडस, सायप्रस, जर्मनी, फ्रान्स, संयुक्त अरब अमिरात इत्यादीसह 140 देशांनी 2000 पासून जुलै 2013 पर्यंत 9 लक्ष, 36 हजार, 844.17 कोटी रूपयांची गुंतवणूक भारतात केली आहे. एप्रिल 2000 ते ऑक्टो. 2012 मध्ये भारतात खालील प्रमाणे FDI अब्ज डॉलर्स मध्ये करण्यात आली.

1) महाराष्ट्र 61.13
2) कर्नाटक 10.25
3) तामिळनाडू 9.6
4) गुजरात 8.53
5) आंध्रप्रदेश 7.41
6) प. बंगाल 2.04

संरक्षण, रेल्वे व विमा क्षेत्रात FDI ला चांगली संधी आहे. थेट परकीय गुंतवणूक किती होणार हे देशातील कारभार कसा होणार यावर अवलंबून असते. जागतीक बॅंकेच्या यादीत FDI मध्ये भारताचे स्थान 142 आहे.

**भारतामध्ये** FDI **ची पसंती असलेली शहरे :–** मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगलौर, अहमदाबाद, हैद्राबाद, कलकत्ता, चंदीगड, भोपाळ, कोच्ची, पणजी, जयपूर, कानपूर, भुवनेश्वर, गुवाहाटी, पाटना.

महाराष्ट्र थेट गुंतवणूकीमध्ये अग्रेसर आहे. एप्रिल 2000 ते ऑक्टोबर 2012 हया कालावधीत सर्वात जास्त FDI

61.13 महाराष्ट्रात झाली आणि हे प्रमाण संपूर्ण भारताच्या 33 टक्के एवढे आहे. मल्टी ब्रॅंड रिटेल, हवाई वाहतूक, उर्जा आणि प्रसारण हया क्षेत्रातील FDI चे धोरण भारतसरकारने अधिक उदार केले आहे.

**थेट परकीय गुंतवणूक –** FDI हा विषय आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत अर्थव्यवस्थेसाठी नेहमीच वादाचा विषय ठरला आहे. FDI चे जसे काही लाभ आहेत तसे तोटेही आहेत.

विदेशी थेट गुंतवणूकीमूळे स्थानिक गुंतवणूक वाढीवर मर्यादा येतात. तसेच बाल्यावस्थेतील उद्योग (Infaunt Industries) वरही विपरीत परिणाम दिसून येतो. विकसनशील देशाबरोबरच विकसित व श्रीमंत देशही FDI चा उपयोग स्वतःच्या विकासाकरिता करीत आहे. विशिष्ट मागासलेल्या भागांचा व प्रवेशाचांच विकास करण्यासाठी FDI चा उपयोग केला जातो.

विदेशी थेट गुंतवणूकीचा मोठया प्रमाणावरील वापर हा ठरविलेली उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विलंब होत असल्याने आर्थिक विकासाच्या दृष्टीने घातक आहे. प्रत्येक प्रकल्पाचा वाढत जाणरा अवाढव्य खर्च व प्रचंड विलंब हयामूळे येणारी निराशा FDI ला अडथळा ठरते आहे. FDI ला जरी विरोध असला तरी अल्पविकसित देशात तसेच विकसित देशातील काही विशिष्ट भागात रोजगार निर्मिती व मोठया पगाराची नोकरी निर्माण होवून तांत्रिक विद्या व प्रोत्साहन मिळत आहे.

विदेशी थेट गुंतवणूकीमूळे देशाचे नुकसान होईल असे ठामपणे सांगणारे अर्थतज्ञही आहेत. कम्प्यूटर, मोबाईल, कोका कोला, पेप्सी बाबतीत अनेकांनी बेरोजगारीचा प्रश्न उचलून धरला. परंतू काळाच्या ओघात कार्य वाहून गेले.

**संदर्भ :–**


1) आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्त – डॉ. जी.एन. झामरे
2) भारतीय बॅंकींग – डॉ. प्रकाश राजनकर
3) भौतिक अर्थशास्त्र – डॉ. प्रभाकर देशमुख
4) लोकमत वृत्तपत्र – डिसें, 2014
5) लोकराज्य 2014


# पाकिस्तान कडून पोसला गेलेला दहशतवाद पाकिस्तानच्याच मुळावर

**प्रा. राजेंद्र ओंकार बेलोकार**, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर

'शेजाऱ्यांना चावायचे म्हणून अंगणात साप पाळायचे आणि त्यांनी फक्त शेजारच्यानांच चावावे अशी अपेक्षा बाळगायची हे मूर्खपणाचे आणि त्याहूनही अधिक धोकादायक असते,' असे अमेरिकेच्या माजी परराष्ट्रमंत्री हिलरी क्लिंटन पाकिस्तानच्या संदर्भात म्हणाल्या होत्या. 16 डिसेंबर 2014 ला पाकिस्तानच्या पेशावर येथील शाळेवर जो दहशतवादी हल्ला झाला. त्या वेळी हिलरी क्लिंटन यांच्या विधानाची प्रचीती स्वतः पाकिस्तानला आणि इतर देशांना आली असेलच. तेहरिके तालिबान पाकिस्तान (टीटीपी) या दहशतवादी संघटनेने लष्करी शाळेतील मुलांवर अमानुष गोळीबार करून शेकडो शाळकरी मुलांची हत्या केली. पाकिस्तानी लष्कराने तालिबानी दहशतवादाच्या विरोधात गेल्या काही महिन्यापासून मोठी आघाडी उघडलेली आहे. त्यामुळे तालिबानी दहशतवादी आणि पाकिस्तानी लष्कर यांच्यामध्ये बऱ्याच काळपासून चकमकी सुरू आहे. लष्करी अधिकाऱ्यांनी शेकडो तालिबाण्यांचा खातमा केला आहे. त्याचा बदला म्हणून लष्करी अधिकाऱ्यांवरचा राग म्हणून लष्करी अधिकाऱ्यांच्या मुलांची हत्या घडवून आणली. या हत्याकांडावरून पाकिस्तानमध्ये दहशतवाद किती खोलवर रूजला आहे याची अनुभूती येते.

पाकिस्तानमध्ये तालिबान तसेच इतर दहशतवादी पाकिस्तानमध्ये धूमाकूळ घालण्यामागे पाकिस्तानचे अंतर्गत कुरघोडीचे राजकारण, धार्मिक कट्टरतावाद लष्कराचे वर्चस्व, स्वार्थी सत्ताधारी, भारत द्वेष, मूलततत्ववादी विचारधारा, जिहादी मानसिकता, राज्यकर्ते आणि लष्कर यांची अभद्र युति इत्यादी कितीतरी बाबी कारणीभूत आहेत. दहशतवादाची सुरूवात ही खऱ्याअर्थाने दक्षिण आशियामध्ये शीतयुध्दानंतर म्हणजेच 1990 नंतर झालेली दिसून येते. आशिया खंडातील दहशतवादाचे केंद्र पश्चिम आशियातून दक्षिण आशियात स्थलांतरीत झाल्यानंतर या उपखंडातील बहुसंख्य राष्ट्रांना या समस्येचा सामना करावा लागत असला तरी दहशतवादाचा सर्वात जास्त त्रास हा पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि भारताला होत आहे. गेल्या 20 ते 24 वर्षात दहशतवाद आणि धार्मिक मूलतत्त्ववादाची दक्षिण आशियामध्ये झपाट्याने वाढ घडून आली आहे. दक्षिण आशियात दहशतवादाचा प्रसार घडून येण्यामागची दोन मुख्य कारणे आहेत. एक म्हणजे अफगाणिस्तानात 1996 नंतर सत्तेवर आलेली तालिबानी राजवट. या राजवटी अंतर्गत अनेक देशांमधील दहशतवादांना आश्रय देण्यात आला. या काळात दहशतवादाला प्रशिक्षण देण्याची, त्यांना शस्त्रास्त्रें आणि

इतर आर्थिक मदत पुरवण्याची अनेक केंद्रे अफगाणिस्तानात सुरू झाली तालीबान राजवट ही धार्मिक मूलतत्त्ववादावर आधारलेली होती. या काळात दहशतवाद आणि धार्मिक मूलतत्त्ववाद यांच्यात घनिष्ठ सांगड घालण्याचा प्रयत्न केला गेला. धार्मिक मूलतत्ववाद दहशतवादाचे मुख्यप्रेरणास्त्रोत आणि आधार बनले. तर दक्षिण आशिया मध्ये दहशतवाद वाढण्याचे दुसरे मुख्य कारण म्हणजे अमेरिकेने या उपखंडात आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी सुरू केलेली मोहीम हे होय. आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरोधी आपल्या महत्वकांक्षी मोहीमेची सुरूवात अमेरिकेने अफगाणिस्तानमध्ये केली. या मोहिमेला पाकिस्तानने प्रत्यक्ष तर भारताने अप्रत्यक्ष समर्थन केले. परिणामी ही दोन्ही राष्ट्रे 'अलकायदा' सारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनाच्या हिटलिस्टवर आली.

आज वर्तमानामध्ये इंटर सर्व्हिस पब्लिक रिलेशन मधील (ैच्ट) सैन्य दलाच्या प्रवक्त्यानुसार पाकिस्तानमध्ये 60 ते 70 सशस्त्र दहशतवादी संघटना असून त्यापैकी तेहरीके तालिबान पाकिस्तान (ज्च्च्) ही सर्वात प्रबळ संघटना आहे. हे तालिबानी पाक सैन्याने व आय एस आय ने प्रथम पोसले. कारण जिहादी विचारसरणी ही भारताविरूद्ध वापरण्याची सोय होती. या विचारसरणीचे लष्कर जैश वगैरे इतर गट भारताविरूध्द गरळ ओकत दहशतवादाला खतपाणी घालत राहतात. मुळात धर्मावर आधारित दहशतवाद हे सामरिक भांडवल (स्टैजिक असेंट) म्हणून वापरण्याचे तंत्र पाकिस्तानी आय एस आयने 1980 च्या दशकातच सुरू केले होते. सुरूवातीला शीख दहशतवादाला खतपाणी घालण्याची खेळी पाकिस्तानने केली. खलिस्तान चळवळ निष्प्रभ झाल्यावर त्यांनी इस्लामिक दहशतवादाकडे मोर्चा वळविला. 1993 ची मुंबईतील बॉम्बस्फोट मालिका ही त्यापैकीच एक. काश्मीरला मिळवण्याची महत्वकांक्षी खेळी, त्यासाठी भारताची सामरिक शक्ती पाहता सरळ हल्ला न करता भारताला हजारो जखमा पोहचवून घूसखोरी तसेच दहशतवादी हल्ले घडवून आणण्याची पाकिस्तानी खेळी आज पाकिस्तानच्याच जीवावर उठली आहे. पाकिस्तानच्या या तंत्रामुळे भारताचे जीवित आणि आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय स्वतःच्या सरकारवरील विश्वास उडतो व राजकीय व्यवस्थेला तडे जातात. त्यामुळे इस्लामिक दहशतवादाची कटकारस्थाने हा पाक सरकार पुरस्कृत उद्योग बनला आहे. पाकिस्तानने यामुळेच दहशतवादी नेहमी पोसले व ते त्या देशाचे आजे हिरो बनलेले आपल्याला दिसून येतात.

धर्माच्या नावावर अरबीयन राष्ट्राकडून आलेली मदत पाकिस्तानने आण्विक शस्त्र निर्माण करण्यामध्ये, दहशतवादी तयार करण्यामध्ये, तसेच भारताविरोधी भूमिका वठविण्यामध्ये खर्ची घालत आहे. पाकिस्तानची शिक्षण व आरोग्य व्यवस्था डबघाईला येण्यामागे हे महत्वाचे कारण आहे. पाकिस्तानमध्ये दहशतवादाची सूत्रे ही पाकिस्तानी लष्कराच्या हातात आहेत आणि देशाचीही सूत्रे आपल्याच हाती असावीत असा या लष्कराचा प्रयत्न असतो. लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार स्थिर होवू नये यासाठी पाकिस्तानी लष्कराचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात. अशाप्रकारे लोकशाही विरूध्द लष्करशाही असा खेळ पाकिस्तानमध्ये सुरू आहे. पाकिस्तानी राज्यकर्त्याच्या सत्ता लालसेपोटी पाकिस्तानी जनतेला लष्कर जवळचे वाटते. या सर्व पार्श्वभूमीवर असे म्हणता येईल की, पाकिस्तानमधील लष्करी शक्ती, धार्मिक शक्ती, जिहादी शक्ती आणि लोकतांत्रिक शक्ती यांच्यामध्ये चालू असलेला संघर्ष हा जो पर्यन्त संपूष्टात येत नाही, तसेच जो पर्यन्त पाकिस्तानमध्ये लोकतांत्रिक मूल्यांची खऱ्या अर्थाने रूजवण होणार नाही, तो पर्यन्त पाकिस्तानचे आधुनिक राष्ट्राचे स्वप्न पूर्ण होवू शकणार नाही. सुरूवातीपासूनच धार्मिक कट्टरतेचा वरचष्मा असलेल्या या देशामध्ये धर्माच्या नावावर ज्यांनी दहशतवादाची शेती पिकविली आणि ज्या दहशतवादाच्या पिकविलेल्या शेतीच्या जोरावर शेजारी राष्ट्रावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात पाकिस्तान स्वतःच फसलेला आहे. याची जाणिव लोकतांत्रिक शक्तीना आणि धार्मिक शक्तींना झाली असेलच. दहशतवादासारख्या शस्त्रांचा शेजारी राष्ट्रांवर उगारण्यासाठी ज्या धार्मिक शक्तींनी या शस्त्राला आजपर्यन्त जी धार लावून तयार केले. ते शस्त्र आज पाकिस्तानच्याच शरीरावर जखमा करीत आहे. त्यामुळे शस्त्र हे फक्त रक्षणाकरीता, विकासाकरीता असते. इतरांना उध्वस्त करण्याकरीता नाही. याची जाणिव जर पाकिस्तानला अजूनही झाली नसेल तर पेशावर सारखे हल्ले असेच देशामध्ये सुरू राहणार यामध्ये काहीही शंका नाही.

संदर्भ :

1. दैनिक लोकसत्ता संपादकीय, 18 डिसेंबर 2014 पृ. 7.
2. देवळाणकर शैलेंद्र, समकालीन जागतिक राजकारण, भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने. विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपूरा औरंगाबाद 2014, पृ. 47.
3. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, संवाद, 21 डिसेंबर 2014, पृ. 01.
4. दीक्षित जे.एन. इंडिया पाकिस्तान इन वॉर ॲड पीस, सरलेज पब्लिशर्स, नवी दिल्ली, 2002.
5. दैनिक सकाळ, सप्तरंग, 28 डिसेंबर 2014 पृ. 2, 3.
6. दैनिक लोकसत्ता संपादकीय, 16 डिसेंबर 2014 पृ. 7

# मानवाधिकार आणि शेतकरी आत्महत्या

**प्रा. अरूण भावसिंग चव्हाण** (सहा. प्राध्यापक) अर्थशास्त्र विभाग, एस. एन. मोर महाविद्याल, तुमसर, जि. भंडारा

मानवी हक्क ही संकल्पना विसाव्या शतकात प्रचलीत झाली असली तरी या संकल्पनेचे मूळ ग्रीक काळात आढळते. प्लेटोने स्त्री–पुरूष समाजसेवा विचार मांडला. तर ॲरिस्टॉटलने नाकरिकांच्या हक्काचे विवेचन केले. अर्थातच त्यांच्या संकल्पनाची व्याप्ती मर्यादित होती. जॉन लॉक या विचारवंताने सर्वप्रथम मर्यादित राजेशाही व मुलभूत स्वातंत्र्याची आवश्यकता आपल्या भाषणातून मांडली. इ. स. 1688 मध्ये मधील ग्लोरीअस क्रांती 1776 मधील अमेरीकन राज्यक्रांती, 1789 ची फ्रेंच राज्यक्रांती, 1791 मधील हक्काचे विधंयक अशा असेल त्यातून मानवी हक्काच्या संकल्पनेचा विकास झाला. स्वातंत्र, समता आणि बंधुता ही समाज जिवणाची मुलभुत तत्वे संपूर्ण मानव समाजाला 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांती ने मिळवून दिली आणि राजा, सरजामदार आणि धर्मगुरू यांच्या अर्निबंध समतेला आळा घातला. यानंतरही संपूर्ण जगभर होणा–या आंतरराष्ट्रीय पातळीवरील सभा आणि सम्मेलनामध्ये मानवी हक्काची संकल्पना प्रखरतेने मांडल्या गेली. उदा. बर्लीन काँग्रेस, बुसेल्स सम्मेलन (1899), हग सम्मेलन 1829 साली आंतरराष्ट्रीय विधी संस्थेकडून आंतरराष्ट्रीय मानवी हक्काची घोषणा करण्यात आली. पहिल्या आणि दूस–या महायुद्धाच्या काळात संपूर्ण मानवी समाजाचे अस्तीत्व धोक्यात आले. यादृष्टीने 1945 साली जागतीक शांततेसाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काची घोषणा केली. म्हणून दरवर्षी 10 डिसेंबरला दिवस मानवी हक्कदिन म्हणून जगभर साजरा केला जातो. मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात एकूण तिस कलमे आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या सरनाम्यात आला. सहा कलमामध्ये (कलम 1, 55, 56, 62, 68, 76) मानवी हक्काचा उल्लेख आहे. या कलमातून व्यक्त झालेला मानवीहक्काचा जाहीरनामा विस्तारीत स्वरूप धारण करतो. या कलमासहीत संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने दि. 10 डिसेंबर 1948 रोजी हा जाहीरनामा स्विकारला व त्यानंतर या संकल्पनेला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले.

सर्वसाधारणतः मानवी हक्कामध्ये व्यक्तीच्या (मानवाच्या) समता, स्वातंत्र व बंधुता या घटकांवर विशेष भर देण्यात येतो. यामध्ये काही शंका नाही की संयुक्त राष्ट्रसंघटनेने जेव्हापासून मानवी हक्काच्या संकल्पनेला विशेष अधिकार प्राप्त करून दिले तेव्हापासून संपूर्ण जगामध्ये मोठया प्रमाणात लोकांमध्ये मानवाधिकाराच्या संदर्भात जागरूकता निर्माण झाली आहे. 1950 नंतर जगामध्ये विविध देशांच्या झालेल्या आर्थिक विकासात मानवी हक्काच्या घटकांचा विशेष सहभाग आहे किंवा या घटकांकडे आर्थिक विकासात दूर्लक्ष झाले नाही. असे असले तरी जागतीकीकरणाच्या कालावधीत भारतामध्ये उत्पन्न विषमतेत वाढ झाली आहे. भारतामधील विषमता अनुपात 2000–02 या कालावधीत 7.8 होता नेतर तो 2006 ते 2008 या कालावधीत 10.2 झाला आणि नंतर वाढून 2010–12 या कालावधील 12.2 झालेला आहे. या आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतामध्ये उत्पन्नामध्ये विषमता वाढत आहे. यामध्ये गरीब श्रीमंत दरी वाढत आहे. त्यामुळे मानवाधिकाराचे उल्लंघन होत आहे.

**शेतकरी आत्महत्या** : मानवी हक्कांच्या संकल्पनेमध्ये सर्वच स्तरातील लोकांच्या हक्कांच्या संरक्षणाचा समावेश होतो. मग तो उद्योजक असो, व्यापारी असो, नौकरदार असो वा शेतकरी असो सर्वाच्या हक्कांना समान अधिकार असतो. परंतू विकासाच्या प्रक्रीयेमध्ये जेव्हा राष्ट्रीय उत्पन्नाचा प्रवाह शेतक–यांकडून उद्योजक व उद्योजकाकडून सेवा क्षेत्रातील लोकांकडे जातो, तेव्हा राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा भाग हे मुठभर लोकांकडे जमा होते तर सर्वसामान्य व्यक्ती दोन वेळेच्या जेवणासाठी झगडतो. आजही भारतामध्ये जवळपास 29 टक्के लोक दारिद्रयरेषेच्या खाली जिवन जगत आहे, त्यांच्या मानवाधिकाराचे काय ?

सर्वसाधानणतः एखाद्या अर्थव्यवस्थेचे तिन मुख्य घटक असतात ते कृषी, उद्योग आणि सेवा. या तिनही घटकाच्या एकूण उत्पन्नाची बेरीज म्हणजे त्या देशाचे राष्ट्रीय उत्पन्न असते आणि याच उत्पन्नातून त्या देशाचा विकास घडवून आणला जातो. भारतासारख्या अल्पविकसीत देशाच्या विकासामध्ये कृषी क्षेत्राचा अधिक वाटा असतो. कारण आजही भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात 2013–14 मध्ये कृषीचा 13.9 वाटा आहे. तर एकूण रोजगारामध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा 54 टक्के आहे असे असले तरी आज भारतीय शेतकरी का आत्महत्या करतो आहे ? हे आत्महत्तेचा प्रमाण इतके गंभीर आहे की आज त्यांच्या मानवी हक्काचेच धिंडवडे निघाले आहे. भारतामध्ये गेल्या काही वर्षामध्ये शेतक–यांनी केलेल्या आत्महत्तेची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | शेतक–यांच्या आत्महत्या (आकडे हजारात) |
|---|---|
| 2009 | 17,368 |
| 2010 | 15,694 |

| | |
|---|---|
| 2011 | 14,027 |
| 2013 | 11,772 |
| एकूण | 58,841 |

स्त्रोत : दैनिक नवभारत, दि. 22 डिसेंबर 2014

वरील सारणीवरून दिसून येते की, वर्ष 2009, 2010, 2011 आणि 2013 या चार वर्षामध्ये एकूण 58,841 शेतक–यांनी आत्महत्या केल्या आहे. यापैकी 2009 मध्ये 17,368, 2010 मध्ये 15,694, 2011 मध्ये 14,027 तर 2013 मध्ये 11,772 शेतक–यांनी आत्महत्या केलेली दिसते.

यामध्ये कृषीच्या संबंधीत शेतक–यांच्या आत्महत्येचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | शेतक–यांच्या आत्महत्या (आकडे हजारात) |
|---|---|
| 2009 | 2,577 |
| 2010 | 2,359 |
| 2011 | 2,449 |
| 2012 | 918 |
| 2013 | 510 |
| एकूण | 8,813 |

स्त्रोत : दैनिक नवभारत, दि. 22 डिसेंबर 2014

वरील सारणीवरून हे दिसून येते की, कृषीच्या संबंधीत असणा–या शेतक–यांच्या आत्महत्येचे प्रमाण 2009 मध्ये 2,577 होते. तर 2010 मध्ये 2,359, 2011 मध्ये 2,449, 2012 मध्ये 918 तर 2013 मध्ये 510 शेतक–यांनी आत्महत्या केली आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भात बघायचे झाल्यास महाराष्ट्रामध्ये 2012 मध्ये 407 शेतक–याने आत्महत्या केली, 2013 मध्ये हे प्रमाण 511 होते. इतक्या मोठया प्रमाणात देशामध्ये व महाराष्ट्रामध्ये शेतक–यांची होणारी आत्महत्या एक चिंतेची बाब आहे. ही शेतक–यांची होणारी आत्महत्या मानवी हक्काच्या दृष्टीकोणातून गंभीर बाब आहे याला शेतक–यांच्या मानवी हक्काचे हननसुद्धा म्हणता येईल. जे शेतक–यांना आत्महत्येस प्रवृत्त करत आहे.

या शेतक–यांच्या आत्महत्तेचा विविध कारणापैकी शेतक–यांचा कर्जबाजारीपणा एक मुख्य कारण आहे. आंध्र प्रदेशात 93 टक्के शेतकरी कर्जबाजारी आहेत, तेलंगनामध्ये 89 टक्के शेतकरी, उत्तर प्रदेशात 44 टक्के, बिहार 42 टक्के, झारखंड 28 टक्के, हरियाणा 42 टक्के, पंजाब 53 टक्के आणि पंश्चिम बंगालमध्ये 51.1 टक्के शेतकरी कर्जात बुडाले आहे. जर त्यांच्या मानवी हक्काचे संरक्षण करायचे असेल तर त्यांना या कर्जाच्या सापळयातून बाहेर कारण आवश्यक आहे.

भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांच्या मानवी अधिकाराच्या रक्षणासाठी काही उपाय करने आवश्यक आहे, ते पुढीलप्रमाणे असु शकतात.

1. सरकारला उद्योगपती पेक्षा शेतक–यांना अधिक प्राधान्य द्यायला हवे, जर असे केले नाही तर शेतक–यांचा मुलगा कधीही शेतकरी होऊ शकणार नाही. जर सर्वानी शेतीकडे दूर्लक्ष केले तर समाज आणि देशाच काय होईल ? शासन शेतक–यांच्या हितासाठी ज्या योजना सुरू केल्या त्यांची अंमलबजावणी योग्य होते आहे का ? जर हे सगळे व्यवस्थीत असले तर शेतकल्योनी इतक्या मोठया प्रमाणावर आत्महत्या का केल्या असत्या. मध्यस्थ, दलाल आणि बाजार शक्तीला आपल्या लाभाचाच विचार न करता मानवतेच्या दृष्टीकोणातून शेतक–यांची चिंता करायला हवी.

2. सरकार उद्योगपतींना ज्या प्रमाणात मोठया–मोठया सोई सुविधा पुरवितात. त्या शेतक–यांना दिल्या जाव्या. उदा. कमी व्याजदरावर कर्ज, मालाला योग्य बाजार भाव.

**सारांश** : देशामध्ये होणारी शेतक–यांची आत्महत्या एक गंभीर बाब आहे. शेतक–यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने वेळोवेळी पॅकेजस जाहीर केले तरी सुद्धा देशामध्ये आत्महत्या पूर्णपणे थांबल्या नाहीत. अलिकडेच महाराष्ट्र सरकारने शेतक–यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी 7,000 कोटी रूपयाचे पॅकेज जाहीर केले आहे. परंतु याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. नुसते शेतक–यांना रोख रकमा देऊन आत्महत्या थांबणार नाहीत तर शेतीच्या विकासाच्या संदर्भात योजना आखणे महत्वाचे आहे. यामध्ये सिंचनाचा सोईचा विकास, बियाणे, खते, कृषी मालाचा दर जाहीर करणे, योग्यवेळी कृषी सनसाधनांची उपलब्धता करून देणे. जर असे केले तर शेतक–यांची आत्महत्या थांबविण्यास मदत होईल व त्यांच्या मानव अधिकारांचे रक्षणसुद्धा होईल.

**संदर्भ सूची** :

1. गौरव दत्त व अस्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था,एस. चंद प्रकाशन, नवी दिल्ली.
2. डॉ. निळकंठ भुसारी, प्रा. गणेश माकडे, प्रा. जे. जे. जाधव, मानव अधिकार – विस्थापीतांच्या व पर्यावरणाच्या समस्या, अथर्व पब्लिकेशन, धूळे.
3. दैनिक नवभारत – दि. 22 डिसेंबर 2014.
4. दैनिक नवभारत – संपादकिय दि. 23 डिसेंबर 2014.
5. The Economic Times – 9 December 2014.

# भारतीय स्त्रियांची स्थिती

**प्रा. साधना मौंदेकर,** सहा. प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.
Email : sadhanamoundekar@gmail.com

**प्रस्तावनाः—** भारतीय इतिहासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सामर्थ्यवान, धैर्यशिल व बुध्दीमान स्त्रियांची उदाकरणे आढळतात जसे दौपदी, सीता, गार्गी इत्यादी भारतातील इतिहासाच्या मध्ययुगातील स्त्रियांच्या स्थितीबाबात आपल्याला असे दिसून येते की, झुंझार लढवय्या व कुशल राज्यकर्त्या अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई इत्यादी ब्रिटीश कालीन स्थिती दिसून येते. ब्रिटीश पुर्व काळात भारतीय समाजात धर्म व रूढी हे महत्वाचे घटक होते. जातीव्यवस्थेची कडक बंधने, अपरिवर्तनिय विवाहसंस्था व कुंटूबसंस्था यामुळे स्त्रियांच्या विकास करण्यासाठी अनेक मर्यादा आलेल्या होत्या स्त्रियांना पूर्णत पुरूषांवर अवलंबून राहावे लागत होते. यातुनच स्त्रियांचे अनेक प्रथा, परंपरा मधून शोषण होऊ लागले. जसे सतीप्रथा, केशवपन, बालविवाह इ. प्रथानी स्त्रियांच्या जीवनात मरणे सोपे पण जगणे कठिण अशी स्थिती निर्माण झाली.

यानंतरच्या काळात मात्र भारतातील काही समाजसुधारकांनी आपले लक्ष वेधले. वृत्तपत्रांच्या माध्यमातून येथील समाजात वैचारिक जागृती होण्यास सुरूवात झाली. ईस्ट इंडिया कंपनीतील सर चार्लस ग्रॅड यांनी केली. विल्यम कॅरे यांनी बंगालमध्ये शिक्षणाचा 'श्री गणेशा' केला. राजा राममोहन रॉय यांनी हा वारसा पुढे चालविला. 1813 चा चार्टर ॲक्ट, 1854 चा वुड डिस्पॅच नंतर 1882 चा हंटर कमिशनने स्त्री शिक्षणाचा जोरदार आग्रह धरला. यासर्व गोष्टींचा परिणाम भारतातील समाज सुधारकांवर झाला. स्त्रियांच्या अवजत परिस्थितीवर शिक्षण हाच एकमेव उपाय असल्याचे समाज सुधारकांनी ओळखले त्यामुळे 'स्त्री' सुधारणा चळवळीस गती मिळाली. भारतातील बंगालमध्ये वेंग्टीगने 1818 मध्ये सतीबंदी कायदा केला, तो देशभर पोहचवला. सन 1810 मध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांनी भारतात मुलींसाठी पहिली शाळा काढली. तर भारतीय भाषेतील स्त्री शिक्षणावरील पहिले पुस्तक बंगालीत गुरू मोहन विद्यालकार यांनी 1819 मध्ये लिहून फिमेल ज्युवेनाईल सोसायटीच्या माध्यमातून छापले. महाराष्ट्रात पूणे येथे मुलींची शाळा महात्मा फुले यांनी सुरू केली व सावित्रीबाई फुले यांनी भ्रूणहत्या, बालहत्या होऊ नये म्हणून विधवा व अविवाहित स्त्रियासाठी आधारगृह सुरू केले.

**विद्यापीठीय पातळीवरील प्रयत्नः—** 1883 सालापासून मुंबई विद्यापीठात स्त्रियाना प्रवेश मिळू लागला वुमेन्स इंडिया असोसिएशन, वुमेन ग्रॅज्युएट युनियन, दि बॉम्बे प्रेसिडेन्ट, वुमेन कौन्सिल, दि नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन इंडिया या संस्थांनी स्त्रियांच्या विकासासाठी महत्वाचे कार्य केले. 1889 ते 1912 या काळात 65 महिला पदवीधर झाल्या. 20 व्या शतकात एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाची स्थापना झाली. त्यामुळे शिक्षणाला अधिक गती मिळाली. 1957 मध्ये ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सच्या ठरावानुसार जेथे विद्यार्थीनी शिक्षण घेतात तेथे महिला प्राध्यापक नेमण्यात येऊ लागल्यात. 1941 साली महिलांसाठी सोफिया महाविद्यालय कला, गृहविज्ञान, सामाजिक व सांस्कृतिक विषयांसाठी निघाले. पदवी पदव्युत्तर, पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण स्त्रिया घेऊ लागल्या याच काळात 'स्त्री' संदर्भात पुढील शोध निबंध प्रबंध सादर झाले. 'दि पोझिशन ऑफ वुमेन वर्कर्स इन बॉम्बे कॉटन मिल्स', 'दि पोझिशन ऑफ वुमेन इन बॉम्बे सिटी', 'सोशियो इकॉनॉमी पोझिशन ऑफ वुमेन इन इंडिया', 1858 ते 1929 हे विषय होते.

**वैद्यकीय क्षेत्रः—** मेडिसीन आणि सर्जरी विद्येत कृष्णाबाई केलवकर, काशीबाई नवरंगे, सुंदराबाई कीर्तने यांनी स्वतःची क्लिनीक काढली. डॉ. आनंदीबाई जोशी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी परदेशात गेल्या व एम.डी. होऊन आल्या. त्या पहिल्या भारतीय स्त्री डॉक्टर होत.

**स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबनः—** स्त्रियांनी शिकले पाहिजे या टप्प्यापर्यंत प्रगती झाल्यावर या नंतरचा टप्पा म्हणजे स्त्रीयांचे आर्थिक स्वावलंबन होय. सुशिक्षित आणि अशिक्षित महिलांना वेगळ्या स्वरूपाची कामे मिळत असत. स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले असे म्हटले जाते. वास्तविक स्त्रियांचे अर्थार्जन ही काही नवी, आजची बाब नाही. परंतु मिळवती स्त्री जोपर्यंत स्वतःच्या परंपरागत चौकटीत राहून कुटुंब आणि अर्थार्जन अशा दोन्ही जबाबदाऱ्या बिनबोभाट पार पाडत होती तेव्हा हा प्रश्न आला नाही. त्यावेळेस स्त्रियांचे कार्यक्षेत्रही मर्यादित होते. स्त्रीला जसजशी स्वतःची जाणीव व्हायला लागली, माणूस म्हणून जगतांना कराव्या लागणाऱ्या तडजोडीची जाणीव व्हायला लागली. विविध क्षेत्रात काम करतांना स्वतःचे अस्तित्व सिध्द केल्यावर हक्काची जाणीव

व्हायला लागली. जो हक्क समाजाने वर्षानुवर्षे डावलला होता त्यामुळे संघर्ष निर्माण होऊ लागला.

**समारोपः–** 'फुलनदेवी' वरील कित्येक दशकाआधीचा बलात्कार असू दे की आजची 'निर्भया', तंदूर मध्ये जाळल्या गेलेल्या नैना साहनी किंवा मग शिवानी भटनागर, प्रियदर्शनी मट्टू, जेसिका लाल किंवा आरूषी तलवार.... गर्भाशयातच भ्रूणहत्या, बलात्कार, ऑनर किलिंग, ॲसिड अटॅक, हुंडाबळी आणि काय काय... जन्मापासून तर मरेपर्यंत भीत भीत जगतांना निदान एका दिवसांच भयमुक्त जगणं शोधू पाहणारी स्त्री कालची आणि आजची ही स्त्री, गरीब असो श्रीमंत, कुठल्याही धर्माची असो, सासरी असो वा माहेरी असो. कुठेतरी निर्धास्त निःसंदेह, निर्विवाद जाऊ शकेल न अडखळता मोकळा श्वास घेऊ शकेल अशी परिस्थिती अजूनही नाही. जेव्हा स्त्रियांना शरीरापलीकडे एक भावना म्हणून बघायची आणि आदराने वागवायची बुध्दी आपल्या समाजात रूजेल, स्त्रीयांचा आदर, त्यांचा आत्मसन्मान जेव्हा मनामनांतून आपसूक जपला जाईल. ही जागा, हे वातावरण आणि इथल्या प्रत्येक गोष्टीवर तिचाही समान वाटा असेल आणि असा आंतरिक बदल जेव्हा घडेल तेव्हा महिलांचा आदर करण्यासाठी वर्षातला एखादा विशिष्ट दिवस साजरा करण्याची गरजही उरणार नाही.

**संदर्भसूचीः–**


1. भारतीय समाज आव्हाने आणि समस्या – रा. ज. लोटे
2. समाजशास्त्र विश्वकोष – डॉ. नीलम ताटके
3. सकाळ – दि. 23 सप्टेंबर 2014
4. भारतीय समाज प्रश्न आणि समस्या – डॉ. प्रदीप आगलावे

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &
SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.

Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657